
# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०१८ • पृष्ठे १०० • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक पहिला





## आवर्जून वाचावे















# प्रकाशन समारंभ...

## 'माझी वाटचाल'चा दिमाखदार प्रकाशन सोहळा




माजी केंद्रीय गृहसचिव, अरुणाचल प्रदेशचे माजी राज्यपाल राम प्रधान यांच्या 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन' या पुस्तकाचं प्रकाशन नागपूर येथे केंद्रीय रस्ते व महामार्ग आणि जलसंपदामंत्री नितीन गडकरी, माजी केंद्रीय संरक्षणमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. या वेळी अन्य मान्यवर उपस्थित होते.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। जानेवारी २०१८ । वर्ष अठरावे । अंक पहिला ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२

E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **उपक्रम** | १० |
| **पुस्तक परिचय** | |
| **संवादु-अनुवादु** | १६ |
| **हिज डे** | २६ |
| **आघात** | ४४ |
| **महामानव सरदार पटेल** | ५२ |
| **प्रासंगिक** | ७२ |
| **शब्द शब्द जपून ठेव...** | ८० |
| **स्मरण** | ८४ |
| **अभिप्राय** | ९० |
| **बालनगरी** | ९४ |

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

---

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# मस्तीभरा है समा...

लेखाचं शीर्षक वाचून बुचकळ्यात पडलात ना! म्हणजे आमच्या साहित्यविषयक मासिकात संगीत कुठून आलं! पण एखाद्या वेळेला असं होतं खरं, की एखाद्या गीताची एखादीच ओळ मनात रुंजी घालत राहते आणि मग त्याच अर्थाची किंवा त्या अर्थाच्या जवळपास जाणारी गीतं आठवत राहतात. सगळा 'समा' एकदम बदलून जातो. जानेवारी महिन्यातील सुखद थंडीचं वातावरण असंच मनाला उल्हसित करणारं असतं आणि मग अशी ही 'मस्तीभरी' गीतं मनात धुमाकूळ घालायला लागतात.

आणि मग या मस्तीच्या मूडमध्ये जाताना आठवते ट्रकमध्ये गवताच्या भाऱ्यावर बसल्या बसल्या माठ फेकून देणारी आणि 'आज फिर जीने की तम्मना है, आज फिर मरने का इरादा है।' म्हणणारी वहिदा रहेमान आणि तिच्याबरोबर असलेला चिरतरुण देवानंद. शैलेंद्रचे हे त्या नायिकेच्या अंतरंगातून उमटलेले मस्तीभरे तरी जीवनाला भिडणारे शब्द आणि त्या गीताला तेवढंच ताजेपण बहाल करणारं एस.डी. बर्मन यांचं संगीत पडद्यावरचा माहोल तर तरोताजा करतंच; पण कोणत्याही क्षणी नुसतं ऐकलं तरी रसिकाचं मन प्रफुल्लित होतं.

देवानंद, वहिदा रहेमान, गीतकार नीरज आणि संगीतकार एस. डी. बर्मन या समीकरणातून साकारलेलं 'शोखियों में घोला जाए फुलों का शबाब, उसमें फिर मिलाई जाए थोडीसी शराब, तो होगा यूँ नशा जो तय्यार, वो प्यार है...' या गीतातली शेताच्या हिरव्यागार पार्श्वभूमीवरील अवखळ मस्ती चित्ताला प्रसन्नता देणारी.

'हवा के साथ साथ घटा के संग संग, ओ साथी चल' या

गीताची जादू अशीच मनाला नेहमी उल्हसित करणारी. पडद्यावर ड्रीमगर्ल हेमामालिनी आणि संजीवकुमारला स्केटिंग करताना बघणं हा आनंद वेगळाच; पण नुसतं ऐकताना देखील या गीतातील मस्ती मनाला टवटवीत करते. आनंद बक्षी आणि आर. डी. बर्मन यांची ही कमाल.

'मस्तीभरा है समा...' या गाण्यातील मस्ती अशीच और आहे. लतादीदी - मन्ना डे यांचे स्वर आणि पडद्यावर एकमेकांच्या मागे धावणारे राज कपूर-माला सिन्हा. दत्ताराम यांच्या संगीताने नटलेलं हे गीत पन्नासच्या दशकातलं. तरीही त्यातली मस्ती आजही मनाला ताजेपणा देणारी.

आणि काही गाण्यांमध्ये मस्ती नसली तरी त्या त्या वातावरणाचा गंध त्या गाण्यातून जाणवत राहतो आणि रसिकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जातो. 'ये समा, समा है ये प्यार का...' या गीताला काश्मीरच्या निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमी लाभली आहे आणि त्या पार्श्वभूमीवर नायिकेच्या मनात उमटलेले अबोध भाव रसिकाला स्वप्निल वातावरणात घेऊन जातात. आनंद बक्षींचे शब्द आणि कल्याणजी-आनंदजी यांचं संगीत.

'भीनी भीनी है, मिठी मिठी है...' हे गाणंही प्रसन्न वातावरणाचा स्पर्श असलेलं. परवेझ शमशी यांचं हे गीत, सी. रामचंद्रांचं संगीत आणि लतादीदींचा स्वर्गीय स्वर...चित्तवृत्ती बहरून टाकतं हे गीत.

मनाला उल्हसित करणारं 'ठंडी हवाए लहराके आये, ऋत है जवाँ, तुमको यहाँ कैसे बुलाये' हे आणखी एक गीत. गीतकार साहिर लुधियानवी आणि संगीतकार एस. डी. बर्मन या समीकरणातून साकारलेलं.

ही गीतं ऐकताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे निसर्गाचा माणसाच्या अंतर्मनाशी असलेला संबंध. चित्तवृत्ती प्रसन्न असल्यामुळे निसर्ग सुंदर भासतोय, की निसर्ग सौदर्यामुळे मन प्रसन्न झालंय, हे या गीतांच्या बाबतीत सांगणं अवघड आहे; कारण मनाची प्रसन्नता आणि निसर्ग सौंदर्य यांच्या एकरूपतेतून या

गीतातील भाव साकार झाला आहे. एकूणच निसर्ग माणसाच्या मनातील व्यापकतेला आवाहन करत असतो, ही बाबही या गीतांच्या माध्यमातून अधोरेखित होते.

तर मनाला प्रसन्न करणारी अशी मस्तीभरी आणि वातवरणाचा गंध असलेली गीतं अनेक असतील; पण ज्या गीतांचा उल्लेख आपण केला आहे, त्या गीतांमध्ये गीतकार, संगीतकार, गायक कलाकारांबरोबरच महत्त्वाचं योगदान आहे ते म्युझिक ॲरेंजर्सचं. या गाण्यांमध्ये जी मस्ती किंवा प्रफुल्लता जाणवते, वातावरणाशी एकरूप झालेल्या भावना उलगडत जातात त्या या गीतांच्या म्युझिक ॲरेंजर्समुळे. त्या त्या गाण्याचा 'मूड' या ॲरेंजर्सनी वाद्यमेळातून खुलवल्यामुळे ही गीतं सर्वांगसुंदर झाली आहेत आणि तुमचं-आमचं जीवन या गीतांनी भारलेलं आहे, हे आपलं भाग्यच म्हणावं लागेल. ही सगळी गीतं रसिकांच्या मनाला वर्षानुवर्षं रिझवत आहेत, फुलवत आहेत.

तेव्हा या बहरलेल्या गीतांसारखंच तुमचं-आमचं जीवन बहरू दे आणि सारं विश्व आनंदाने भरून जाऊ दे!

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ५०० रुपये**

---

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon    dailyhunt    GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**m.dailyhunt.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा**    **www.mehtapublishinghouse.com**

# उपक्रम दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

**वाचकांसाठी सुवर्णसंधी**
**करा मैत्री पुस्तकांशी**
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा**
**नवीन उपक्रम**

**१६ डिसेंबर २०१७ ते १५ जानेवारी २०१८**
**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

# दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५०टक्क्यांपर्यंत सूट

## १८ जानेवारी - सुनंदा अमरापूरकर यांचा जन्मदिन

'अँबिग्युअस लॉस, अॅन आय फॉर अॅन आय, मिराज, फॅमिली, आमेन, शेम, शांततेनं काम करा!, वेदनेची फुले, द मॅड तिबेटियन' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १६६०/-**

*१८ जानेवारी ते २० जानेवारीपर्यंत.*

**सवलत किंमत १००९/-**

## २३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती

**संच १** - 'नेताजी' व 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४९३/-**

**सवलत किंमत ३६०/-**

**संच २** - 'Mahanayak (English)' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ६९५/-**

*२३ जानेवारी ते २५ जानेवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ५२०/-**

## २४ जानेवारी - भारतीय राष्ट्रीय कन्या दिवस

**संच १** -'अंतराळवीर सुनीता विल्यम्स, स्लमगर्ल ड्रिमिंग, स्वप्नाकडून सत्याकडे, कर्मयोगिनी (अहिल्याबाई होळकर), आखाडा' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ८४०/-**

**सवलत किंमत ५६९/-**

**संच २** - 'Karmayogini (Ahilyabai Holkar–English)' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३५०/-**

*२४ जानेवारी ते २७ जानेवारीपर्यंत.*

**सवलत किंमत २३९/-**

## २६ जानेवारी - भारतीय प्रजासत्ताक दिन

‘फ्रिडम ॲट मिडनाइट, मोहनदास, परमवीरचक्र, नेताजी, महामानव सरदार पटेल, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत १९९९/-

**संचाची मूळ किंमत - ३०२०/-**

*२६ जानेवारी ते २९ जानेवारीपर्यंत.*

## २६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिन

‘लेडिज कूपे, विस्मरणातच सर्वकाही!’ या अनुवादित पुस्तकांवर सवलत.

सवलत किंमत ४००/-

**संचाची मूळ किंमत - ६१०/-**

*२६ जानेवारी ते २९ जानेवारीपर्यंत.*

## २८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन

‘आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद’ या अनुवादित पुस्तकावर सवलत.

सवलत किंमत १६९/-

**मूळ किंमत - २५०/-**

*२८ जानेवारी ते ३० जानेवारीपर्यंत.*

## ४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिन

‘गर्भसंस्कार, स्थूलतेला करा टाटा’ या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३००/-**

*४ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंत.*

सवलत किंमत १६६/-

## ४ फेब्रुवारी- जागतिक कर्करोग दिन

‘Cancer Care & Mysteries & Yoga, कॅन्सर रोखू या,

इट्स नॉट अबाऊट द बाइक, अन्नपुराण' यांच्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ११९०/-**

*४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ८००/-**

## ४ फेब्रुवारी - फेसबुक दिन

'द फेसबुक इफेक्ट'या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३९५/-**

*४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत २६९/-**

## ५ फेब्रुवारी - गिरीजा कीर यांचा जन्मदिन

'आकाशवेध, जन्मठेप' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ३००/-**

*५ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत १५०/-**

## ८ फेब्रुवारी - जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिन

'अ टाइम टु किल, द असोशिएट, द चेम्बर, द क्लायंट, द फर्म, द लास्ट ज्यूरर, द पार्टनर, द पेलिकन ब्रीफ, द रेनमेकर, द टेस्टामेंट, द रनअवे ज्यूरी, द स्ट्रीट लॉयर' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ४८९०/-**

*८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत २४४५/-**

## ८ फेब्रुवारी - जागतिक विवाह दिन

'जस्ट मॅरीड, प्लीज एक्सक्यूज, Why My Third Husband Will Be A Dog, Why I'm still married, तो आणि ती,

चिकन सूप फॉर द कपल्स सोल, व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रिड मॅप्स' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १६६५/-**

*८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ११११/-**

## १२ फेब्रुवारी - पी. एन. जोशी यांचा जन्मदिन

'Glimpses of Changing Banking Scenario' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३००/-**

*१२ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत १५०/-**

## १४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाईन्स डे

'चिकन सूप फॉर कपल्स सोल, दॅट थिंग कॉल्ड लव्ह, एक अनादि अनंत प्रेमकहाणी, प्रेमाची परिभाषा, अनादि अनंत, टू सर विथ लव्ह, चिकन सूप फॉर द टु लव्ह भाग १ व २, पीस लव्ह ॲण्ड हीलिंग, अद्वैत, आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३०२०/-**

*१४ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत २०२९/-**

**आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन, तसेच दिनविशेष यांवर आधारित पुस्तकसंचावर विशेष सवलत.**


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

website : www.mehtapublishinghouse.com

**नवंकोरं**




**हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा**

# डेथ ऑफ अ कॅड

लेखक
**एम. सी. बीटन**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

**किंमत : १७०/-रु.। पोस्टेज : ५०/-रु.**

लंडनमधील नाटककार व आपला नियोजित पती यांच्यासमवेत प्रिसिला जेव्हा आपल्या लॉचढभच्या घरी येऊन पोहोचते. त्याच रात्री निवडक निमंत्रितांना जंगी मेजवानी दिली जाते, पण दुसऱ्याच दिवशी सकाळी एका पाहुण्याचा – कॅप्टन बार्टलेटचा – निर्घृण खून होतो. त्याने आजपर्यंत अनेकांना आपल्या रासवट वागणुकीने आणि वक्तव्याने घायाळ केलेले असते. पोलिसांच्या संशयाची सुई अर्थातच आलेल्या पाहुण्यांवरून फिरू लागते. प्रत्येकाची वेगवेगळ्या कारणाने बार्टलेटवर फार जुनी शत्रुता असते. त्याच वेळी आणखी एक खून होतो. हॅमिश मॅक्बेथसमोर हे एक कठीण आव्हान असते. आडमुठ्या व्यक्ती, अपुरे पुरावे अशा अनेक अडचणींमधून मार्ग काढत आपल्या कल्पक बुद्धीने तो त्या धूर्त खुन्याचा शांतपणे मागोवा घेत राहतो, पण त्याच वेळेस प्रिसिलाच्या सुसंस्कृत परंतु संशयी प्रियकराला सहज हुलकावणी देत,
तो प्रिसिलाशी प्रियाराधनही करत राहतो.

# संवाद अनुवाद
## आत्मकथन



ललित साहित्याची आवड असणाऱ्या सौ. उमा कुलकर्णी मराठी साहित्यक्षेत्रात विचक्षण अनुवादिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म बेळगाव येथे झाला व शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण बेळगावमध्ये झाल्यावर त्यांनी एस.एन.डी.टी. पुणे येथे पदव्युत्तर शिक्षण घेतले. १९८२ साली डॉ. शिवराम कारंत यांचे 'तनामनाच्या भोवऱ्यात' हे त्यांचे पहिले अनुवादित पुस्तक प्रकाशित झाले. प्रसिद्ध कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या 'वंक्षवृक्ष' या कादंबरीचा त्यांनी अनुवाद केल्यानंतर त्या आणि भैरप्पा हे एक समीकरणच तयार झाले. आजवर कुलकर्णी यांनी भैरप्पा यांचे 'पर्व', 'मंद्र', 'जा ओलांडुनी', 'काठ', 'परिशोध', 'तंतू' आदी साहित्य अनुवादित केले आहे. तसेच आगामी काळातही भैरप्पा यांचे इतरही साहित्य त्या अनुवादित करत आहेत. याशिवाय त्यांनी पूर्णचंद्र तेजस्वी यांचे 'गूढमाणसं', 'चिदंबर रहस्य', 'मायामृग' इत्यादी, तर गिरीश कर्नाड यांचे 'नागमंडल', 'तेलदण्ड' आदी साहित्य अनुवादित केले आहे. भविष्यातही त्यांचे अनुवादित प्रकल्प प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. 'केतकरवहिनी' ही त्यांनी लिहिलेली स्वतंत्र कादंबरी. कुलकर्णी यांना १९८९ साली केंद्र

साहित्य अकादमीचा पहिला अनुवाद पुरस्कार, १९९० साली 'महाराष्ट्र-गौरव पुरस्कार' ('वंशवृक्ष'साठी), 'स. ह. मोडक पुरस्कार' ('पर्व'साठी), पुणे ग्रंथालयाचा 'वर्धापन पुरस्कार' असे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या अनुवादाच्या कार्यासाठी त्यांना १९९७ साली 'महाराष्ट्र फाउंडेशन'चा विशेष पुरस्कार, तर १९९९ साली 'स. ह. मोडक पुरस्कार' मिळाला आहे. तसेच मराठी व कन्नड समाजातले साहित्यिक-सामाजिक बंधुत्व वाढवण्यास हातभार लावल्याबद्दल १९९५ साली 'वरदराज आद्य पुरस्कार' मिळाला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यांचं 'संवादु अनुवादु' हे आत्मकथन नुकतंच प्रकाशित केलं आहे.




लेखक

**उमा कुलकर्णी**

*पंचावन्नपेक्षा जास्त उत्तमोत्तम कन्नड पुस्तकांचे अनुवाद करून मराठी साहित्याचे दालन समृद्ध केलेल्या उमाताईंच्या जीवनसंचिताचे सार म्हणजे 'संवादु-अनुवादु' हे आत्मकथन.*

*बालपणापासून त्या वर्तमानकाळापर्यंतचा त्यांच्या लेखनाचा व अनुवादाचा गुंगवून टाकणारा प्रवास त्या वाचकांपुढे सादर करतात. या आत्मकथनात विपुल अनुभव आहेत, विविध वळणे आहेत,*

*अनुवादकलेचे असंख्य पदर आहेत, जिवाभावाच्या व्यक्ती आहेत, अनेक थोर साहित्यिक आहेत आणि या सर्वांकडे सम्यक नजरेने पाहत स्वत:ला समृद्ध करणारी लेखिका आणि अनुवादिका आहे.*
*ती कधी चटका लावणाऱ्या आठवणी सांगते,*
*कधी गंभीर भाष्य करून चिंतनाला प्रवृत्त करते,*
*तर कधी निर्व्याज मिस्कीलतेने विनोदाचा शिडकावा करते.*
*या आत्मकथनात तक्रारीचा सूर नाही, ठुसठुसणाऱ्या जखमा नाहीत, माझे तेच खरे, असा दुराग्रह नाही. तर शांत नितळ समजुतीने जीवनाला भिडण्याची ताकद त्याच्या पानापानांत आहे.*
*हे आत्मकथन उमाताईंच्या जीवनानुभवापाशी थांबत नाही, तर ते वाचकांना अंतर्मुख करते, नातेसंबंधांच्या जपणुकीवर नवा प्रकाश टाकते आणि संपन्न जीवनदृष्टी देऊन वाचकांनाही समृद्ध करते.*

## मनोगत

सांगलीमधल्या अनुवाद कार्यशाळेच्या वेळी बोलताबोलता नेमाड्यांनी 'तुमचे अनुवादावरचे विचार मांडायची वेळ आलीये!..' असं म्हटलं. त्यानंतर 'लिहिलंच पाहिजे' असं गेली काही वर्षं मनात घोळत होतं. मनात आलं की विरूपाक्षांना ते सांगायचं, अशी माझी पद्धत.

माझी बडबड ऐकून विरूपाक्ष म्हणत होते, 'लिहायचं असेल तर लवकर लिही. हे तुझं पर्फेक्ट वय आहे.' कविता महाजन तिच्या पद्धतीनं काही सूचना देत होती. सांगलीच्या ताराबाई भवाळकर आपल्या परीनं मला त्याच दिशेनं ढकलत होत्या. २०१५च्या 'साधना साप्ताहिका'च्या जुलै महिन्यातल्या एका अंकात ताराबाईंनी आमची विस्तृत मुलाखत प्रकाशित केली; त्यानंतर 'साधना'चे संपादक श्री. विनोद शिरसाटही हेच, पण वेगळ्या शब्दांत म्हणाले.

तरीही माझं लेखन काही प्रत्यक्ष सुरू होत नव्हतं.

एक दिवस नेहमीप्रमाणे आम्ही दोघं घरालगतच्या चित्तरंजन वाटिकेत फिरायला गेलो होतो. तेव्हा तिथं सपत्नीक फिरायला आलेले 'साप्ताहिक सकाळ'चे माजी संपादक श्री. सदा डुम्बरे भेटले. तेव्हा आम्हा दोघांच्या याच गप्पा चालल्यामुळे त्यांच्याशी गप्पांमध्येही हाच

विषय निघाला. तेही म्हणाले, ‘‘खरंच! का सुरू करत नाही लिहायला? तुम्ही लिहायला पाहिजे.’’

मी म्हटलं, ‘‘कारण मला भरतवाक्य सापडत नाही!’’

ते म्हणाले, ‘‘त्यासाठी थांबू नका. तुम्ही लिहीत गेलात की तेही आपोआप सापडेल.’’

यावर मी म्हटलं, ‘‘आमचे अनुवाद आणि आमचं जीवन इतकं एकमेकात मिसळून गेलंय की ते वेगळं काढणं मला तरी शक्य नाही! माझ्या लेखनावरून तटस्थ नजर फिरवून द्यायची हमी देत असाल, तर उद्याच सुरू करते.’’

त्याप्रमाणे त्यांनी हमी देताच मी लगोलग लिहायला सुरुवात केली आणि दोन-अडीच महिन्यांत लेखन संपलंदेखील. कबूल केल्याप्रमाणे श्री. डुम्बरेंनी त्यावरून तटस्थपणे नजर फिरवून काही सूचना केल्या. तसंच मुंबईच्या डॉ. अंजली जोशी या तरुण मैत्रिणीनंही वाचून समाधान व्यक्त करत ब्लर्बही लिहून दिला. आता याच्या प्रकाशनाची जबाबदारी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’नं घेतली आहे. अनुवाद प्रकाशनात सिंहाचा वाटा असलेल्या या संस्थेनं ही जबाबदारी स्वीकारली, हे उचितच झालं.

या सर्व प्रकारात, खरोखरच माझ्या अपेक्षेप्रमाणे ‘भरतवाक्य’ मिळालं की नाही ठाऊक नाही! पण जे लिहिलंय ते समोर आहे.

**सौ. उमा वि. कुलकर्णी**

*उमाताई हे अनुवादाच्या क्षेत्रातील अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्व. आपल्या अनुभवांविषयी, जीवनाविषयी वाचकांशी संवाद साधताना अनेक प्रसिद्ध/अप्रसिद्ध व्यक्तींबद्दल, ठिकाणांबद्दल त्या मनापासून बोलतात. कमल देसाई यांच्याबद्दलही त्या आत्मीयतेने लिहितात. लेखनप्रक्रिया, अनुवाद, काही लेखकांची वैशिष्ट्यं, त्यांचं साहित्य, मधूनच थोडं चिंतन, त्यांचं आणि विरूपाक्ष यांचं सहजीवन इ. अशा या अनेकपदरी, भावसंपन्न, प्रसन्न आणि एक अनुवादक म्हणून अनुभवसंपन्न प्रवासाची अनुभूती म्हणजे ‘संवादु अनुवादु’. या आत्मकथनातील हा एक रोचक आणि चिंतनपर अंश...*

जेवणानंतर आम्हा दोघांची पत्त्याचे दोन डाव टाकायची अनेक वर्षांपासूनची सवय आहे. समोर टीव्हीवरच्या दुपारच्या बातम्या ऐकत ऐकत दर्प यांनी शिकवलेल्या 'ओपन रमी'चे दोन डाव होईपर्यंत छान झोप येते, असा आमचा अनुभव आहे! त्यामुळे त्या वेळी जे कुणी घरात असेल, त्यांनाही सहभागी करून घेऊन खेळायची आमची पद्धत. कमलताई त्यात सहभागी झाल्या, तरी फारशा रमायच्या नाहीत. पण त्यांना आमचं खेळणं आवडायचं. 'एखादं रिच्युअल असल्यासारखे तुम्ही खेळता!..' असं त्या म्हणायच्या. आम्ही या पत्त्याच्या खेळाला दिलेलं 'राष्ट्रीय कर्तव्य' हे नावही त्यांना आवडायचं. या नावाचं स्फूर्तिस्थान मात्र 'सूर्याची पिल्लं' हे नाटक!

सकाळी उठल्या उठल्या विरूपाक्षांनी केलेला चहा पिऊन आम्ही दोघंही लिहायला बसायचो. त्या जाग्या होऊन त्या खोलीत यायच्या आणि म्हणायच्या, ''कित्ती छान आहे हे!''

एकदा काहीतरी गप्पा मारताना शिवराम कारंतांचा विषय निघाला. हा विषय आम्हा दोघांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा! त्या म्हणाल्या, ''तुमच्या लेखकांविषयी किती आदर ठेवता तुम्ही! मला तुमच्या लेखकांचा हेवा वाटतो.''

त्यांना कारंतांविषयी आदर होता, तेजस्वी आवडायचे, यू.आर. अनंतमूर्तींना त्या 'आमचा लेखक' म्हणायच्या. आमच्या एकूण अनुवाद कार्याविषयी त्यांना अपरिमित कौतुकही होतं. 'तुम्ही किती काम करता! मी आळशी आहे बघ!' असंही म्हणायच्या.

पण त्यांना भैरप्पांविषयी मात्र राग होता. एकदा त्या भैरप्पांच्या 'पर्व' या महाभारतावर आधारित कादंबरीवर तुटून पडल्या. 'तुझ्या भैरप्पाला महाभारत कळलंच नाही..' असं म्हणाल्या. कादंबरीत भैरप्पांनी सगळे चमत्कार काढून टाकले, यामुळे त्या खवळल्या होत्या! ''महाभारताचे ते सगळे दागिने होते! भरजरी वस्त्रं होती. ती काढून यानं महाभारताला उघडंवाघडं करून टाकलंय.'' असं त्यांचं म्हणणं.

हे सगळं ऐकून मी फारच अस्वस्थ झाले. जवळजवळ रडकुंडीला आले. कारण मी मुळातच माझ्या सगळ्या अनुवादांमध्ये पराकोटीची गुंतलेली असते. तेव्हा तर फारच गुंतायची. मला 'पर्व'च्या अनुवादानं तर अपरिमित आनंद दिला होता. 'पर्व'चा अनुवाद आजही माझा आवडता अनुवाद आहे.

यानंतर मी काही कामासाठी पु.लं.च्या घरी गेले होते. नाव न घेता

(कारण कमलताईही आमच्या लाडक्याच!) मी ही प्रतिक्रिया त्यांना सांगितली. ते म्हणाले, ''आपण तिकडे लक्ष द्यायचं नसतं! कारण गांधींना भारत समजलाच नाही, असं म्हणणारेही आपल्याकडे असतात.''

कमलताईंबरोबरच्या या अनुभवानं माझ्यात मात्र एक फरक झाला. त्या वेळेपर्यंत माझ्या अनुवादित पुस्तकात मी इतकी गुंतलेली असे, की कुणी त्याविरुद्ध काही म्हटलं की माझा पारा चढायचा, वाईटही वाटायचं. पण कमलताईंना आमच्याविषयी वाटणारी आस्था पदोपदी जाणवत होती आणि विषय निघेल तेव्हा 'पर्व'वरचा रागही! त्यांची ओळख झाल्यानंतरही मी भैरप्पांच्या कादंबऱ्या मराठीत आणत राहिले, तेही तितक्याच मनापासून! तरीही त्यावरून कमलताई उगाच कधी वाकड्यात शिरल्या नाहीत किंवा भांडल्याही नाहीत. आणि त्यांनी आपलं 'पर्व'विषयीचं मतही बदललं नाही.

त्यानंतरही अनुवाद करताना मी पूर्वीसारखीच गुंतलेली असले, तरी वाचकांची मतंही माझ्यासारखीच असली पाहिजेत, या अट्टहासातून मोकळी झाले. माझं मत काहीही असलं तरी इतरांची मतं वेगळी असू शकतात, हे मान्य करायला शिकले.

मिथकं आणि त्याविषयी कमलताईंना असणारी आस्था लवकरच मला समजत गेली. लोककथांविषयीही त्यांना ममत्व होतं. आपल्या काही कथांमध्येही त्यांनी काही मिथकं तयार केल्याचं माझ्याही वाचनात आलं. त्यांना भुताच्या गोष्टींचीही भरपूर आवड. त्यात एखाद्या कथेतलं छान भूत असेल तर त्यांना प्रेमाचं भरतंच येई!

एकदा त्यांनी आम्ही दोघं आणि अवचटांसमोर आमच्या विनंतीवरून 'अस्तित्ववादा'वर व्याख्यान दिलं होतं. तसंच एकदा सौंदर्यशास्त्रावरही फार छान बोलल्या होत्या. एकदा इंग्लिश साहित्यातल्या महाकाव्यांचे दाखले देत त्यांनी समाजात नैतिकतेच्या कल्पना कशा बदलत गेल्या, हेही सांगितलं होतं. तसंच एकदा त्यांनी त्यांच्या 'काळा सूर्य' आणि हॅट घालणारी बाई' या दोन्ही कादंबऱ्या स्वतः वाचून दाखवल्या होत्या!

त्यांच्या तोंडून 'हॅट घालणारी बाई' ऐकताना मला एका प्रश्नाचं उत्तर मिळालं. त्यातल्या अष्टकोनी हॉलचं वर्णन ऐकताना, आमच्या घरी पहिल्यांदा आल्या तेव्हा 'तुमच्या घरानं मला स्वीकारलं,' असं का म्हणाल्या असतील, हे माझ्या लक्षात आलं.

त्यांचे हे उपक्रम इतके अचानक सुरू होत की आम्ही ते का टेप करून ठेवलं नाही, याची आम्हाला नेहमीच हळहळ वाटत राहायची. पुन्हा त्याच विषयावर बोला म्हणून सांगितलं, तर ते त्यांना जमायचं नाही आणि त्यांच्या बोलण्यातला शब्द न् शब्द टिपून ठेवण्यात आम्हीही कमी पडलो.

विरूपाक्ष झोपल्यावर कमलताईंच्या आणि माझ्या वेगळ्या गप्पा व्हायच्या. त्यात बऱ्याच वेळा घरगुती विषय असायचे. त्यांच्या बोलण्यातून त्यांचे त्यांच्या भावांबद्दलचे आणि भाचरांबद्दलचे गाढसंबंध समजायचे. वेड्या मुलाचं दुःख भोगणाऱ्या बहिणीविषयीचं पिळवटून जाणं समोर यायचं. सांगलीत घडलेल्या एका घटनेमुळे त्या अतिशय घाबऱ्या असायच्या. हळूहळू त्यांच्यात मुरलेली ती भीती विरत गेली.

त्या आमच्या घरी आलेल्या असताना एकदा मी त्यांच्याशी अनुवाद या विषयावर बोलू लागले. दुसऱ्या दिवशी माझं अनुवादाच्या संदर्भात एक व्याख्यान होतं. म्हणून मी अनुवादाचा विषय काढला. त्या दिवशीचा त्यांचा मूड वेगळाच होता. त्या म्हणाल्या, ''योग्य अनुवाद करणं तर दूरच राहिलं, लेखकाला तरी प्रत्येक वेळी आपल्या मनातलं सगळं जसंच्या तसं मांडता येतं का, हाच एक मोठा प्रश्न आहे!.. भाषा हेच अनेकदा माणसाच्या अनेक संकटांचं मूळ असतं.''

अनुवादावर बोलायचं असल्यामुळे त्या दिवशी मला या विषयाच्या इतक्या मुळाशी जाणं परवडणारं नव्हतं; पण कमलताईंच्या या मुद्द्यामुळे भाषा आणि त्यातून 'व्यक्त' होणं या प्रक्रियेतल्या भाषेच्या मर्यादांची मला तीव्रपणे जाणीव झाली. त्याचबरोबर अनुवादाविषयीचा 'भाबडेपणा'ही ओसरला.

त्या अनेकदा 'काळ' या संकल्पनेवरही बोलायच्या. उदाहरणार्थ, दोन वस्तू ठेवल्या की त्यामध्ये स्पेस तयार होते. त्या दोन वस्तू नसतील तर स्पेस या शब्दालाच अर्थ नाही. त्या दोन वस्तू दोन ग्रहही असू शकतील. तसंच एखादा सजीव माणूस काही वर्षांपूर्वी असतो, परवा असतो, काल असतो, आजही असतो. हा भेद समजण्यासाठी काळाची मदत घ्यावी लागते. जर मानव असेल तर पृथ्वी स्वतःभोवती फिरते, सूर्याभोवती फिरते आणि त्यातून क्षण, मिनिट, तास, दिवस, महिना, वर्ष, संवत्सर बनतं, त्यानं बनवलेलं वाळूचं घड्याळ, लंबकाचं घड्याळ किंवा डिजिटल घड्याळयालाही काही

अर्थ असतो. माणूस आहे म्हणून त्यानं स्वतःभोवती फिरणाऱ्या पृथ्वीच्या फेरीला दिवस म्हटलं, सूर्याभोवतीच्या फेऱ्याला वर्ष म्हटलं आणि आकाशगंगेतल्या ताऱ्यांमधल्या अंतराच्या मापनासाठी म्हणून प्रकाशवर्ष काढलं; पण त्या पलीकडे अवकाशात गेल्यावर कसला आलाय काळ?

माझ्यासारखीला तर त्या पलीकडच्या काळाची कल्पना करणंही शक्य नाही.

त्या दृष्टीनं बघायचं झालं तर मी जन्मले, मी अमूक वर्षी लिहायला सुरुवात केली, अमूक वर्षी अनुवादाला सुरुवात केली, अमूक-अमूक झालं या म्हणण्याला तरी काय अर्थ आहे? मग या लेखनाचा खटाटोप कशासाठी? कमलताईंना तर माझं हे लिहिणं 'खुळेपणा'च वाटला असता! त्यांनी मला 'खुळी' हीच पदवी दिली असती.

जुन्या घटना आठवताना मला तर तिथं, त्या प्रसंगी पोहोचल्यासारखं वाटतं. स्मृतीची ही किमयाही अद्भुत आहे. जे. कृष्णमूर्तींचे तत्त्वज्ञानावरचे अनेक विचार एकीकडे ऐकताना स्वतःही वर्तमान काळात राहण्याचं प्रतिपादन करायचं! दुसरीकडे जुनंपानं आठवत लिहीत राहायचं! ही विसंगती नाही का?

कदाचित अशा अनेक विसंगतीनं भरलेल्या आयुष्यालाच जीवन म्हणत असावेत. या विसंगती दूर करणं, हेही आयुष्यभराचंच काम असतं ना! कदाचित या लेखनामागंही तसाच एखादा हेतू नसेल? एक अनुवादिका म्हणून साहित्य क्षेत्रात वावरताना, वयाच्या प्रौढत्वाबरोबर अनुवादानंही मला काही शिकवलंय का, याचा वेध घेण्याचा हा एक प्रयत्नही असेल; की हा सारा भूतकाळापासून सुटका करून घ्यायचा प्रकार असेल?

अनुवादाच्या संदर्भात एकदा कमलताई त्यांचा अनुभव सांगत होत्या. त्यांच्या एका कथेचा अनुवाद करण्यासाठी अमेरिकेतून एक विद्यार्थी आला होता. त्याला त्यासाठी एवढी शिष्यवृत्ती मिळाली होती की त्यात त्यानं पुण्यातल्या भांडारकर रोडवर एक फ्लॅट भाड्यानं घेतला होता आणि तो दररोज रास्ता पेठेत राहणाऱ्या कमलताईंना भेटून, त्यांच्याशी चर्चा करून आपला अनुवाद पुढे नेत होता!

मला त्या अनुवादकाचा पराकोटीचा हेवा वाटल्याशिवाय राहिला नाही! सृजनात्मक लेखन करणाऱ्या लेखकाच्या प्रत्यक्ष भेटीतून कलाकृतीच्या

आकलनात अनाकलनीय भर पडते आणि ती अनुवादकाच्या दृष्टीनं अत्यंत अनमोल असते, हे त्या विद्यापीठानं जाणून घेतलं! अनुवादकाच्या असल्या अनवट अडचणी जाणणारं कुणीतरी असतं तर!

अनंतमूर्तींच्या 'अवस्था' या कादंबरीचा अनुवाद पुरा झाला आणि त्यांच्या रास्ता पेठेतल्या मठीत त्याचं वाचन करायचं ठरलं. दोन दिवस ते चाललं होतं. आम्ही दोघं आणि अवचट असे तिघंही त्यांच्या घरी जायचो. (आम्हा चौघांची ही 'चौकडी' जमली होती, पण ती 'चांडाळ चौकडी' नव्हती!) अनंतमूर्ती हा कमलताईंचा लाडका लेखक असल्यामुळे त्या अगदी मन लावून दोन्ही दिवशी ऐकत बसल्या होत्या.

तसंच पूर्णचंद्र तेजस्वींच्या 'चिदंबर रहस्य'चं वाचन संपलं. त्यात अखेरीस प्रणयी जोडपं वाचतं आणि पाटील हा संशोधक गावाला लागलेल्या आगीत गुदमरून-होरपळून मरून जातो. हे ऐकून कमलताईंना अश्रू आवरेनात. त्या कळवळून म्हणाल्या, ''प्रत्येक वेळी प्रणयी युगुलच का जगावं? एखाद्या वेळी तरी पाटलांसारखा संवेदनशील शास्त्रज्ञ वाचलेला का दाखवू नये? प्रत्येक वेळीच भावनेपुढे बुद्धीचा पराभवच का?''

अनंतमूर्तींच्या 'भारतीपूर' या अत्यंत गाजलेल्या कादंबरीचा अनुवाद करून झाल्यावर एकदा मीही त्यांना विचारलं, ''तुमचे अनंतमूर्ती असं का लिहितात? कादंबरीच्या सुरुवातीला काही घडतं. त्याचा संदर्भ कादंबरीत पुढं कुठंतरी यायला नको का? असे कसे ते धागे मध्येच सोडून देतात?''


यावर त्या म्हणाल्या, ''म्हणूनच मी त्याला आमचा लेखक म्हणते! एकदा एखाद्याविषयी विशिष्ट विचार सांगून झाले की त्याचं प्रयोजन संपलं! पुन्हा तेच-तेच कशाला सांगायचं? पाल्हाळपणा लावायचा?''

❖

नवंकोरं

### हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा

# डेथ ऑफ अ गॉसिप




लेखक
**एम. सी. बीटन**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**


**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

खळबळजनक लिखाणामुळे अल्पावधीत प्रसिद्धीस आलेली विधवा पत्रकार लेडी जेन विंटर्स जॉन कार्टराइटच्या मासेमारी प्रशिक्षण वर्गात येऊन दाखलहोते.
इतरांच्या जीवनातली गुपितं फोडण्यात तिला विकृत आनंद मिळत असतो. तिच्या तिखट जिभेमुळे आणि आक्रमक वृत्तीमुळे अनेक जण घायाळ होतात.
एक दिवस जॉन कार्टराइटच्या गळाला सामन माशाऐवजी लेडी जेनचं फुगलेलं प्रेत लागतं व एकच हाहाकार उडतो! मग हॅमिश मॅक्बेथ शांतपणे एकेक गुपित उलगडत जातो....

# पुस्तक परिचय



स्वाती चांदोरकर यांचा जन्म २१ जून १९६१ रोजी झाला. त्यांनी गृहविज्ञान या विषयात बी.एस्सी. ही पदवी प्राप्त केली आहे. वपुंची कन्या ही ओळख त्यांनी विविध प्रकारचे लेखन करून सार्थ ठरवली आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यांच्या 'युथनेशिया', 'पवित्रम्', 'एक पायरी वर', 'फॉरवर्ड अँड डिलिट' (प्रसादबन पुरस्कार, नांदेड २०१४), 'अनाहत', उत्खनन' या कादंबऱ्या, 'गोल गोल राणी', 'सेलिब्रेशन', 'काळाकभिन्न', '...आणि विक्रमादित्य हरला'(म.सा.प. पुरस्कार २०१४, पुणे मराठी ग्रंथालयातर्फे 'राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार' २०१४) हे कथासंग्रह आणि 'वपु' हे व्यक्तिचरित्र प्रकाशित केलं आहे. याखेरीज 'मीरेच्या प्रेमतीर्थावर', 'मीरा एक वसंत आहे', 'मीरेची मधुशाला', 'मीरा श्यामरंगी रंगली', 'मृत्यूचं अमरत्व', 'मृत्यायुषी', 'नानक संसारी संन्यस्त', 'नानक सूर संगीत एक धून', 'नानक निरंकारी कवी', 'नानक परमात्म्याचा नाद ओम्कार' या ओशोंच्या पुस्तकांचा अनुवाद त्यांनी केला आहे. 'वपु : एक अमृतानुभव' या कार्यक्रमाची निर्मिती त्यांनी केली. संगीत, नृत्य, रेकी, पेंटिंग, नाट्याभिनय यामध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवलं आहे. 'हिज डे' ही त्यांची नवीन कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकतीच प्रकाशित केली आहे.




लेखक

**स्वाती चांदोरकर**

खुदासे माफी मांगनी है अब ।
एक दरख्वास्त है उसकी चौखट पें ।
मैंने उसके साथ गद्दारी की ।
उसने मुझे भेजा यहाँ, इस धरतीपर एक लडका बनाके,
और मैं हो गयी लडकी, बिना उसकी इज़ाजतसे ।
गलत! मैंने उसका तोहफा कुबूल नहीं किया ...!
घराण्याला कलंक. समाजातली प्रतिष्ठा.
लोक काय म्हणतील? तू जा बाबा घरातून...
आपला संबंध संपला ... अशांनी काय करायचं?
इथे यायचं - गुरू करायचा.
पूर्णत्वाने हिजडा नसलेल्याने मग पूर्ण हिजडा व्हायचं आणि ...
सेक्सवर्क ... चक्रात अडकायचं... घर नाही.
नाती नाहीत. फक्त गुरू आणि त्याचे इतर चेले... आणि
मग इथेच मरायचं... बेवारस...

# *प्रस्तावना*

प्रिय स्वातीताई,

एका दाहक अनुभवातून प्रत्यक्ष जात असल्याची प्रचिती देणारं लेखन फार क्वचित आयुष्यात येतं. आपण प्रकाशनपूर्व प्रस्तुत लेखन माझ्या हाती सोपवलंत आणि 'अशा प्रकारचे' एक जग माझ्यासाठी वाट पहात आहे, याची कल्पना येण्यापूर्वीच मी आपण व्यक्त केलेल्या जगाचा सहप्रवासी झालो.

पांढरपेशा जगाच्या सुखवस्तू काचेपलीकडे आपल्यातलीच कित्येक मनं निरपराधी असूनही ज्या प्रकारचं आयुष्य जगतात, त्याची खरोखर लेखक असूनही मला कल्पना नव्हती. ऐकीव—कुठेतरी तुरळक वाचलेले ... इतक्या पुरतेच माझे हे तिसऱ्या मनाविषयीचे ज्ञान होते. काही वेळा तर वाटते, अज्ञानामुळे मी या मनांबद्दल खूपच अमानवीपणे पाहिले असेन; पण स्वातीताई,आपल्या 'हिज डे'नं माझी माणूस म्हणून दृष्टीच बदललीत, अधिक निकोप केलीत.

कादंबरीचा पट निवडून आपण सत्यातील जग व्यक्तिरेखांच्या सुखदुःखांनी, नात्यांतील ताणेबाणे, आग्रह-दुराग्रह, शोधणाऱ्या तऱ्हांनी रेखीव गुंफलेत. जग सत्यातील असूनही त्याची केवळ 'बातमी' न होता, त्यात मनांच्या अनपेक्षित, अतर्क्य गूढधाग्यांचे, स्फोटांचे रंग भरलेत.

मानवी आयुष्याच्या पाऊलवाटा – हाती नसलेली लैंगिकता, विकृती-प्रकृतीच्या झोक्यांनी समाजमान्यता कशा प्रकारे निश्चित करतात याचे भेदक चित्रण कादंबरीतील पानापानांत भरून आहे. तो आणि ती – यांच्याशिवाय असलेल्या तिची आणि त्याची भावनांची प्रक्षोभता, अस्वस्थता आणि स्वतःचं आयुष्य तरीही निर्धाराने जगण्याची असोशी आपण संवेदनशील मनोवैज्ञानिकाच्या नजरेनं टिपली आहे व कलावंताच्या सृजनशील वात्सल्याने ती जपली व जोपासली आहे,

विज्ञाननिष्ठेचा आधार, प्रत्यक्ष त्यांच्या वस्तीत जाऊन, असंख्य व्यक्तिरेखांना प्रत्यक्ष भेटून आपण 'हिज डे' आकाराला आणली आहे. हा आकार साकारताना विशेषतः 'लेखक' म्हणून आपण ज्या भाषेचा अस्सल डंख स्वीकारला, त्या तुमच्या लेखणीला मी जाहीर मुजरा करतो. संवादातील साधेपणा अक्षरशः कानांतून मनात तप्त लाव्हाप्रमाणे ठिबकत राहतो. तो पेलताना वाचणारा जाद्रतो तर प्रत्यक्ष 'लेखक' म्हणून आपण त्या भूमिकेला न्याय देताना मनाची कोणती मूस तयार केली असेल, याचा अंदाज येत नाही.

कादंबरीचा प्रवाह पुढे सरकण्यासाठी निवेदक म्हणून मनोवैज्ञानिकाचा आधार खूपच सहज झाला आहे, आणि एकीकडे संवेदनेनं गुंतत जाणं आणि

पुन्हा निष्ठेनं अलिप्त होऊन 'त्यांच्या' जगण्याचं मर्म टिपणं या दोन्ही गोष्टी कलात्मकतेने घडल्या आहेत.

समाजात पण तिसऱ्या लैंगिकतेला अजूनही समाजमान्यता न मिळाल्याने गावकुसाबाहेरचं जगणं जगणाऱ्या जीवांचं शोषण आपण विलक्षण तरलतेने मांडलं आहे. काही वेळा शोषितही एकमेकांचं शोषण करीत एक वेगळीच आक्रमकता निर्माण करीत आहेत, असे धक्कादायक चित्रण आले आहे.

'हिज डे' मधील वेगवेगळ्या 'समारंभातील' वातावरण आपण कॅमेऱ्याच्या सशक्त संवेदनेनं टिपलं आहे. ओघाने येणाऱ्या दंतकथा, पुराणसंदर्भ यामुळे व एरव्ही अजिबात कळले नसते असे या जगातील पारिभाषिक शब्द आम्हा वाचकांना थबकून टाकतात. चकित करतात. खरे तर मराठी भाषेच्या मुख्य प्रवाहापासून हे शब्दही त्यांच्यासारखेच 'काठा'वर रामाची वाट पाहत राहिले आहेत असे जाणवले. बधाई, खेटी, चाकलेट, धुराणपिटाण, धामनी, ठप्पर- असे शेकडो अप्रचलित शब्दही जगणं समूळ व्यक्त करण्यासाठी किती प्रभावी काम बजावतात, याची जाणीव या कलाकृतीत होते.

कणभरही अतिशयोक्ती न करता मी सांगेन 'हिज डे' ही मराठीतील नव्हे, तर भारतीय भाषांतील सर्वोत्कृष्ट कादंबरीच्या परंपरेत मानदंड व्हावी, अशी कादंबरी आहे. आधुनिक मराठी कादंबरी जगात इतके धीट पण बटबटीत नसेलेले, वैज्ञानिक असूनही- तर्ककठोर – रुक्ष नसलेले व करुणा असूनही भाबडे नसलेले लेखन माझ्या वाचनात नाही.

'हिज डे' हा समाजातल्या 'अनैसर्गिक' समजल्या गेलेल्या पण मनोकल्लोळातून आलेल्या नैसर्गिक ऊर्मींना साक्षात जगू पाहणाऱ्या असंख्य जीवांना दिलासा आहे. प्रेमभावनेच्या सांकेतिक भिंती ओलांडून एकरूपतेसाठी 'सर्वस्वा'चे दान करून आपले अस्तित्व समर्पित करणाऱ्या काळोखातल्या घुसमटीवर घातलेली समजूतदार फुंकर आहे. स्वातीताई, आपल्या हातून हे उपेक्षितांचे नवेच अंतरंग कलात्मक घाटातून व्यक्त झाले आहे.

वाचताना मी असंख्य वेळा थबकलो, डोळ्यांतले अश्रू वाहू दिले. 'त्या' दाहक घटनांना पचवताना मनाची व वयाची ज्येष्ठता असूनही मी सावरू शकलो नाही. 'स्त्री'चं 'पुरुष' होणं किंवा 'पुरुषाचं स्त्री' होणं हे केवळ लिंगपरिवर्तन नसतं तर स्वत:तूनच स्वत: वीणं आणि पुनर्जन्माच्या आगीनझळा सहन करीत पुन्हा जीवनाला घट्ट धरून ठेवणं असतं. 'श्यामू'चं 'श्यामली' होणं हे किती अग्निदिव्य आहे ते वाचताना एवढं अंगावर येतं!.. प्रत्यक्षात?...छे! अशक्य विचार करणं.

एकदा नव्हे – पुन्हा पुन्हा आणि पुन्हा अधूनमधून मी 'हिज डे' वाचली.

अजून शोध संपलेला नाही. मनाचा थांग सापडत नाही. ‘हिज डे’ भाषेच्या, संवादाच्या, वातावरणाच्या, कथानकाच्या चिवट धाग्याच्या संदर्भाच्या अनेक तंतूंच्या दृष्टीने समृद्ध कादंबरी झाली आहे. ‘उत्तम’ असा शेरेबाजीची नाही, कारण यातलं जगणं हे नियतीनं दिलेल्या एका जगावेगळ्या देण्यांचं आहे. ‘देणं’ असं की जे न मागता पदरात मिळालं आणि पदरच जाळून गेलं, असं हे देणं!

कादंबरीच्या अखेरी ‘निवेदकाची’ सारी अलिप्तता मानवी पातळीवर येते. आपल्या घरात तर हे जग निर्माण होणार नाही ना, या भयाने आत लागलेला सुरुंग ‘हिज डे’ला अधिक वेगळे परिमाण देतो.

असो...

खरंतर पत्र लिहायला म्हणून बसलो, पण त्याही पलीकडे वाहा(व)त गेलो. एका सर्वोत्कृष्ट निर्मितीचे सर्व श्रेय आपणास देऊन ती प्रकाशनपूर्व वाचनास दिल्याबद्दल धन्यवाद!

**- प्रवीण दवणे**

*हिजड्यांचं विश्व...त्यांची समाजाकडून होणारी हेटाळणी...त्यांची भावनिक आंदोलनं...समलिंगी व्यक्तींमधील आकर्षण...लिंगबदल शस्त्रक्रिया...पुरुष असूनही स्त्रीसारखं राहावं-वागावं असं वाटणं किंवा स्त्री असूनही पुरुषासारखं राहावं-वागावं असं वाटणं...हिजड्यांच्या विश्वाचं अंतर्बाह्य, मनोकायिक दर्शन घडविणारी... त्यांच्या मनोवेदनांचा एक व्यक्ती आणि एक सामाजिक घटक या दृष्टिकोनातून वेध घेणारी स्वाती चांदोरकरांची ‘हिज डे’ ही नवीन कादंबरी...या कादंबरीतील मनाला पीळ पाडणारा हा काही अंश...*


हे दिवस म्हणजे काहीतरी वेगळं घडण्याचे आहेत. आकीफाहचं ऑपरेशन झालं. तिला हवी तशी तिची योनी झाली. गंमत आहे. एकीला योनी नको आणि एकीला योनी हवी. यातना दोन्ही ठिकाणी आहेत. हे मी इतकं सहजी बोलते आहे, की योनी मिळाली, योनी नकोशी झाली... पण क्षणात मांडलेला हा विचार प्रत्यक्षात उतरायला किती वेळ, किती कष्ट आणि मनाचे किती चढउतार झाले...

सुक्कीचं ऑपरेशन झालं आणि त्याची भीती कायमची मावळली. आता तो कधी आई होणार नाही. त्याच्यासाठी आजचा दिवस म्हणजे पुनर्जन्म

नवंकोरं

**हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा**

# डेथ ऑफ अ हसी




लेखक
**एम. सी. बीटन**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

**किंमत : १७०/-रु.। पोस्टेज :५०/-रु.**

श्रीमंत मॅगी बेअर्ड... प्रेमळ नव्हती, दयाळूही नव्हती आणि उदार तर मुळीच नव्हती. कोणे एकेकाळी ती अतिशय सुंदर दिसायची आणि आता बऱ्याच वर्षांनी मध्यमवयीन, लठ्ठ व बेढब झालेली मॅगी पुन्हा 'सुंदर मी होणार' म्हणू लागते... एकदा मॅगीची गाडी अचानक पेट घेते व गाडी मॅगीसकट आगीत भस्मसात होते, तेव्हा घातपाताचा संशय येऊ लागतो आणि संशयाची सुई तिच्या बंगल्यात राहणाऱ्या पाच पाहुण्यांवर फिरू लागते. सतत भीतीच्या सावटाखाली वावरणारी तिची भाची आणि तरुणपणीचे तिचे चार प्रियकर... हे पाचही जण कफल्लक असतात. त्या चारांपैकीच एकाशी ती लग्न करणार असते. मॅगीच्या गाडीत स्फोट घडवून आणण्याची पाचही जणांना संधी असते. अशा वेळेस खुनी नेमका कोण? हे शोधून काढण्यासाठी असाधारण निरीक्षणक्षमता, उत्तम व्यवहारज्ञान व मानवी मनाचा अचूक वेध घेणाऱ्या हॅमिश मॅक्बेथसारख्या व्यक्तीचीच गरज असते. एरवी सुस्त व आळशी असलेला, आपल्या वरिष्ठांच्या मनात मत्सर जागृत करणारा आणि शेजाऱ्यांची डोकेदुखी ठरलेला हॅमिश हातात खुनाची केस पडताच, एकदम वेगळ्या रूपात समोर येतो. खुनाचा छडा लावण्याची त्याची लोकविलक्षण पद्धत प्रत्यक्ष अनुभवण्यात वाचक गुंग होऊन जातो.

आहे. अजून शुद्धीत आलेला नाही; पण ऑपरेशन यशस्वी झालं. हेलीनाला कळवायला हवं. तिने बरीच मदत केली.

आता सावरी आणि सुक्कीचा संसार सुरू होईल. आता तो वस्तीत पण राहणार नाही. जाईल कुठेतरी. एक एक आयुष्य मार्गी लागत आहे. आनंद आहे.

ही किमया आहे सायन्सची. पूर्वी असं नव्हतं. कदाचित असेलही पण मला माहीत नव्हतं. मला सुक्कीला जेव्हा प्रथम बघितलं होतं तो सुक्की आठवला. उभार छातीचा, मोठे केस, सलवार-खमीज घालणारी सुक्की. 'सुक्की' आता यापुढे कुणी त्याला अगं सुक्की म्हणणार नाही.

रामसखा सकाळपासून बसला आहे इथे. कदाचित काल रात्रीपासून? दमलेला दिसतो आहे.

''होऊन राहिलं ना व्यवस्थित?''

''होय. रामसखा, तू घरी जा आता. सुक्कीला शुद्ध यायला वेळ लागेल. जेवून घे. आराम कर आणि मग ये. सावरी आहे इथे, तर काळजी करू नकोस. आणि मी पण आहे त्याला शुद्ध येईपर्यंत.''

''थांबून राहतो. पोर हाक मारील तर मी नसेन, वंगाळ वाटेल.''

''बरं. पण निदान काहीतरी खा आता.''

''येऊ का जाऊन खाली?''

''हो.''

''दीदी, सुक्की नक्की चांगला होणार ना?''

''झाला तो चांगला.''

''आता मी माझ्या आईला सांगू शकेन. सुक्की मुलगा आहे आणि त्याच्याशी मी लग्न करते आहे.''

''वडील नाहीत तुला?''

''नाहीत. मीच जबाबदार आहे त्यांच्या मृत्युला.''

''म्हणजे?''

''माझं सुक्कीवर प्रेम आहे, हे मी घरात ज्या दिवशी सांगितलं, त्या दिवसापासून त्यांनी माझ्याशी बोलणं सोडून दिलं. म्हणजे त्यांनी आधी मला खूप समजावलं; पण मी नाही समजले. 'एका मुलीवर एक मुलगी कधी प्रेम करते का? तू काय लेस्बियन आहेस? ही असली थेरं चालायची नाहीत, सांगून ठेवतो.' असं म्हणाले होते. मला मारलं होतं. मग मी त्यांना बरं वाटावं

म्हणून हो म्हणाले. आणि तरीही आम्ही भेटत होतो. आम्हा दोघांना फिरताना कुणी कुणी बघत असे; पण घरात येऊन ते काय सांगणार? कारण मी तर एका मुलीबरोबर फिरत होते. मग सुक्कीने मला सांगितलं की, तो ऑपरेशन करून घेणार आहे. मी हो म्हणाले. त्याला साथ द्यायची असं मी मनोमन ठरवलं. तो इथे आला. रामसखा त्याचा गाववाला.. तो हिजडा आहे, हे मला सुक्कीने सांगितलं होतं. आधी कसंतरी वाटलं. हिजड्याकडे राहायचं? पण सुक्कीसाठी ते मला मान्य होतं.''

''तुझं घर...''

''चांगलं मोठं आहे. आम्ही हायर मिडल क्लास आहोत. सुबत्ता आहे घरात.''

''एक विचारू? जात कुणाला विचारू नये असं म्हणतात, पण..''

''मी उच्च जातीतली आहे. इतकंच सांगते.''

''हरकत नाही.''

''माझे आई-वडील खूप शिकलेले आहेत. माझा भाऊ वकील आहे. म्हणजे आता वकील झाला असेल. आणि मी .. मी माझ्यासाठी त्या सर्वांना सोडून इथे आले.''

''इतकं प्रेम महत्त्वाचं वाटलं? ज्या घरात लाडात वाढलीस, इतकं प्रेम करणारे आई-वडील..''

''हो. खूप प्रेम आहे त्यांचं माझ्यावर. आमच्या घरात, म्हणजे पूर्ण कुटुंबात मीच एक मुलगी आहे. बाकी सर्व मुलं.. काकांना, मामांना..''

''म्हणजे तुझ्यावर संपूर्ण कुटुंबाचं प्रेम असणार.''

''आता होतं, असं म्हणावं लागेल.''-----

''का?''

''मी सांगितलं ना तुला दीदी, माझ्या वडलांच्या मृत्युला मी कारणीभूत आहे. सुक्की मुंबईत आला. त्याने ऑपरेशन केलं आणि मला कळवलं. मला किती आनंद झाला. आणि मी घरात सांगितलं की, सुक्की.. मी त्याचं नाव घेतलं आणि घरात एकच गोंधळ सुरू झाला. मी फसवलं सर्वांना मी बेइमान झाले.. आणि खूप काही. इतके बोल मला कधीच कुणी लावले नव्हते. मी त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला; पण नाही .. त्यात जात, पात.. त्याच्या वडलांची मिळकत किती? कोण माझी काळजी घेणार? आणि खूप काही; पण दीदी, खरं सांगू? जात पात बघून प्रेम होतं का? प्रेमाला काय

कळणार पैसा किती? मी सुक्कीशी जोडले गेले आहे, हे मला अगदी आतून समजत होतं. तो जेव्हा मुलगी होता तेव्हा त्याच्या काही अपेक्षा नव्हत्या .. म्हणजे सेक्स वगैरे.. त्याच्या मनाला खूप काही वाटलं असेल, नाही असं नाही पण कृती काहीही नव्हती आणि तरी आम्ही एकत्र होतो. या तारुण्यात प्रियकर असताना शारीरिक सुख काहीही नाही आणि तरीही अशा प्रियकराला सोडून जावंसं वाटत नाही, यातच सर्व काही आलं ना?''

''हो.''

''मी निघाले मग घर सोडून. सर्वांनी धमकावलं आणि तरीही मी मागे हटले नाही. आज ना उद्या त्यांना नक्की समजेल की, माझा निर्णय बरोबर होता असं मला वाटत होतं. मी मुंबईला आले. या वस्तीत राहू लागले. दीदी, मला हे असं वातावरण असतं हेच माहीत नव्हतं. असे लोक असतात, असे राहतात.. नव्हतं माहीत. खूप जड जात होतं असं राहणं; पण सुक्कीकडे बघितलं की सर्व काही मान्य.. मनाला हेच वाटत राहिलं. ''

''बाहेर तर पडले आणि एका आठवड्याने फोन आला माझ्या मोबाइलवर.. बाबा वारले ...!! धक्का बसला त्यांना. मी घराबाहेर पडले आणि त्याच रात्री त्यांना मोठा अ‍ॅटॅक आला, हॉस्पिटलला नेण्याआधीच ते गेलेले होते.''

''सावरी..''

''एका प्रेमाची जबरदस्त किंमत मोजली आहे मी.''

''का पण?''

''प्रेमाला कुठे का, कशासाठी असे प्रश्न समजतात? आई होती फोनवर.. म्हणाली, या घरात पुन्हा पाऊल टाकायचं नाही.''

''मग?''

''मग काय? इथेच राहायचं आहे. आज सुक्की पूर्ण पुरुष झाला..''

''नाही सावरी. पूर्ण पुरुष नाही.''

''माहीत आहे मला दीदी. मी वाचली आहे सर्व माहिती आणि ताईने पण सांगितलं आहे. मला कधीही मूल होणार नाही. मी कधी आई होणार नाही. कदाचित माझ्या आईने मला हा शाप दिलेला असेल.''

''रडू नकोस सावरी.''

''आज रडू दे. दीदी, सुक्कीला काहीही माहीत नाही. बाबा गेले, आईने घरात यायचं नाही असं सांगितलेलं.. काहीच माहीत नाही त्याला. आत्तापर्यंत

साठवून ठेवलं आहे मनात खोलवर. आज तू आहेस आणि रामसखा पण नाही इथे, तर बोलू दे सगळं, मोकळं होऊ दे मला, रडू दे, माफी मागू दे आणि प्रायश्चित्त कसं करू, हे कळू दे.''

''तुझी काय चूक? तुला अशीच व्यक्ती आवडावी हे विधिलिखित, तुझ्या आई-वडलांना हे क्लेश सहन करावे लागावेत हे विधिलिखित, सुक्की जन्मत: पुरुष नसणं, हे विधिलिखित आणि... रामसखा आला सावरी, सावर.. ..तर हा रामसखा आता पुन्हा एकटा जगणार.. हेही विधिलिखित...''

''आला का शुद्धीत?''

''आला असेल. अजून त्याला बाहेर आणलं नाही.''

''जाऊन राहा तू आता चमेली. आणि सावरीला पण घेऊन जा. येऊन राहा संध्याकाळी. आता मी आहे इथे. काही जरूर लागली तर कौआ आहेच ना..''

दोघी बाहेर पडलो. इतक्या लहान वयात आपल्याला नक्की काय हवं आहे हे सावरीला कसं समजलं? आणि त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजायची ताकद तिच्यात आली तरी कुठून?

''दीदी, एक सांगू? जर मी अशी असते, सुक्कीसारखी तर माझ्या घरातल्यांनी माझा सांभाळ केला नसता. फार चौकटीतले आहेत सर्व. त्यांना ती चौकट मोडता येणं या जन्मात तरी शक्य नाही; पण मी ती मोडली. नाही पैसा, नाही उत्तम घर, पण सुक्की आहे. त्याला जाण आहे माझी. नोंद घेतली जाणं हे खूप आवश्यक आहे ना? तो माझ्या प्रत्येक गोष्टीची नोंद घेतो. निदान आत्तापर्यंत तरी घेत आला आहे. पुढचं माहीत नाही.

''पण तरीही मला तो हवा आणि त्याला मी हवी.

''तो आता पुरुष झाला आहे, हे मी घरी फोन करून सांगणार आहे. कदाचित.. माहीत नाही.''

''घर आलं सावरी. आता शांत झोप घरी जाऊन. की माझ्याकडे येतेस?''

''नको. आज इतक्या वर्षांनी एक स्वप्न पूर्ण होतं आहे. मला तो आनंद एकटीला उपभोगायचा आहे आणि दीदी, मला माहीत आहे की, अजून खूप काही बाकी आहे. सुक्कीला अजून खूप काही सहन करायचं आहे; पण निदान त्याने त्याच्या मनाचे दोन पल्ले तर गाठले..!!''

सावरीच्या हिमतीला मी मनातल्या मनात सलाम केला. त्याच क्षणी मला

जया आठवली. तीसुद्धा अशीच आहे. जे आहे ते मान्य करणारी आणि हव्या असलेल्या सुखासाठी आणि अस्तित्वासाठी बंड करणारी.

या लोकांत काही वेगळीच ताकद असते की काय? इतके कणखर कसे हे? हालाची चमेली.. आईचा शोध न घेणारी. भाऊ कुठे आहे? अशी चिंता करत न जगणारी. असतील आपापल्या ठिकाणी .. सुखात, दुःखात.. कसेही. त्यांचा तो निर्णय आणि माझा हा निर्णय... इथेच राहण्याचा. शामियाना चालवण्याचा...

''चमेली दीदी, कहां थी तुम? कबसे राह देख रही हुं.''

''क्यों? क्या हुआ? आओ, बैठो.''

''दीदी, एक बात कहो, मैं हिजडा हुं, तो मैने मान लिया हैं ना के मैं हिजडा हुं.''

''हां सलोनी, तो?''

''आज मैं मांगने गयी थी. तो सिग्नल था, तो साईडपे खडी थी. इस्कुल छुट गयी तो सब बच्चे आ गये रोड पे. उनमेंसे आठ-दस लडके आये और मुझे छेडने लगे. मेरी धामनी को दबाया, मेरी पीठ को चुटकी की, और मेरे वॉटलको मचोडा, दीदी, देखो बच्चे क्या कर रहें हैं. आठ-दस थे तो मैं अकेली कुच्च नहीं कर सकी. टिकली बजानी थी लेकिन बजा नहीं पाई. दीदी, क्या मैं हिजडा हुं तो कोई भी आके ऐसे बिलपन कर सकता हैं? हम जाती क्या उनके पास? उनके नाड? क्या मैं करती कभी किसीको ऐसा? किसीका निकम पकडा क्या कभी?''

''रो मत.''

''कुच्च करो दीदी. ऐसा नहीं होना ....''

''कौनसा स्कूल?''

''कल आना, मैं बताती.''

''ठीक है. सलोनी, तेरा गुरू कौन है? उसे बताया?''


''मेरी गुरू तो उरूस पे गयी है.''

''ठीक है.''

''कल आणा दीदी. दुपैर बारा बजे. घोडी खांजरे के बगल में. वो एक नंबर प्लातफोर्म के बाज्जुसे.''

ही सुसंस्कृत घरातली मुलं. त्यांना उत्तम शाळेत शिकायला मिळत आहे, उत्तम, सकस अन्न मिळत आहे पोटभर, उत्तम कपडा, चैन

नवंकोरं




**हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा**

# डेथ ऑफ अ परफेक्ट वाईफ

लेखक
**एम. सी. बीटन**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

‘‘ट्रिक्सी थॉमसच्या मृत्यूसंबंधात मी चौकशी करायला आलोय,’’ हॅमिश म्हणाला. ‘‘का?’’ मिसेस मॅक्लिन पायाच्या चवड्यांवर बसत म्हणाली, ‘‘ती बाई मेली, ते बरंच झालं.’’ ‘‘प्रश्न तो नाही,’’ तो म्हणाला, ‘‘तुझी तिच्यावर खुन्नस होती. म्हणून मला तुझा संशय येतोय.’’ तिच्याकडे रोखून पाहत त्याने आरोप केला. पण मानेला झटका देत तिने त्याच्याकडे तुच्छतापूर्वक कटाक्ष टाकला. ‘‘माझ्या मूर्ख नवऱ्याला तिने उल्लू बनवलं. त्याला वाटलं की, ती खरंच त्याच्या प्रेमात पडलीये. पण त्या जहांबाज बाईला त्याच्याकडून फक्त फुकटात मासे लाटायचे होते. फारच लालची होती ती. माझ्या मते तरी थॉमस कुटुंबाकडे रग्गड पैसा-अडका होता परंतु आपण कफल्लक असल्याचा बहाणा करून ती प्रत्येकाकडे भीक मागत सुटली. त्या पाद्र्याच्या बायकोला वाटतं की, ती जणू सद्गुणांची पुतळीच होती; पण मी तिला बरोबर ओळखलं होतं. गोड गोड बोलून दुसऱ्यांकडून आपलं काम कसं करून घ्यायचं, यात मात्र ती अगदी तरबेज होती. मिसेस वेलिंग्टन आणि मिसेस ब्रॉडीसारख्या बायकांना घरात काही कामं करावी लागत नाहीत. त्यांच्या घरात वॉशिंग मशिन्स आहेत, मायक्रोवेव्ह्ज आहेत, पण अकलेच्या नावाने मात्र बोंब आहे.’’

करण्यासाठी अनेक माध्यमं. आणि तरीही काहीतरी कमी पडत आहे. हिजडे म्हणजे खिल्ली उडवायचं साधन, हिजडे म्हणजे किळस, हिजडे म्हणजे भीती.. किंवा हिजडे म्हणजे उपभोग. नाही, हिजडे म्हणजे यातलं काहीही नाहीत. सर्वसामान्य लोक आहेत हे. त्यांना मन आहे, त्यांना भूक आहे, त्यांना शरीराची भूक आहे जशी इतरांना आहे. त्यांना नातलग हवे आहेत, घर हवं आहे, पैसा हवा आहे आणि तो कमावण्यासाठी मेहनत घ्यायची त्यांची तयारी आहे. थोडा मान हवा आहे आणि मुख्य म्हणजे त्यांना इतरांनी 'माणूस' म्हणून ओळखावं, हे हवं आहे. हिजडे म्हणून नाही.

हिजडे! काय शब्द आहे हा? कुठून आला? अंधूक आठवतं आहे. हालाची गुरू आली होती एकदा घरी. लहान होते मी; पण ती गुरू आठवते आहे. वेगळीच होती. नाजूक, उंच, सडपातळ, जरीचा काठ असलेली साडी नेसली होती, कानांत मोठे लोंबते डूल, हातात कितीतरी बांगड्या आणि हो, हातांना मेहंदी होती. ती पार काळी होईपर्यंत रंगली होती. नखांना पण मेहंदी लावलेली. लांबसडक बोटं आणि त्यात जाड जाड अंगठ्या. गळ्यात चेन आणि पायात चांदीचे जाड पैंजण. मला वाटतं की, नाक पण टोचलेलं होतं.

ती आली तशी हाला अगदी आनंदून गेली होती. हालाने तिचे पाय धरले. तिला काहीतरी भेट दिली आणि मग गुरूने हालाची अलाबला घेतली.

आठवू लागले तर सर्वच अगदी स्पष्ट आठवायला लागलं. कमाल आहे! इतक्या वर्षांनंतर? हो. आठवतं आहे. इथेच या भिंतीला लागून बसली होती ती. आणि हाला तिच्या समोर. अगदी खांदे पाडून, वाकूनच..

''अच्छा रख्खी हो नाड.''

''जी.''

''ये तेरी ठेपकी?''

''जी, चमेली नाम है. ये चमेली, नमस्कार कर.''

''जिती रहे. क्या करती ये?''

''सिख रही हैं.''

''अच्छी बात है. वरना हमारे जैसा रहेगी तो ये दुनिया में जिना मुश्कील हो जायेगा. तेरा ठेपका कहां है री?''

''जी, वो.. नहीं रेहेता यहां. चला गया. मेरी नारन भी..''

''वो तो मैं जानती.''

''कैसा रहा सफर?''

''बहोत प्यारा. हज का क्या केहेना!! जीवन लंबा रहा तो सहीसलामत आ गयी वापीस.''

''अब तो आपको हाजीसाब केहेना चाहिये.''

''कहो जो मन कहे. कोई फर्क नहीं. ये चमडी तो वही रहेगी. फिर भी केहेना चाहो तो कहो. मेरा नाम था ब्रह्मा. अब कोई मुझे हाजीब्रह्मा पुकारते है. अच्छा है.''

''कुछ कहें हज के बारेमें..''

''बहोत कुछ हैं बेटी. फिर कभी. हां, लेकिन वहां मुझे एक मौला मिले. उन्होने एक कहानी कही, बडी प्यारी कहानी हैं. वो मैं बताती.''

''अंग्रेज आये थे भारतमें. अपनी जगह बनाना चाहते थे. राज करना था उनको यहां. एक एक राजा खरीदना चाहते थे. हम मुसलमान बडे हटके. उनको जरा भी अंदर नहीं आने देते थे.

''मुसलमान शहनशा उस जमानेमें हम जैसे कोतीयोंको उनके जनानखाने की मुहाफजत के लिये रखते थें. सच बताऊ तो गुलामोंको कोती बनाते थें उनके जनानखानेके लिये. और हम भी हमारी इस्तिताअतसे उनकी रखवाली करते थे. हम थे तो शहनशा और बेगम इतमिनानसे जिते थे. हमारी ये वफादारी अंग्रेजोंने जान ली. हमें तोडना उनके लिये जरुरी हो गया, क्योंकी उनको शहनशा तक पहुचना था. तो उन्होंने हमें लालच दी. शायद कोई कमजोर थे. शायद वोह गुलाम होने के लिये राजी नहीं थे. उन्हे जो दर्द दिये गये, कत्लेआम किया गया, और वे नाकिस हो गये. जो ये सेह पाये वे नमकहराम नहीं हुए. लेकिन जो सेह नहीं पाए वो अंग्रेजोंको शामिल हुए. और एक छेद पाया गया. अंग्रेज जो घरके बाहर थे, अंदर आ गये. फिर आहिस्ते आहिस्ते उन्होंने कब्जा कर लिया हमारे कोमपे. एक एक करके सब गिरफ्तार हो गये.

''कई दिन बिते, उन्हे सुरज की रौशनी नसीब नहीं हुई. लेकिन एक दिन कोई रेहेमगार आ गया, जेलर था वो. उसे लगा के हम कोतीयोंका क्या गुन्हा? कमसे कम एक दिन तो इन्हे रिहा किया जाय. एक दिन वो अपनी जिंदगी जी ले. सवेरे छोडे और सुरज ढलते वापीस आ जाये. फिर कैदमें रहे.

''और एक दिन की आजादी उन्हे मिली. वोह अंग्रेज अफिसर बोला के, धिस वन डे विल बी 'हिज डे'.

''उसने कहां हिज डे... वख्त के तकाजेमें हिज डे का हो गया हिजडा.

बेटा, ये लब्ज हमारे लिये बडी मायने रखता हैं. ये हमारा दिन है. आजादी का. अगर वोह दिन मैं जानती तो वहीं तारीख हमारे लिये त्योहारसे कम नहीं होती. लेकिन हाला, एक चीज बता देती हुं. हज करके आयी हुं. खुदा कसम एक लब्ज झूठ ना कहुं.
खुदासे माफी मांगनी है अब. एक दरख्वास्त है उसकी चौखट पें. मैंने उसके साथ गद्दारी की. उसने मुझे भेजा यहां, इस धरती पर एक लडका बनाके, और मैं हो गयी लडकी, बिना उसके इजाजतसे. गलत. मैंने उसका तोहफा कबूल नहीं किया. अब जब हज पर जाऊंगी तो उसे मेरा ये रूप सौप आउंगी. पछतावा करूंगी और शायद लौट के ना आऊ? कौन जाने? अगर आ जाऊ तो खुदा ने जो रूप दिया, उसी रूपसे आउंगी. तब मैं हाजीशहा हो जाउंगी. शायद ये अपनी आखरी मुलाकात हो...''

हालाने तिच्या गुरूला अगदी लवून लवून नमस्कार केलेला आठवतो. या इथेच. याच भिंतीपाशी. कदाचित म्हणूनच हिजड्यांना छक्के म्हटलेलं आवडत नाही. त्यांना हिजडे म्हटलेलं आवडतं, कारण तो त्यांच्यासाठी मानाचा शब्द आहे. कमाल आहे. वेदना आहेत, उपहास आहे, समाजाकडून निर्भत्सना आहे; पण तरीही आपण हिजडे आहोत हे मान्य करण्यात कसलाही संकोच नाही. आणि संकोच करून करणार तरी काय? हेच आयुष्य आहे, तर मग जाऊन जाऊन जाणार तरी कुठे? जगणार कसं? आणि मग अगदी लहान मुलं पण त्यांना एक उपभोगाचं साधन समजतात.

गेलंच पाहिजे उद्या शाळेत. भेटलं पाहिजे प्रिन्सिपलला. पुन्हा हे असं घडलेलं चालणार नाही. इतर अनेक बातम्या येतात पेपरात विनयभंगाच्या; पण विनयभंग होणाऱ्या मुली उच्च समाजातल्या असतात. एका हिजड्याचा विनयभंग होतो तर त्याला काही महत्त्व दिलं जाणार नाही. का? हिजड्याचा विनयभंग होऊ शकत नाही?

''मी चमेली. नमस्कार.''

''बसा.''

''काल एक प्रसंग घडला आणि त्याबाबत मी बोलायला आले आहे. प्रसंग घडला आहे विनयभंगाचा. एका हिजड्याचा विनयभंग तुमच्या शाळेतल्या काही विद्यार्थ्यांनी केला आहे.''

''हे बघा, तुम्ही आरोप करत आहात.''

''मी सिद्ध करू शकते. तिने सर्वांना नीट बघितलेलं आहे आणि ती

तुमच्या शाळेतल्या हजार विद्यार्थ्यांमधून त्या मुलांना ओळखून काढू शकते.''

''पण मला एक कळत नाही की, एका हिजड्याच्या वाटेला मुलं जातीलच कशी? कारण तशी त्यांची भीतीच वाटते आणि दुसरं म्हणजे बरोब्बर शाळा सुटायच्या वेळेलाच हिजडे इथे काय करत असतात? आम्हाला पण पालकांच्या तक्रारींना उत्तर द्यावं लागतं. मी पण बघितले आहेत हिजडे इथे. म्हणजे तेच माझ्या विद्यार्थ्यांना चिथवतात असं मी म्हणू शकते. मुलं का जातील त्यांच्या वाटेला नाहीतर? नाही का?''

''ते तुम्ही त्यांनाच विचारा. हिजडे काय चिथवणार मुलांना? शक्य तरी आहे का? इथे पोलीस असतात. त्यांची भीती असते त्यांना आणि जरा तुम्ही पण घ्या ना समजावून. मुलं जर चुकीच्या वाटेने जात असतील तर त्यांना समज देणं हे आपलं काम आहे. हे गंभीर आहे आणि त्यावर काहीतरी पावलं उचलली गेली पाहिजेत. जर तुम्ही या घटनेला महत्त्व देत नसाल तर मग मला काही वेगळे मार्ग.''

''महत्त्व आहे ना. मी बघते.''

मी निघाले खरी त्या शाळेतून; पण मनाला प्रचंड यातना होत होत्या. एक प्रिन्सिपल आणि त्यांचा व्ह्यू इतका कॅज्युअल? गांभीर्य कळत नाही का?

गरम डोक्याने हॉस्पिटल गाठलं. सुक्कीला बघायचं होतं; पण तो वॉर्डमध्ये नव्हता. मी चौकशी केली .. आणि धावत सुटले. आय.सी.युच्या बाहेर सावरी बसलेली होती.

''काय झालं?''

''इन्फेक्शन झालं आहे. खूप दुखतंय त्याला. वेदना सहन होत नाहीत. ओरडतो आहे, रडतो आहे.''

''डॉक्टर काय म्हणाले?''

''ऑपरेशन तर चांगलं झालं होतं, पण युरिन बाहेर पडत नाही. पडली तर पूर्ण नाही होत आहे आणि उरलेली युरिन पुन्हा आत फिरत आहे. त्याचं इन्फेक्शन झालं आहे. कदाचित किडनी फेल...''

''रडू नकोस. बघू आपण. मी भेटते डॉक्टरांना.''

बधीर झाले. काय करावं समजत नाही. कदाचित किडनी फेल होईल. डॉक्टर प्रयत्न करत आहेत. जखम चिघळते आहे. जोपर्यंत जखम सुकत नाही, तोपर्यंत काही सांगता येत नाही.

काल बघितलेला सुक्कीचा हसरा चेहरा आणि सावरीचा आनंद.. आज

कुठे काय होतं? या भावना अशा एका क्षणात बदलतील, अशी स्थिती का निर्माण होते?

भिव्याला समोर बघितलं आणि वाटलं की, हा तरी काय देणं लागतो सुक्कीचं? की देणं लागतो म्हणून त्याने त्याच्याबरोबर गैरवर्तन केलं? हा इथे असा कधीपासून बसलेला आहे?

मी त्याला टाळून बाहेर पडले. कालच्या आणि आजच्या दिवसात किती तफावत होती...

हा दिवस नक्की कुणाचा? हिज डे?


❖

## आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.**

नवंकोरं




**हॅमिश मॅक्बेथ रहस्यकथा**

# डेथ ऑफ ॲन आउटसायडर

लेखक
**एम. सी. बीटन**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**


**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

खून हा एक चविष्ट जिन्नस आहे – स्कॉटलंडमधलं एक भकास व उदास खेडेगाव. गावात राहणारी एक विचित्र व विक्षिप्त स्वभावाची व्यक्ती. गावातल्या प्रत्येकाची तिच्यावर खुन्नस. अखेर तिला माशांसोबत चिरनिद्रा घ्यावी लागते. जरा स्पष्ट सांगायचं तर – त्या व्यक्तीला लॉबस्टर्स असलेल्या हौदात बुडवण्यात येते. हेच लॉबस्टर्स जेव्हा लंडनच्या उत्तमोत्तम हॉटेलांत जाऊन पोहोचतात, तेव्हा त्या प्रकरणाची चव आणखीनच वाढते आणि त्याचा चट्टामट्टा करण्याची जबाबदारी शेवटी इन्स्पेक्टर हॅमिश मॅक्बेथवर येऊन पडते. तात्पुरती बदली झाल्यामुळे मॅक्बेथ आपल्या टाऊझर कुत्र्यासोबत क्नॉथनला आलेला असतो. क्नॉथनमध्ये त्याचं मन रमत नाही. लॉचडभच्या निसर्गसौंदर्याची व त्याच्या आवडत्या प्रिसिला हालबर्टन-स्मिथच्या निखळ प्रेमाची उणीव सतत भासत राहते. मॅक्बेथ हा शांत, सुस्त व खुशालचेंडू वृत्तीचा माणूस असतो; पण आता मात्र त्याला तीन आघाड्यांवर लढावं लागणार असतं. एकीकडे त्याचा बॉस डिटेक्टिव्ह चीफ इन्स्पेक्टर, ज्याला खूनप्रकरणाची उकल करण्यापेक्षा ते दाबून टाकण्यातच अधिक रस असतो. दुसरीकडे काळ्याभोर केसांची एक लावण्यवती त्याला वश करण्यासाठी विवश झालेली असते, तर तिसरीकडे तो अज्ञात खुनी, जो खून केलेल्या व्यक्तीच्या अंगावर मांसही शिल्लक ठेवत नाही – व जो पुन्हा कोणत्याही क्षणी आणखी एक बळी घेणार असतो....

# आघात



सूर्यकांत जाधव यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील मौजे कोलोली इथे झाला. बी.एस्सी. एलएल.बी. अशी त्यांची शैक्षणिक अर्हता आहे. सध्या मंत्रालयात उपसचिव या पदावर ते कार्यरत आहेत. वाचन, चित्रपट, कला हे त्यांचे छंद आहेत. ज्योतिर्विद्येचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे. 'अस्मिता' या कादंबरीनंतर मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यांची 'आघात' ही नवीन कादंबरी प्रकाशित केली आहे.




लेखक

**सूर्यकांत जाधव**

*कार्बन मोनोक्साईडने मॅक्स इंजिनिअरिंग कंपनीतील संपतचा मृत्यू झाला. त्यानंतर काही दिवसांनी त्याच कारखान्यातले सत्तर कामगार कार्बन मोनोक्साईडमुळे बेशुद्ध पडले; मात्र औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाने (डिश) तपासणी केल्यानंतर मॅक्स इंजिनिअरिंगमध्ये कोणत्याच स्वरूपात कार्बन मोनोक्साईड त्यांना दिसून आला नाही; पण काही घटनांतून कार्बन मोनोक्साईडचा त्या परिसरातील प्रभाव जाणवत राहिला. कुठून गळती होत होती या कार्बन मोनोक्साईडची? डिशचे तरुण संचालक प्रतापसिंह राजे यांनी चौकशी सुरू केली. काय निष्पन्न झालं या चौकशीतून? या चौकशीदरम्यान घडलेल्या धक्कादायक आणि रोमँटिक घटनांनी सजलेल्या... कामगार, कारखाने, प्रदूषण, कारखान्यांमधील राजकीय हस्तक्षेप, जेहादींसारख्या बाह्यशक्ती इ. विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या 'आघात' या रंजक कादंबरीतील हा काही अंश...*

**सं**पत मालवणकर कारखान्यातील पहिली पाळी संपवून बाहेर पडण्याच्या तयारीत होता. 'मॅक्स इंजिनिअरिंग कंपनी'त तो फोरमन पदावर काम करत होता. पन्नाशीकडे झुकलेला असूनही संपत प्रकृतीने एकदम तंदुरुस्त होता, डोक्यावरील केस राठ आणि काळेकुळकुळीत होते. संपत कामगारांमध्ये आवडता होता. सर्वांना मदत करणारा. व्यवस्थापनाच्या दादागिरीविरुद्ध कामगारांच्या बाजूने धैर्याने लढणारा होता. कामगारांचे चुका-दोष सांभाळून घेणारा मेहनती होता. संपतला बाहेरच्या अनेक कामगार संघटना कामगारांचे नेतृत्व करण्याबाबत साकडे घालत होत्या, परंतु संपत ते नाकारत होता. संपत मनाने भावुक होता. युनियनची लफडी जमणार नाहीत, त्या वाटेला जायचंच कशाला? याच संपतला कुस्तीचे वेड होते. कुस्तीच्या फडाचे आकर्षण होते. ठाण्यासारख्या ठिकाणी कारखान्यात काम करणारा असूनही, कुस्ती म्हटली की पनवेलपासून वरळीपर्यंत आणि कल्याणपर्यंत संपत जात होता. कुस्ती, नुरा कुस्ती असली, तरी आवडीने पाहत होता. कुस्तीगिराने मानाची कुस्ती जिंकल्यानंतर त्याच्या सत्काराच्या वेळी पहिलवानाकडे धाव घेणारा संपत स्वतःला पहिलवानाच्या भूमिकेत पाहण्याचा प्रयत्न करायचा. जिंकणाऱ्या पहिलवानाचा त्याला हेवा वाटायचा. आपल्या मुलाने पहिलवान व्हावे, असे त्याला वाटायचे. परंतु संपतला त्यात यश आले नाही.


मॅक्स इंजिनिअरिंग कंपनी! ही कंपनी महामार्गावर कळवा आणि ठाणे यांच्यामधल्या ब्रीजला लागून होती. कारखाना मोठ्या विस्तीर्ण परिसरात पसरला होता. लोखंडी भंगारापासून स्टीलचे बीम-रॉड येथे तयार केले जायचे. मालक-कामगार संबंध चांगले असलेल्या या कारखान्यात १५०० कामगार होते. संपत कारखान्याच्या बाहेर पडत होता. संपतने टाइम ऑफिसला बाहेर जाण्याची नोंद केली. पिशवी सांभाळत संपत बाहेर निघाला. संपत ठाण्याला राहत होता. कंपनी-बसने जात-येत होता. आज बाहेर पडताना तो सर्वांत शेवटी बाहेर पडला होता.

संपत गेटच्या बाहेर आला. संपत रस्त्यावर दोन-तीन पावले चालत आला असेल, तो धाडकन खाली कोसळला आणि रस्त्यातच खाली पडला.

कारखान्यातील सर्व कामगार गेटच्या बाहेरच होते. त्यामुळे सर्व जण सावध झाले. सर्वांनी गर्दी केली. संपतला उठवून बसवण्याचा प्रयत्न करण्यात आला. संपत बेशुद्ध पडला. तात्काळ कंपनीची गाडी बाहेर

**नवंकोरं**

# द मदर डान्स




लेखक
**हॅरिएट लर्नर**

अनुवाद
**डॉ. जयश्री गोडसे**

**किंमत : ३२०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

'डान्स ऑफ अँगर'च्या प्रसिद्ध लेखिकेने मातृत्व आपल्यात कसे बदल घडवून आणते आणि आपली सगळीच नाती आतून-बाहेरूनही कसे बदलते, याबाबत हे अप्रतिम पुस्तक लिहिले आहे. एक मानसशास्त्रज्ञ आणि माता या दोन्ही भूमिकांमधून लिहिताना लर्नर यांनी अगदी विनोदी ते मन पिळवटून टाकणाऱ्या खूप वैयक्तिक गोष्टी सांगितल्या आहेत. जन्म, दत्तकविधान ते रिकामे घरटे या सगळ्या टप्प्यांबाबत अप्रतिम नर्मविनोदी आणि हृदयाला स्पर्श करणारे पुस्तक 'मातृत्वाचा जल्लोष' कसा करायचा याबद्दल सांगते.

काढण्यात आली. संपतला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. परंतु हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यापूर्वीच संपतची प्राणज्योत मालवली होती. आपला संसार उद्ध्वस्त करून, पोरका करून संपत या जगातून निघून गेला होता.

शवविच्छेदन होऊन बॉडी ताब्यात घेण्यासाठी कंपनीचे सर्व कामगार कळवा हॉस्पिटलच्या बाहेर जमले होते. संपतच्या घरी निरोप गेला. त्याचा मोठा मुलगा आणि भाऊ हॉस्पिटलमध्ये आले. संपूर्ण कारखान्याचे कामगार संपतच्या अंत्ययात्रेला हजर होते. संपत सर्वांचा आवडता फोरमन होता. कारखान्याचे व्यवस्थापनही त्याच्यावर खुश होते. व्यवस्थापन आणि कामगार यांमधला एक चांगला दुवा म्हणून संपतकडे पाहिले जात होते. संपतचा अचानक मृत्यू हा सर्वांना जबर धक्का होता.

दोन दिवसांनंतर बातमी आली. कारखान्यातील कामगारांना आणि व्यव-स्थापनाला थोडे विचित्र वाटले. संपतचा मृत्यू हृदयविकार किंवा इतर नैसर्गिक कारणाने झाला नव्हता. त्याचा मृत्यू कार्बन मोनोक्सॉइडमुळे गुदमरून झाला होता. कामगारांच्या संघटनेने अधिक चौकशी करण्याचे ठरविले; परंतु चौकशी पुढे जाऊ शकली नाही. संघटनेला मात्र अनैसर्गिक मृत्यूचे कारण मिळाले. संघटनेने व्यवस्थापनाकडे तगादा लावला – संपतच्या मृत्यूबाबत कारखान्याला जबाबदार धरण्यात यावे. संपतच्या मृत्यूबाबत कंपनीने नुकसानभरपाई द्यावी. व्यवस्थापनाला ही बाब चिंताजनक वाटली. एकतर कारखान्यात कोणत्याही प्रकारची रासायनिक प्रक्रिया केली जात नव्हती. कारखान्यात कोठेही कार्बन मोनोक्सॉइड तयार केला जात नव्हता किंवा वापरला जात नव्हता. त्याचा साठाही कारखान्यात नव्हता. व्यवस्थापनाने हात झटकले. विनाकारण आरोप अंगावर घेण्याचा प्रश्नच नव्हता; परंतु संघटनेने वाद पुढे रेटण्याचे ठरविले. कारखाने निरीक्षकांच्या ऑफिसकडे तक्रार नेण्यात आली. सहायक संचालकाने भेट दिली. कामगार आणि कामगार संघटना यांचे म्हणणे ऐकून घेतले. व्यवस्थापनाशी चर्चा केली. सहायक संचालकाने अहवाल तयार केला. आपल्या वरिष्ठांना सादर केला – कारखान्यात कोणत्याही प्रकारे कार्बन मोनोक्सॉइड वापरला जात नव्हता, उपयोगात आणला जात नव्हता, तयार केला जात नव्हता. त्यामुळे संपतच्या मृत्यूला व्यवस्थापनाला जबाबदार धरता येत नाही. कारखान्याचा संबंध नाही. नुकसानभरपाईची मागणी योग्य नाही.

परंतु संघटना हट्टाला पेटली होती. त्यांनी या प्रकरणी संघर्ष करायचे ठरवले. संघटनेने न्यायालयात धाव घेण्याचे ठरविले, संघटनेचे म्हणणे

व्यवस्थापनाला मान्य करायला लावायचेच असा निर्धार केला. संघटनेने त्यांच्या वकिलाशी चर्चा केली. व्यवस्थापनाविरुद्ध कोणत्या प्रकारचा खटला दाखल करावयाचा, याची आखणी करण्यात आली. फौजदारी स्वरूपाचा खटला दाखल केला आणि सिद्ध झाला तर व्यवस्थापनाला शिक्षा होई; परंतु त्यामुळे आर्थिक फायदा संपतच्या कुटुंबाला होईल, असे काही सांगता येणार नाही, म्हणून याबाबत पुनर्विचार करण्यात आला. विचाराअंती खटला नुकसानभरपाई कायद्याखाली दाखल करायचे ठरविण्यात आले. खटला दिवाणी न्यायालयात दाखल झाला.

परंतु व्यवस्थापनानेही तयारी केली. विनाकारण नुकसानभरपाई देण्यास ते तयार झाले नाही. संपतला त्याची नोकरीतील कायदेशीर देणी देण्यास व्यवस्थापनाने तयारी दर्शविली. संपतच्या घराची परिस्थिती विचारात घेऊन त्याच्या मुलाला नोकरी देण्याबाबतही विचार बोलून दाखवला; परंतु नुकसानभरपाई! व्यवस्थापनाने याला स्पष्ट नकार दिला. खटला न्यायालयात उभा राहिला; परंतु तो जास्त काळ चालला नाही. कारण स्पष्ट होते. संपतचा मृत्यू कारखान्यात झालाच नाही. त्याचा मृत्यू कारखान्याबाहेर झाला होता. हा तांत्रिक मुद्दा व्यवस्थापनाने शेवटपर्यंत ताणून धरला, नव्हे त्याला ते चिकटून राहिले. कारखान्यातून बाहेर पडून घरी जाईपर्यंत संपत व्यवस्थापनाच्या अख्यत्यारीत – म्हणजे कारखान्याचा कामगार होता, म्हणून त्याला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, अशी संघटनेने भूमिका घेतली. न्यायालयाने ती अमान्य केली. कारखान्यात कार्बन मोनोक्सॉइड तयार होत नाही, वापरला जात नाही, या वायूचा साठाही नाही, हे व्यवस्थापनाचे म्हणणे मान्य केले. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या सहायक संचालकांचा अहवाल न्यायालयाने विचारात घेतला. सहायक संचालकांची साक्षही विचारात घेतली. न्यायालयाचा निर्णय व्यवस्थापनाच्या बाजूने लागला. संघटनेला संपतला नुकसानभरपाई मिळवून देता आली नाही. संपत मालवणकर प्रकरणाला काही दिवस होतात न होतात, तोपर्यंत पुन्हा खळबळ माजली. तो दिवस बुधवारचा होता. ठाण्याच्या औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनायाच्या कार्यालयात (डिश) दुपारच्या वेळी फोन आला. तो मॅक्स इंजिनिअरिंगमधून आला होता. कारखान्यातले ७० कामगार बेशुद्ध पडल्याबाबतची बातमी होती. डिश कार्यालयात गडबड उडाली. ठाण्याच्या सहसंचालकांनी कारखान्यातल्या परिस्थितीबाबत सुरक्षा अधिकाऱ्यांकडून फोनवरून माहिती घेतली.

मुंबईतील वरळीच्या डिश ऑफिसमध्ये संचालक कामगार सुरक्षिततेबाबत आंतरराष्ट्रीय कामगार संघटने (आएलओ)चा अहवाल वाचत बसले होते. प्रतापसिंह मलकापूरकर अहवालाच्या महत्त्वाच्या ठिकाणी लाल हायलायटरने खूण करत शांतपणे वाचन करत होते. हळूहळू डोळ्यांवर झोप येत होती. ठाण्याहून फोन आला. कामगार बेशुद्ध पडल्याबाबतची बातमी ऐकताच संचालक खुर्चीत ताठ बसले. संचालकांना नुकतेच झालेले संपत मालवणकर प्रकरण माहीत होते. कारखान्यातले ७० कामगार बेशुद्ध पडल्याचे ऐकल्यावर संचालक चक्रावून गेले. 'काहीतरी घोटाळा दिसतोय.' ठाण्याच्या सहसंचालकांना फोन लावला.

''पाटील बातमी गंभीर आहे. तुम्ही मालवणकर प्रकरणाच्या वेळी सहायक संचालकांना चौकशीला पाठवलं होतं. याबाबतची कोर्ट केसही निकाली झालेली आहे. पुन्हा हा प्रकार! तुम्ही स्वत: चौकशी करा.''

''येस सर!'' ठाणे डिश कार्यालय कामाला लागले.

❖


# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील'क्लासिक्स'साठी खास सवलत!**


₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा ८ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५. इतर कोणत्याही पुस्तकांवर २०% सवलत मिळवा.

**नवंकोरं**

# द डान्स ऑफ इन्टिमसी

लेखक
**हॅरिएट लर्नर**

अनुवाद
**श्यामल चितळे**




**किंमत : २४०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

सर्वाधिक खप असणाऱ्या ‘द डान्स ऑफ अँगर’च्या लेखिकेनं ‘द डान्स ऑफ इन्टिमसी’ या पुस्तकात चांगले नातेसंबंध दृढकरण्यासाठी आणि बिघडलेल्या नातेसंबंधांत सुधारणा व्हावी यासाठी कोणती छोटी छोटी पावले उचलावीत याचे विवेचन केले आहे. सख्यत्वाचे नातेसंबंध, ज्यात काही कारणामुळे दुरावा, तीव्रता किंवा दुःख यामुळे बाधा येत असते. त्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून, त्या आपल्याला ‘स्व’ची दृढजाणीव प्राप्त करण्यासाठी आणि इतरांशी सख्यत्वाची जवळीक साधण्यासाठी नेमके कोणते बदल करावेत, याची माहिती देतात. स्पष्ट सल्ला आणि उपचारार्थींची ठळक उदाहरणे यांच्या साहाय्याने डॉ. लर्नरनी सख्यत्वाच्या नातेसंबंधांविषयीचे एक भरीव आणि उपयोगी असे पुस्तक स्त्री-पुरुषांच्या हाती ठेवले आहे.
याहून चांगले पुस्तक असू शकणार नाही.


# महामानव सरदार पटेल



‘महामानव सरदार पटेल’ ही दिनकर जोषी यांनी गुजरातीत लिहिलेली कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकतीच मराठीत प्रकाशित केली आहे.मुंबई येथील देना बँकेच्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून दिनकर जोषी निवृत्त झाले. १९५४पासून सुरू झालेला त्यांचा लेखनप्रवास अजून सुरू आहे. आतापर्यंत त्यांची १४७ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे या महान ग्रंथांचा सखोल अभ्यास करून त्यावर आधुनिक संदर्भात त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. याखेरीज महात्मा गांधी व त्यांचे ज्येष्ठ पुत्र हरिलाल गांधी, महमदअली जीना, रविन्द्रनाथ टागोर, गौतम बुद्ध यांच्या जीवनावर त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

त्यांच्या अनेक पुस्तकांचे हिंदी, मराठी, बंगाली, कानडी, तेलुगू, मल्याळी, ओरिया व तमिळ, तसेच इंग्रजी व जर्मनमध्ये अनुवाद झाले आहेत. एकाच वेळी ११ पुस्तके सहा भाषांमध्ये प्रकाशित होण्याच्या विक्रमाबद्दल त्यांचा ‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये समावेश झाला आहे. गुजराती साहित्य परिषद, गुजरात राज्य साहित्य अकादमी इ.सारख्या अनेक साहित्यिक संस्थांकडून त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांवर चित्रपट निर्माण झाले

आहेत. त्यांनी भांडारकर ओरिएन्टल इन्स्टिट्यूटच्या महाभारताच्या संशोधित मूळ लेखनाचे गुजराती अनुवादाचे संपादन करण्याचे कामही पार पाडले आहे. त्याचे एकूण वीस भाग संचरूपात प्रकाशित झाले आहेत.




लेखक
**दिनकर जोषी**

अनुवाद
**सुषमा शाळिग्राम**

१९१८ मध्ये वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी राजकारणात प्रवेश करणारे
बॅरिस्टर वल्लभभाई झवेरभाई पटेल 'सरदार' बनले
१९२८ मध्ये, पूर्ण एका दशकानंतर!
१९२८च्या बारडोली लढ्याने त्यांना सरदार बनवले आणि
याच लढ्याने त्यांना राष्ट्रीय स्तरावर नेऊन ठेवले.

त्यानंतर जणू ते वल्लभभाई उरलेच नाहीत.

संपूर्ण देशात ते सरदार म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९२८ पासून त्यांच्या सरदारत्वाची ओळख देशातल्या राजकारणींना आणि शासनव्यवस्थेला पटली होती, पण १९४५ पासून इतिहासाने एक वळण घेतले आणि त्यांचे सरदारत्व चहूअंगांनी फुलून आले.

१९४५ ते १९५० पर्यंत म्हणजेच त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी केलेली कामगिरी देशभरातच नव्हे, तर जगभरात अजोड आहे. सरदारांबद्दल लिहिणाऱ्या कोणाही तटस्थ इतिहासकाराला अतिशयोक्तीचा आरोप सहन करूनदेखील म्हणावेच लागेल की, या पाच वर्षांच्या काळात जर सरदार नसते तर त्यांनी केलेले कार्य दुसरे कोणीही करू शकले नसते. एकवेळ पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्ष दुसरे कोणी होऊ शकले असते; परंतु सरदार नसते, तर त्यांच्या जागी कोणीच नसते.

## इतिहासाचे जर-तर

गुजराती भाषेत चरित्रात्मक कादंबऱ्या त्यामानाने कमीच लिहिल्या गेल्या आहेत. मराठीसारख्या अन्य भारतीय भाषांत अथवा इंग्रजीसारख्या युरोपीय भाषांत या प्रांतात बरेच काही झाले आहे. म्हणायचेच झाले तर असे म्हणता येईल की वर्गीकरणापुरते पाहिले तर चरित्रात्मक कादंबऱ्या या ऐतिहासिक कादंबरी या प्रकारातच मोडतात. ढोबळमानाने हे जरी खरे असले तरी खोलात शिरले असता त्यांतला फरक लगेच पारखता येतो. ऐतिहासिक कादंबरीत प्रमुख पात्र असते, कादंबरीला विशिष्ट असे कथानक असते. त्या काळातल्या घटना असतात, तत्कालीन युग हाच तिचा केंद्रबिंदू असतो; आणि एकप्रकारे या सगळ्यातून त्याकाळाचे सामाजिक आणि वैचारिक दर्शन घडत असते.

चरित्रात्मक कादंबऱ्यात कथानायक केंद्रस्थानी असतो; एवढेच नव्हे तर समाजाच्या अथवा घटनांच्या पार्श्वभूमीवर कथानायकाचे चरित्रदर्शन हाच उद्देश असतो. ज्याप्रमाणे, एखाद्याचे चरित्र लिहिणाऱ्या लेखकाने आपल्या कथानायकाबद्दल आदरभाव अथवा पूर्वग्रह ठेवून त्यानुसार त्याच्या जीवनकथेचा आलेख मांडला तर त्या कथनातला सच्चेपणा उणावतो, त्यातून प्रगट होणारे सत्य 'बावनकशी' न राहता 'चौदा कॅरेट'चे होते, त्याप्रमाणेच कथनात्मक कादंबरीचेदेखील लेखकाने चरित्रकथनाच्या परीघावर

राहूनच आलेखन केले पाहिजे. केंद्रस्थानी असलेला कथानायक आणि त्याचा कालखंड त्यातील एकूण एक घटनांसह 'अतीत' होऊन चुकला असल्याने आता स्थिर झालेला असतो. अशावेळी लेखकाने परिघाच्या वेगवेगळ्या बिंदूंवरून तो भूतकाळ निरखला आणि पारखला पाहिजे आणि मग जे जसे आहे, जे जसे दिसते आहे तसेच ते चित्रित केले पाहिजे.

अशा कादंबऱ्यांच्या घटनांचे जे दस्तऐवज, जी कागदपत्रे, जे पुरावे सापडतात ते कधी कधी परस्परविरोधी असतात. अशावेळी लेखकाच्या विवेकबुद्धीचा कस लागतो. कोणी म्हटले, कोणत्या परिस्थितीत म्हटले, त्यामागे वैचारिक भूमिका काय होती याचे मोजमाप करून मगच लेखकाला पुढे जावे लागते. अशी सर्वांगीण आणि संभाव्य छाननी केल्यानंतरही कथानायकाचे कोठेच लिहून न ठेवलेले मनोव्यापार त्याला अनुमानाने ओळखावे लागतात. कथानायकाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वातील सातत्य विचारात घेऊनच असे तर्क करावे लागतात, करायला हवेत. सरदार पटेलांचे गांधीजींशी मतभेद झाले तर 'नवजीवन', 'यंग इंडिया' अथवा 'हरिजन बंधू' यापैकी एखाद्या ठिकाणी लेख लिहून गांधीजी त्यातून आपल्या मनातील विचार व्यक्त करतील, पण सरदार असे काहीच करणार नाहीत. अशावेळी सरदारांच्या मनात जी काय खळबळ झाली असेल ती त्यांच्या कुठल्या तरी एकट्यादुकट्या पत्रातूनच शोधावी लागते.

माझ्या प्रत्येक चरित्रात्मक कादंबरीच्या प्रकाशनप्रसंगी मी सांगत आलो आहे की, यात ऐतिहासिक तथ्ये (facts) असली तरी मुळात ती कादंबरी आहे. कादंबरीच्या आकृतिबंधात अनिवार्य असणारी कलात्मक काल्पनिकता मिसळूनसुद्धा तिच्यातील पात्रे, घटना वा परिस्थिती यांचे सातत्य राखले जाईल अशा पद्धतीने संपूर्ण रचनेचा घाट रचला जाईल, हे बघणे हा रचनाकाराचा धर्म आहे. एखाद्या निष्ठावान माणसाला, मग तो लेखक असो वा नसो, एकवेळ आपले अधिकार सोडावे लागले तरी हरकत नाही, परंतु तो आपला धर्म, आपले कर्तव्य सोडू शकत नाही. सर्वसामान्य कर्तव्यापेक्षाही 'सृजन-धर्म' विशेष जास्त आहेत. माझ्या सृजन-प्रक्रियेत हे सर्व सतत लक्षात ठेवत असल्याचा दावा करतानाच मी एवढे मात्र अवश्य कबूल करतो, की धर्माचे अनुशीलन करण्याची माझी ही शिस्त 'कुराणा'ची नाही, तर ज्या 'भगवद्गीते'तून कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग असं काय हवं ते श्रद्धापूर्वक वेगळं काढता येतं त्या भगवद्गीतेची आहे.

चरित्रकथनात्मक कादंबरीच्या आकृतिबंधाबद्दलच्या आणि स्वरूपाबद्दलच्या माझ्या सृजनात्मक दृष्टिकोनाबाबत इतके सांगितल्यानंतर आता या 'महामानव' कादंबरीबद्दलही थोडेसे सांगणे आवश्यक आहे. महंमदअली जीनांच्या जीवनावर आधारित कादंबरी 'प्रतिनायक' २००२ मध्ये प्रकाशित झाली. त्या वेळी प्रकाशकमित्र श्री. गोपालभाई पटेलांनी सुचवले होते, ''आता सरदार पटेलांवर अशीच एक नवी कादंबरी लिहा.'' केवळ सूचना करून ते थांबले नाहीत, तर आपली सूचना त्यांनी ताबडतोब अमलात आणली. सरदार पटेलांवर लिहिलेली काही पुस्तके त्यांनी माझ्याकडे पाठवून दिली. पुस्तकासंदर्भात प्राथमिक तयारी सुरू केली. काही नोंदी काढून ठेवल्या आणि पुस्तकाच्या आराखड्याबाबत सुरुवातीच्या टप्प्यावर चर्चादेखील सुरू केली. काय झाले कुणास ठाऊक, पण एवढे होऊनही काम पुढे सरकेना. दरम्यान गुरुदेव टागोर तसेच भगवान बुद्ध, दोघांवर माझा अभ्यास सुरू होता. त्यातूनच 'अ-मृतपंथाचा यात्री' आणि 'प्रश्नप्रदेशापलीकडे' या दोन कादंबऱ्या लिहून झाल्या. काही अनपेक्षित घटना – त्या सुखदही असू शकतात म्हणा – अशा काही अचानक जुळून येत असतात! त्यांच्याकडे दूरवरून पाहिले तर परमेश्वराच्या अगम्य लीलेचा साक्षात्कार होतो. २००६ मध्ये महाभारताच्या सर्व श्लोकांच्या अनुवादाचा महाप्रकल्प माझ्याकडे अगदी अलगद चालत आला. चौदा हजार पानांचा म्हणजेच वीस खंडांचा विराट प्रकल्प! चार एक वर्षे त्यातच निघून गेली. ईश्वरकृपेने कार्य संपन्न झाले.

त्यानंतर 'प्रकाशाची सावली' या कादंबरीच्या बंगाली अनुवादाच्या प्रकाशनानिमित्ताने कलकत्त्याला जायचा योग आला. बंगाली साहित्यिक आणि साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत त्या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा बंगाली अनुवादक आणि प्रकाशक दोघांनी न्यू थिएटर्स बिल्डिंगमध्ये आयोजला होता. माझे बालपणीचे मित्र आणि इमेज पब्लिकेशन्सचे मालक श्री. नवीनभाई दवे यांनी त्यांचे परममित्र कलकत्त्यातील उद्योगपती श्री. नरहरिभाई कोया यांना माझ्या कलकत्ताभेटीबद्दल कळवले. श्री. नरहरिभाई अतिशय सौजन्याने माझ्या भेटीला आले. कलकत्त्याच्या गुजराती क्लबमध्ये त्यांनी एके सायंकाळी माझे व्याख्यान ठेवले. सभागृहात पहिल्या रांगेत बसलेले एक सद्गृहस्थ व्याख्यानातल्या माझ्या एक-दोन मुद्द्यांसंदर्भात बोलण्यासाठी नंतर माझ्याकडे व्यासपीठावर आले. माझ्याशी हस्तांदोलन करून म्हणाले,

''माझं नाव दिनेश त्रिवेदी.'' नुसते नाव ऐकून काहीच आठवेना. नेमक्या त्याचवेळी व्यासपीठावर माझ्या शेजारी बसलेल्या नरहरिभाईंनी माझे लक्ष वेधत म्हटले, ''दिनेशभाई केंद्र सरकारमध्ये आरोग्यखात्याचे राज्यमंत्री आहेत.'' दिनेशभाई त्या वेळी तिथे असे काही अचूक आणि मार्मिक बोलले, की मला आश्चर्य तर वाटलेच; पण आनंदही झाला. एखाद्या वर्तमान राजकारण्याने इतके तर्कशुद्ध, निखळ बोलण्याचे धाडस करावे ही घटनाच मुळी आनंददायक होती. त्यानंतर आम्ही – मी, नरहरिभाई आणि दिनेशभाई – एकत्र जेवलो. त्या वेळीसुद्धा मनमोकळेपणाने बरेच बोलणे झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नरहरिभाईंनी मला फोन केला व म्हणाले, ''आज रात्रीसुद्धा आपण एकत्रच जेवू. तुम्ही, मी आणि दिनेशभाई.'' त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करत मी म्हटले, ''आणि गोपालभाईपण असतील माझ्यासोबत!''

अशा रीतीने त्या रात्री आम्ही ताजमहाल हॉटेलमध्ये जमलो, जेवलो. पूर्ण दोन तास गप्पा सुरू होत्या. सुरुवातीलाच नरहरिभाई म्हणाले, ''तुम्ही सरदार पटेलांवर एक पुस्तक लिहावं असं मला आणि दिनेशभाईंना – आम्हाला दोघांनाही वाटतं. सरदार पटेलांच्या व्यक्तिमत्त्वाचे 'सरदार' म्हणून सर्वांत अधिक तेजस्वी पैलू त्यात उजळून निघावेत. ते ऐकताच 'आंधळा मागतो एक अन् देव देतो दोन' अशी अवस्था झाली गोपालभाईंची! असे एखादे मोठे काम हाती घ्यायला तेव्हा माझे मन काहीसे बिचकत होते. पंच्याहत्तरी गाठली होती. यापुढे आता अशा कामासाठी दस्तऐवज शोधा, कागदपत्रे तपासा, पुस्तकांच्या नोंदी करा, मुलाखती, भेटी घ्यायला जा, त्यासाठी प्रवास करा... प्रत्येक गोष्टीसाठी प्रत्येकवेळी ऊर्जा लागते. आवर्जून करावे असे काम तर होते, पण माझ्या मर्यादा आड येत होत्या. दिल्लीतील अर्काइव्ह्ज, पार्लमेंट हाऊसचे ग्रंथालय, अहमदाबादचे सरदार स्मारक भवन या सर्व ठिकाणी ये-जा करून तिथले दस्तऐवज तपासणे हे सगळे अवघड वाटत होते. माझी अडचण लक्षात येताच दिनेशभाईंनी लगेच तोडगा सुचवला. म्हणाले, ''दिल्लीतील तुमची सगळी व्यवस्था करायचं काम माझ्याकडे लागलं.'' नरहरिभाईंनी माझी काळजी कमी करत म्हटले, ''या कामासाठी तुम्हाला जे काय लागेल ते पुरवायची जबाबदारी माझी!'' पाठोपाठ गोपालभाईंनी भर घातली, ''पुस्तक प्रकाशित करायची जबाबदारी मी घेतलीच आहे!''

त्यांचे म्हणणे मी तेवढ्यापुरते मान्य करून टाकले खरे; पण मनातील

चलबिचल अजून तशीच होती. बहुदा, शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या माझ्या मर्यादा मनात घर करून बसल्या होत्या. सहा एक महिन्यांनंतर नरहरिभाई कलकत्त्याहून मुंबईला आले. त्या वेळी आधीच ठरलेल्या एका व्याख्यानासाठी मी लोणावळ्याला नवीनभाई दवेंच्या बंगल्यावर होतो. मी लोणावळ्याला आहे हे कळताच नरहरिभाई मुंबईहून तडक लोणावळ्याला आले. पुन्हा एकदा दोघे मिळून माझी उलटतपासणी घेऊ लागले, ''कुठवर आलंय काम?'' मी काहीतरी उडवाउडवी केली, पण हे काम हाती घेतल्यावाचून चालणार नाही हे समजून चुकलो.

२०१२ सालच्या जानेवारी महिन्यात मुंबईच्या भाईदास सभागृहात माझ्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्ताने एक कार्यक्रम झाला. त्यात नवीनभाई दवेंनी जाहीर करून टाकले, ''सध्या सरदार पटेलांवर एक नवे पुस्तक लिहिले जात आहे. श्रोत्यांपैकी कोणाकडे, सरदारांबद्दल काही साहित्य असेल, तर त्यांनी ते दिनकरभाईंकडे अवश्य पाठवावे.''


दुसऱ्या दिवसापासून माझ्या ऑफिसच्या पत्त्यावर कित्येक सरदारप्रेमींनी पाठवलेल्या साहित्याचा ओघ सुरू झाला. जुनी वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तके, फोटो अशा अनेक गोष्टी येऊ लागल्या. अजूनपर्यंत मी काठावरच होतो, पण आता मात्र जलाशयाच्या मध्यावर सापडलो होतो. हातपाय मारून पोहल्याविना गत्यंतर नव्हते.

दुसरी सगळी कामे बाजूला सारून पुढील एक वर्षभर सरदार पटेलांच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू शोधून गोळा करण्याचे काम केले. वल्लभविद्यानगर – आणंद, सरदार स्मारकभवन – अहमदाबाद, पार्लमेंट हाऊस तसेच इंडिया इंटरनॅशनल सेंटर – नवी दिल्ली इत्यादी ठिकाणांच्या समृद्ध ग्रंथालयांतून माहिती गोळा केली. दिल्लीभेटीत दिनेश त्रिवेदींखेरीज विख्यात पत्रकार शीला भट्ट यांचे साहाय्य लाभले, त्याचा उल्लेख करायला हवा.

आजवर मी लिहिलेल्या चरित्रात्मक कादंबऱ्यांमध्ये कथानायकाचे साद्यंत जीवन घटनाक्रमांना अनुसरून लिहिले होते. सरदार पटेलांवरील या कादंबरीत हा पारंपरिक क्रम राखलेला नाही. १९१८ साली वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी राजकारणात प्रवेश करणारे बॅरिस्टर वल्लभभाई झवेरभाई पटेल 'सरदार' बनले १९२८ साली, पूर्ण एका दशकानंतर! १९२८च्या बारडोली लढ्याने त्यांना सरदार बनवले आणि याच लढ्याने त्यांना राष्ट्रीय स्तरावर नेऊन ठेवले. त्यानंतर जणू ते वल्लभभाई उरलेच नाहीत. संपूर्ण

नवंकोरं

# द डान्स ऑफ डिसेप्शन




लेखक
**हॅरिएट लर्नर**

अनुवाद
**सुनीति काणे**

**किंमत : २२०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

लैंगिक परिपूर्तीबद्दल ढोंग करण्यापासून कौटुंबिक रहस्यांपर्यंत सर्व गोष्टींचा परामर्श घेताना डॉ. हॅरिएट लर्नर स्त्रियांच्या जवळिकीसाठीच्या, सच्चेपणासाठीच्या आणि आत्मसन्मानासाठीच्या धडपडीचा आलेख मांडतात आणि त्यासाठीच स्त्रियांची खरं बोलण्याची धडपड सुरू असते हे विशद करतात. दोन दशकांच्या वैद्यकीय अनुभवांच्या आधारे, केव्हा बोलावं आणि केव्हा बोलू नये याबद्दल डॉ. लर्नर आपलं तत्त्वज्ञान सांगतात आणि त्याबद्दल आपल्याला विचारपूर्वक मार्गदर्शन करतात. त्यांची वैशिष्ट्यपूर्ण उत्कटता, विनोदबुद्धी आणि स्वच्छ विचार यांच्या आधारे डॉ. लर्नर आपल्या आयुष्यावर परिणाम घडवणाऱ्या, आपल्या आणि इतरांच्या थापांबद्दल, गुपितांबद्दल आणि मूकतेबद्दल विवेचन करतात आणि खरं बोलण्याचा मार्ग कसा सुकर करावा, याबद्दल सर्वांना दिशा दाखवतात.

देशात ते सरदार म्हणून ओळखले जाऊ लागले. १९२८ पासून त्यांच्या सरदारत्वाची ओळख देशातल्या राजकारणींना आणि शासनव्यवस्थेला पटली होती, पण १९४५ पासून इतिहासाने एक वळण घेतले आणि त्यांचे सरदारत्व चहूअंगांनी फुलून आले. १९४५ ते १९५० पर्यंत म्हणजेच त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी केलेली कामगिरी देशभरातच नव्हे तर जगभरात अजोड आहे. सरदारांबद्दल लिहिणाऱ्या कोणाही तटस्थ इतिहासकाराला अतिशयोक्तीचा आरोप सहन करूनदेखील म्हणावेच लागेल की, या पाच वर्षांच्या काळात जर सरदार नसते तर त्यांनी केलेले कार्य दुसरे कोणीही करू शकले नसते. एकवेळ पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्ष दुसरे कोणी होऊ शकले असते; परंतु सरदार नसते, तर त्यांच्या जागी कोणीच नसते.

कादंबरी लिहायचा विचार मनात पक्का झाला तेव्हा असेही ठरवून टाकले की, सरदारांबद्दल लिहायचे ते त्या संपूर्ण विकसित सरदारत्वाबद्दल! वर म्हटल्याप्रमाणे हा कालावधी होता १९४५ ते १९५० चा. त्यामुळे या कादंबरीत १९४५ ते १९५० दरम्यानच्या सरदारांच्या आयुष्यातल्या घटनांचा मुख्यत्वे अंतर्भाव आहे. तरी, अधूनमधून पार्श्वभूमीदाखल इतर काही घटनांची त्यात भर आहे. सरदारांना समजून घेण्यासाठी तसेच, जिथे त्यांच्याबद्दल संदिग्धता वाटली तिथे कधी कधी अशा १९४५ पूर्वीच्या घटना चित्रित केल्या आहेत.

१९२९ मध्ये सरदार काँग्रेसचे अध्यक्ष होऊ शकले असते. तसे घडले असते तर लाहोरला रावी नदीच्या काठी संपूर्ण स्वराज्याचा ध्वज सरदारांच्या हस्ते फडकला असता. १९३६ मध्ये पुन्हा एकदा सरदार काँग्रेसाध्यक्ष होण्याची शक्यता होती. १९४६ मध्ये ते काँग्रेसाध्यक्ष होऊन स्वतंत्र भारताचे पहिलेवहिले पंतप्रधानही झाले असते... या सर्व वेळी काठोकाठ भरलेला प्याला सरदारांच्या ओठाशी आला होता पण – सरदारांनी घोट घेतला नाही, प्याल्याजवळून ओठ काढून घेतले. त्याचे परिणाम काय झाले त्यावर आता 'जर आणि तर'च्या भाषेत बोलून काही निष्पन्न होणार नाही. नकोसे विचार तेवढे घेरून टाकतील. असे जर-तरच इतिहास घडवतात. घटकाभरापूर्वी रस्त्यावर घडलेली एखादी घटना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी बघणाऱ्या दोन माणसांनी त्या एकाच घटनेचे वेगवेगळ्या प्रकारे केलेले वर्णन ऐकले की 'इतिहास म्हणजे तरी काय' असे मनात आल्यावाचून राहत नाही. विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे इतिहास म्हणजे इति+ह+आस म्हणजे 'असे खरोखर

घडले,’ की इतिहास म्हणजे असे हसण्यासारखे (झाले)!

१९४५ ते १९५०च्या काळातील सरदारांचे योगदान लक्षात घेतले तर स्वातंत्र्योत्तर काळात (आणि स्वातंत्र्यपूर्व काळातही) सरदारांवर अन्याय झाला आहे, अशी भावना निर्माण झाल्याविना राहत नाही. सरदारांवर अन्याय झाला आहे अशी ज्यांची समजूत आहे, त्यांना अनुकूल वाटण्याजोगी काही ऐतिहासिक तथ्ये (facts) कादंबरीत गुंफली गेली आहेत, परंतु ही गुंफण कोणत्याही समाजाचे समर्थन करण्याच्या उद्देशाने केलेली नाही. ‘प्रकाशाची सावली’ (प्रकाशनो पडछायो) मध्ये गांधीजी आणि हरिलाल यांच्यातील घटना निव्वळ तथ्यांच्याच आधारे मांडल्या होत्या आणि त्याद्वारे सत्यावर दृष्टी खिळवण्याचा प्रयत्न केला होता, तरीसुद्धा कित्येक असमंज गांधीभक्तांमध्ये त्यावरून असंतोष माजला होता. महामानव कादंबरीचा पाया शक्य तेवढ्या ऐतिहासिक तथ्यांवरच रचला आहे. कादंबरीत कालक्रमाचे कुठे उल्लंघन झाले आहे किंवा कादंबरीच्या आकृतिबंधासोबतच तिचे कलात्मक स्वरूप लक्षात घेता कधी पत्रव्यवहाराला संवादरूप दिले आहे तर कधीमधी एखाद्या विवक्षित घटनेचा अकारण विस्तार टाळण्यासाठी ती पुढेमागे करून घेतली आहे. या सगळ्यामागचा एकमेव उद्देश सरदारांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणे, प्रकाशात आणणे एवढाच आहे. या व्यक्तिमत्त्वात गगनाला गवसणी घालण्याची प्रतिभा आणि क्षमता आहे, तद्वतच जन्माला आलेल्या प्रत्येकाला असतात त्या मर्यादाही आहेत.

उदाहरणार्थ, देशाची फाळणी करावी आणि शक्य तेवढ्या लवकर मुस्लीम लीगला पाकिस्तान देऊन मोकळे व्हावे असे मत चक्रवर्ती राजगोपालाचारींनी १९४१ सालीच व्यक्त केले होते. आपल्या म्हणण्यात अर्थ आहे असा ते आग्रह धरत होते. त्या वेळी नाराज होऊन सरदार म्हणाले होते, ‘‘राजा तर आग ओकतोय!’’ विठ्ठलभाईंच्या इच्छापत्र संदर्भात ज्याप्रकारे सुभाषचंद्रांवर कायदेशीर कारवाई करावी लागली, तीसुद्धा खेदकारकच होती. १९३३ मध्ये लिहिलेले विठ्ठलभाईंचे इच्छापत्र थेट १९३७-३८ पर्यंत सरदारांनी निरपेक्षपणे मान्य केले होते, परंतु नंतर त्रिपुरी काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजी आणि सुभाषचंद्र यांच्यात चांगलीच ‘जुंपली’ होती ते लक्षात घेता सरदारांनी विठ्ठलभाईंच्या इच्छापत्राबाबत वारंवार शंका का व्यक्त करावी याचे उत्तर सापडत नाही.

अर्थात, इतिहासातील प्रत्येक घटना ‘जर-तर’ने व्यापलेलीच असते. या

सगळ्या 'जर-तर'ची कोडी उलगडणे शक्य होत नसते. अशा या न सुटलेल्या कोड्यांबद्दलच्या अनुमानांमुळे कधीकधी पूर्वग्रहप्रेरित विकृत भावना जागवल्या जातात. प्रत्येक सहृदय, सुज्ञ आणि शुद्ध अभ्यासकाने अशाप्रकारच्या भयस्थानांपासून स्वत:ला दूर ठेवले पाहिजे.

एखाद्याला माझ्या या म्हणण्यात अविनयाची अथवा अहंकाराची छाया दिसण्याचे भय मला आहेच. म्हणूनच सांगावेसे वाटते की, या संपूर्ण लिखाणात मी वर सांगितलेला अभिगम (approach) अजिबात नजरेआड होऊ दिलेला नाही.

आधी म्हटल्याप्रमाणे, ही कादंबरी सरदारांच्या आयुष्याची शेवटची पाच वर्षे केंद्रस्थानी ठेवून लिहिली आहे; त्यामुळे सरदारांचे समग्र व्यक्तिमत्त्व इतिहासाच्या परिप्रेक्ष्यात उपलब्ध न होण्याची शक्यता आहे. असे होऊ नये म्हणून या कादंबरीत पुस्तकाच्या प्रांरभी प्रस्तावनावजा एक लेख सादर केला आहे. खरे तर तो लेख म्हणजे एक व्याख्यान आहे. वल्लभविद्यानगर, आणंद, राजकोट आणि सुरत येथे हे व्याख्यान क्रमश: आयोजित केले होते. त्यानंतर एका स्वतंत्र पुस्तिकारूपाने ते प्रसिद्ध झाले. या कादंबरीची प्रस्तावना म्हणून ते व्याख्यान सादर करण्यामागचा उद्देश असा की, त्यात सरदारांचा समग्र कालखंड इतिहासाच्या परिप्रेक्ष्यात पाहिला आहे, तपासला आहे.

'मुंबई समाचार' या दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत ही कादंबरी क्रमश: प्रसिद्ध होत होती. आज ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत असताना कोणाची आठवण करू आणि कोणाची नको असे झाले आहे. अजिबात ओळख नसलेल्या वाचकांनी १९४५ ते ५० दरम्यानच्या वृत्तपत्रांतील कात्रणांपासून ते सरदार स्मारक ग्रंथांपर्यंत जे जे साहित्य उपलब्ध करून दिले, त्यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. आदरणीय नरहरिभाई कोया, नवीनभाई दवे तसेच दिनेशभाई त्रिवेदी यांचा प्रेमळ अत्याग्रह नसता तर अजूनही हे लेखन अपूर्णच राहिले असते. कादंबरीची प्रकरणे लिहीली जात होती तेव्हा रोजच्या रोज स्वत: चौकशी करणाऱ्या महेशभाई शाह यांचेही स्मरण करतो. प्रकाशक मित्र गोपालभाई तर सदैव सोबत असतातच! कादंबरीलेखनादरम्यान एकूण एक संदर्भ क्षणार्धात सादर करून मदत करणाऱ्या चि. पल्लवीला विसरून चालणार नाही.

गुजरातीखेरीज हिंदी आणि इंग्रजी भाषांतदेखील आज ही कादंबरी एकाचवेळी प्रकाशित होत आहे, त्याचाही आनंद आहे.

१० जून २०१३ **– दिनकर जोषी**

*सरदार वल्लभभाई पटेल...भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळावर ज्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला त्या वल्लभभाई पटेलांचं जीवन...त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे निर्णय...जसं संस्थानांचं विलीनीकरण... बहुमताने शिफारस झालेली असतानाही पंतप्रधान पद नाकारलं...१९४६ साली नौदलाच्या सैनिकांचं बंड शमवलं... दबाव येत असतानाही गृहमंत्रिपद न सोडण्याचा ठामपणे घेतलेला निर्णय...महात्मा गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल आदर असूनही काही वेळेला त्या दोघांना त्यांनी केलेला तात्त्विक विरोध... १९४६ ते १९५० हा वल्लभभाई पटेलांच्या जीवनातील महत्त्वाचा राजकीय कालखंड प्राधान्याने अधोरेखित करणारं...तत्कालीन राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर वल्लभभाई पटेलांच्या कार्याची महती सांगणारं आणि वल्लभभाई पटेलांच्या व्यक्तिमत्त्वाचा समग्र वेध घेणारं पुस्तक आहे 'महामानव सरदार पटेल'...त्या पुस्तकातील हे महत्त्वपूर्ण प्रकरण...*

'**का**ठेवाडच्या सर्वच्या सर्व दोनशेबावीस संस्थानिकांचा एकच संघ निर्माण करून मी गुरुदक्षिणा म्हणून तुमच्या चरणांशी रुजू करेन,' असं सरदारांनी गांधीजींना वचन दिलं होतं. आता ती संकल्पना जवळजवळ साकार झाली होती. जुनागढच्या नबाबी राज्याचीच काय ती एकमात्र अडचण होती. जुनागढचे दिवाण शाहनवाज भुट्टो पाकिस्तानात विलीन होण्याची घोषणा करून चुकले होते. वेळ आलीच तर जुनागढमध्ये धान्यटंचाईचं संकट उभं राहू नये म्हणून धान्यानं भरलेली जहाजं पाकिस्तानहून निघून वेरावळ बंदरात येऊन पोहोचली होती. जुनागढचा निर्णय पाकिस्तानला मान्य होता. मूळ जुनागढच्या असलेल्या; परंतु आता जुनागढबाहेर – विशेषत: मुंबईत – वास्तव्य करून असलेल्या गुजराती प्रजेच्या पुढाऱ्यांना सरदारांनी एकत्र आणलं होतं. जुनागढचं राज्य हस्तगत करण्यासाठी त्यांनी आरझी हुकूमत नावाची एक संघटना उभी केली होती. सर्वप्रथम या संघटनेनं राजकोटमधल्या 'जुनागढहाऊस'चा ताबा घेतला. एकीकडे हिंदुस्थानच्या आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांमध्ये पत्रव्यवहार सुरू असतानाच तिकडे जुनागढराज्याच्या बांटवा, बाबरियावाड, मांगरोळ आणि माणावदार या परगण्यांवर सरदारांची नजर होती. १९४३ पर्यंत हे चार तालुके जुनागढच्या नबाबी हुकमतीखाली नव्हते. चारही तालुक्यांचे शासक स्वतंत्र जहागीरदार गणले जात होते. राजकोटच्या पोलीटिकल एजंटच्या ते थेट देखरेखीखाली होते. असे छोटे छोटे तालुके

नजिकच्या मुख्य राज्यांशी संलग्न करून आपला कारभार अधिक दृढकरण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न होता. ब्रिटिश सार्वभौमत्वाच्या मुख्य कायद्याला जोडलेल्या एका पोटकलमाद्वारे अशा टीचभर, लहान राज्यांना त्यांच्या शेजारच्या मुख्य राज्यात मिसळून टाकलं होतं.

सरदारांनी त्या कायद्याचा बारकाईनं अभ्यास केल्यानंतर एक घोषणापत्र जाहीर केलं. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी ब्रिटिश सार्वभौम सत्तेचा अंत झाला. त्याबरोबरच मांगरोळ, माणावदर, बांटवा आणि बाबरियावाड यांना जुनागढमध्ये समाविष्ट करणाऱ्या पोटकलमाचाही आपोआपच अंत झाला आहे. तेव्हा आता जुनागढजर स्वत:ला स्वतंत्र मानत असेल, तर हे चार जहागीरदारही तेवढेच स्वतंत्र समजले गेले पाहिजेत. माणावदर आणि मांगरोळ इथले जहागीरदार मुसलमान होते, त्यांना शेख म्हटलं जाई; परंतु बाटवा आणि बाबरियावाडचे जहागीरदार 'दरबारी' जहागीरदार होते. त्यांना 'दरबार' असं म्हटलं जात असे. माणावदर आणि मांगरोळची प्रजा नाडली जात होती. शेखांच्या संरक्षणासाठी जुनागढनं आपल्या पोलीसदलाची कुमक तिकडे पाठवली होती.

सरदारांना ही बाब गंभीर वाटली. जुनागढजर अशाप्रकारे इतर जहागिरींमध्ये आपलं पोलीस दल पाठवू शकत असेल, तर मग भारतीय लष्करी दलांना जुनागढमध्ये मज्जाव का असावा?

हाच प्रश्न सरदारांनी जवाहरलाल आणि माऊंटबॅटन यांच्यापुढे ठेवला. माऊंटबॅटन म्हणाले, ''सरदार, अशा रीतीनं लष्करी दलं जुनागढमध्ये शिरली तर आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केला असं होईल. शिवाय, जुनागढनं आपण पाकिस्तानशी संलग्न असल्याचं घोषित करून ठेवलंय.''

''या मुद्द्यावर आपण जनमत घ्यायचं जाहीर करून पुढे पाऊल टाकू शकतो,'' जवाहरलालांनी स्वत:चं मत मांडलं.

''जुनागढमध्ये लोकमत घेण्याची गरजच नाही.'' सरदारांनी ठामपणे म्हटलं.

''मग असं करा, जुनागढमध्ये पोलीस दल पाठवा, लष्कर नको आणि त्यासोबतच युनायटेड नेशन्समध्ये आपण एक फिर्यादसुद्धा दाखल करून टाकू.'' माऊंटबॅटन म्हणाले.

''युवर एक्सलन्सी,'' सरदार म्हणाले, ''जुनागढला आंतरराष्ट्रीय कायद्यात गुंतवण्यात अर्थ नाही. अशा बाबतीत कुठल्याही न्यायालयात फिर्यादी म्हणून जाणं निरर्थक असतं. त्यानं काही साध्य होणार नाही.''

‘‘अशानं आपल्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला तडा जायची दाट शक्यता आहे,’’ जवाहरलाल हळूच म्हणाले.

‘‘असं न केल्यामुळे जेवढा धोका पत्करावा लागेल, त्यापुढे ती आंतरराष्ट्रीय बदनामी कमी हानिकारक असेल.’’ संभाषणाला पूर्णविराम देत सरदार म्हणाले.

अखेरीस सरदारांनी स्वत: ठरवल्याप्रमाणे लष्करी दलं पाठवून मांगरोळ, माणावदर वगैरे जहागिरींवर ताबा मिळवला. जुनागढनं पाठवलेले पोलीस भारतीय लष्कराला शरण आले. जुनागढच्या नबाबाला हे कळताच सगळ्यात आधी त्यानं कराचीला पळ काढला. आपल्या बेगमा, जडजवाहीर आणि आपले कुत्रे या सगळ्यासकट आपल्या खासगी विमानानं केशोदच्या विमानतळावरून तो रातोरात पळून गेला. त्या पळापळीमध्ये त्याची एक बेगम आपल्या शाहजाद्याला बरोबर घ्यायला विसरली. मुलाला आणण्यासाठी ती विमानतळावरून महालात परत आली. अत्यंत घाबरलेल्या नबाबानं बेगम परतायची वाट न बघता विमान ताबडतोब उडवण्याचा हुकूम दिला. नबाब पळून गेला. एक बेगम आणि शाहजादा मागेच राहिले.

नबाबानं पळ काढताच जुनागढचा कारभार ढासळला. दिवाण शाहनवाज भुट्टोंनी शरणागती पत्करली. काठेवाडचा राजकीय संघ साकार करण्याची सरदारांची इच्छा पूर्ण झाली.

जुनागढच्या दिवाणानं शरणागती स्वीकारल्याची बातमी भारत सरकारच्या राजकोटमध्ये असलेल्या रिजनल कमिशनरनं दिल्लीत व्ही.पी. मेननांना कळवली. मध्यरात्र व्हायला आली होती. भारत सरकारनं अधिकृतपणे शरणागती मान्य करून त्याबद्दल पाकिस्तानला कळवावं हे आंतरराष्ट्रीय परंपरेला धरून होईल, असं मेननांना वाटत होतं. त्यांनी ही बातमी ताबडतोब पंतप्रधान जवाहरलालांना कळवली. जवाहरलालांनी पाकिस्तानच्या पंतप्रधानांना पाठवायचा संदेश मेननांकडून लिहून घेतला. भारत सरकारच्यावतीनं जवाहरलालांनी संदेशात म्हटलं, की भारत सरकार जुनागढच्या प्रजेकडून लोकमत जाणून घेईल आणि पाकिस्तानची इच्छा असेल, तर त्यासंबंधात पुढे चर्चा करता येईल.

संदेश पाठवून दिल्यानंतर मेननांनी त्याची प्रत शंकरांकडे दिली. शंकर तडक सरदारांच्या निवासस्थानी गेले. भर झोपेतून त्यांनी सरदारांना उठवलं. शंकरांनी दिलेली बातमी सरदारांनी अजिबात उत्तेजित न होता, स्वस्थपणे ऐकून घेतली. त्यानंतर जवाहरलालांनी पाकिस्तानला पाठवलेल्या तारेची नक्कल त्यांनी लक्षपूर्वक वाचली. मस्तक झुकलेलं ठेवून बराच काळ त्यांनी

तारेतला एक एक शब्द आत्मसात केला आणि मगच नजर उचलून समोर रोखली.

''क्षमा करा सरदार,'' कितीतरी वेळ ओठातल्या ओठात दाबून ठेवलेली गोष्ट शेवटी शंकरांनी उच्चारून टाकली. ''पाकिस्तानशी यावर आणखी चर्चा करणं अथवा जुनागढच्या प्रजेचं मत जाणून घ्यायची हमी देणं याची खरोखरच गरज आहे, असं तुम्हाला वाटतं का?''

सरदारांच्या ओठावर जरासं हसू खेळलं. डोळे मोठे करून ते म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय कायदा आणि युनायटेड नेशन्स यातले दोन निष्णात आपल्या देशात राहतात ठाऊक आहे ना शंकर? या दोघा निष्णातांमधूनच मला आपलं गाडं हाकून न्यायचं आहे.''

''दोन निष्णात?'' आश्चर्यानं शंकरांनी विचारलं.

''हो. एकच नाही, दोन दोन! या दोघा निष्णातांच्या दृष्टीनं देशापेक्षा युनोचं महत्त्व जास्त आहे. पहिल्या निष्णाताचं नाव आहे जवाहरलाल नेहरू आणि दुसऱ्याचं लॉर्ड माऊंटबॅटन. या दोघांच्यामधून वाट काढून गाडं मुक्कामावर पोहोचवायचं असेल, तर न आवडणाऱ्या काही गोष्टी स्वीकाराव्या लागतात बाबा! पंतप्रधानांनी यात युनोला ओढलं नाहीये तेवढं तरी बरंय. त्याबद्दल आभारच मानायला हवेत त्यांचे.''

शंकर काय ते समजले. त्यांच्याही चेहऱ्यावर स्मित उमटलं.

चार दिवसांनी सरदार जुनागढला गेले. बहाउद्दिन कॉलेजच्या विशाल मैदानात हजारो माणसं जमली होती. त्यांना उद्देशून सरदार म्हणाले, ''भारत सरकारच्या दृष्टीनं तुमची इच्छा हाच अखेरचा शब्द. मी तुम्हाला विचारतोय, तुम्हाला हिंदुस्थानसोबत राहायचं आहे की पाकिस्तानसोबत?'' माणसांनी गच्च भरलेल्या मैदानात हजारो हात उंचावले गेले, चारही दिशा व्यापून टाकणारा घोष दुमदुमला, ''हिंदुस्थान, हिंदुस्थान!''

जुनागढचा कारभार व्यवस्थितपणे मार्गी लावल्यानंतर सरदार सोमनाथला गेले. सोबत नवानगरचे जामसाहेब आणि आरझी हुकमतचे शामळदास गांधी होते. समुद्रकिनारी असलेलं जर्जर अवस्थेतलं शिवमंदिर त्यांनी पाहिलं. इतकं प्राचीन, इतकं ऐतिहासिक मंदिर, महंमद गझनीपासून अनेक परधर्मीयांनी वारंवार लुटून नेलं होतं, तोडून फोडून त्याची दुरवस्था करून टाकली होती. सरदार थोडा वेळ शिवलिंगासमोर नतमस्तक होऊन उभे राहिले. मग म्हणाले, ''जामसाहेब, या मंदिराचा जीर्णोद्धार करणं हे आपलं पहिलं कर्तव्य आहे.'' नंतर शामळदास गांधींकडे वळून म्हणाले,

''मंदिराच्या नवनिर्माणासाठी एक ट्रस्ट स्थापन करा. त्यासाठी आवश्यक तेवढा निधी आपण गोळा करू.''

''सरदार,'' जामसाहेब उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''ज्या कामासाठी तुम्ही ट्रस्ट स्थापायचा म्हणताहात, त्या ट्रस्टला मी माझ्यातर्फे एक लाख रुपये अर्पण करतो.''

''...आणि सोमनाथच्या नवनिर्माणासाठी आरझी हुकमततर्फे आम्ही एकावन्न हजार रुपये देतो.'' शामळदास गांधींकडून पडसाद आला.

समुद्रकिनारी जमलेले शेकडो लोक हे ऐकून आनंदानं नाचू लागले. टाळ्यांच्या कडकडाटानं आणि सोमनाथाच्या जयघोषानं अवघं वातावरण भरून गेलं.

सरदार दिल्लीला परतण्यापूर्वीच सोमनाथाच्या नवनिर्माणाची खबर दिल्लीच्या राजकीय वर्तुळापर्यंत पोहोचली होती. भारताच्या उपपंतप्रधानांनी स्वत:ला एका विशिष्ट जातीच्या मंदिराच्या नवनिर्माणाशी जोडून घ्यावं, हे पंतप्रधान जवाहरलालांना रुचलं नाही. सरदार भेटताच त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ''सरकार चालवणारे मंत्रीच जर अशा तऱ्हेनं कोण्या एका विशिष्ट जातीच्या मंदिराच्या पुनरुद्धारात भाग घेऊ लागले, तर उद्या उठून मुसलमानसुद्धा बाबरी मशिदीच्या नवनिर्माणाचा प्रस्ताव घेऊन येतील, अशी भीती वाटल्यावाचून राहत नाही.''

''दोन्हींमध्ये मुळातच फरक आहे जवाहरलाल,'' सरदार बोलू लागले. ''सोमनाथ मंदिराच्या जमिनीच्या मालकीबद्दल कोणाचाही दावा नाही. शिवाय या जीर्णोद्धारासाठी सरकारी तिजोरीतून एक रुपयासुद्धा खर्च होणार नाहीये. सगळा पैसा प्रजेचा असेल. प्रजेकडून जाहीररीत्या गोळा केला जाईल आणि त्याचा ट्रस्ट असेल. बाबरी मशिदीवर असा काही दावा सांगण्यासाठी सगळ्यांत आधी त्या मशिदीच्या जमिनीवरचा मालकी हक्क न्यायालयाला ठरवून द्यावा लागेल.''

सरदारांचा हा पवित्रा जवाहरलालांना आवडला नसला, तरी त्यांनी पुढे आणखी वाद घातला नाही. विषय तेवढ्यावरच संपला.

रियासती खातं स्थापन झालं आणि ते सरदार पटेलांच्या अखत्यारीत दिलं गेलं. त्यानंतर लगेचच एकदा व्हाइसरॉय माऊंटबॅटननी हसत हसत सरदारांना विचारलं, ''सरदार! या वृक्षावर लटकणाऱ्या पाचशेबासष्ट सफरचंदांपैकी तुमच्या टोपलीत तुम्ही किती टाकणार?''

प्रश्नाचा रोख सरदारांच्या लक्षात आला. देशी संस्थानांपैकी किती राज्यं हिंदुस्थानात विलीन होतील, हे माऊंटबॅटनना जाणून घ्यायचं होतं. सरदारांनी चटकन उत्तर दिलं, ''सगळी!''

''अरे! दुसऱ्या कोणासाठी दोन-चारसुद्धा ठेवणार नाही?''

''शक्यतो नाहीच!'' सरदार म्हणाले. मग तेवढ्यावरच न थांबता त्यांनी पुढे आणखी म्हटलं, ''तरी पण... बघू!''

ज्या राजांनी आपापली राजगादी देशाच्या ऐक्यासाठी समर्पित केली होती, ते एकजात सगळे सारखेच देशभक्त होते असं नव्हे. तरीसुद्धा बहुतेक सर्वांनी संघर्ष करून अडचणी उभ्या करण्याऐवजी काळाबरोबर राहून तडजोड करण्याची वृत्ती दाखवली होती. संस्थानिकांच्या या त्यागाच्या बदल्यात त्यांना तनखा मिळत राहावा, असं सरदारांचं ठाम मत होतं. राज्याचा आकार, त्याचं वार्षिक उत्पन्न, तिथल्या राजांच्या सध्याच्या खर्चाची तरतूद इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन, एक निश्चित धोरण ठरवून त्यानुसार सर्व राज्यांच्या वर्षासनाची रक्कम ठरवून दिली गेली होती. तसंच काही खास हक्कदेखील मोबदला म्हणून दिले गेले होते. आजवर आपापल्या राज्यात भोगता येणारे त्यांचे विशेष अधिकार यापुढेही तसेच राखले जाणार होते. त्यांच्या उत्पन्नावर त्यांना कर भरावा लागणार नाही अशी व्यवस्था करून ठेवली होती. वर्षासनाच्या रकमेत ठरावीक कालावधीनंतर वाढहोत राहावी, अशी काही राजांनी मागणी केली. सरदारांनी ती मागणी नाकारली, एवढंच नव्हे; तर राजाच्या पश्चात त्याच्या वारसदारांच्या तनख्याचं प्रमाण घटत जाईल असंही नमूद करून ठेवलं. याचाच अर्थ, तीन-चार पिढ्यांनंतर ही वर्षासनं जवळपास संपुष्टातच येणार होती. असं असूनही, त्यातला 'कायमी वर्षासन' हा शब्द जवाहरलालांना रुचत नव्हता. आपली नाराजी उघड करत त्यांनी सरदारांना म्हटलं, ''हे म्हणजे आपण आपल्यालाच 'यावच्चंद्र दिवाकरौ' बांधून घेतल्यासारखं होतंय.''

''करार नेहमी उभयपक्षी असतो जवाहरलाल,'' सरदारांनी उत्तर दिलं. ''राजेलोकांनी त्यांची राज्यं 'यावच्चंद्र दिवाकरौ' देशाला देऊन टाकली आहेत. बदल्यात आपण त्यांचे तनखे प्रत्येक पिढीगणिक कमी होत जातील, अशी सोय करून ठेवला आहे.''

''एक पिढी तीस-चाळीस वर्षं जगली, तरी तीन-चार पिढ्या पूर्ण होईपर्यंत शे-सव्वाशे वर्षं सहज जातील. एवढा मोठा कालखंड आणि त्यातल्या भावी पिढ्या यांच्याबद्दल आत्तापासून आपण काही ठरवून टाकायचं आणि ते उचित मानायचं म्हणजे अवघड आहे.'' जवाहरलालांनी आपलं

म्हणणं पुढे रेटलं.

''सर्वसामान्य व्यवहारातदेखील दोन पक्षात जेव्हा करार होतो, तेव्हा दोन्ही पक्षांच्या वारसदारांना त्या करारातले तपशील बंधनकारक असतात, असा नियम जगभरात मानला जातो. इतक्या सर्वमान्य गोष्टीचं आपण उल्लंघन करू शकत नाही.'' सरदारांनी स्वत:ची बाजू स्पष्ट केली.

''पण काँग्रेस कार्यकारिणीत वर्षासनाला विरोध होण्याची शक्यता आहे.''

जवाहरलालांची शंका खरी ठरली. काँग्रेसमध्ये स्वत:ला डावे आणि जहाल म्हणवणाऱ्या चळवळ्या तरुणांची संख्या बरीच मोठी होती. सरदारांनी मांडलेला वर्षासनाचा मुद्दा त्यांच्या गळी उतरत नव्हता. राजेमहाराजांनी वर्षानुवर्षं, पिढ्यान्‌पिढ्या प्रजेचं शोषण केलं आहे, स्वत: ऐषआराम भोगले आहेत तेव्हा आता त्यांना रिकाम्या हाती दूर लोटणं हीच काळाची गरज आहे, असं ते मानत होते. जवाहरलालांची नाराजी आणि या तरुणांचा रोष पाहता सरदारांना स्पष्टपणे जाणवलं होतं, की भारत संघाच्या नव्या घटनेत अशाच तऱ्हेनं वर्षासनाची तरतूद करून ठेवली नाही, तर नंतरचं कोणतंही सरकार केवळ बहुमताच्या जोरावर एक कायदा करून चुटकीसरशी सगळी वर्षासनं बंद करून टाकेल. सरदारांप्रमाणेच संस्थानिकांच्या मनातही अशी शंका होती, त्यामुळे त्यांनी सरदारांचं लक्ष तिकडे वेधलं होतं. राजांचे तनखे कोणत्याही तत्कालीन सरकारच्या मेहेरबानीवर अवलंबून नसावेत. भविष्यकाळातल्या सरकारनं ते मान्य करावेत एवढ्यासाठी घटनेतच तशी पक्की तरतूद करण्यात यावी, असं त्यांचं म्हणणं होतं. संस्थानिकांच्या मनातल्या संदेहातला तथ्यांश सरदार समजू शकत होते. भावी सरकारं कशी असतील त्याचा आत्ता अंदाज बांधणं कठीण होतं. स्वत:ला जहाल म्हणवणाऱ्या उत्साही काँग्रेसींनी लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढहोण्याच्या भरात राजांना दिलेल्या पवित्र वचनाचा भंग करून टाकला तर देशाकडून मोठं पापाचरण घडलं असं म्हटलं जाईल, असं त्यांना वाटलं. वचनभंगाचं पाप घडू नये म्हणून सरदारांनी संस्थानिकांच्या तनख्याची व्यवस्था घटनासमितीपुढेच ठेवली.

वाटलं होतं तसा विरोध झालाच. काँग्रेस कार्यकारिणी आणि घटनासमिती अशा दोन्ही आघाड्यांवर तो विरोध शमवताना सरदारांनी दृढपणे म्हटलं, ''हिंद स्वातंत्र्य कायद्याखाली या तमाम राजेमहाराजांना, स्वत:ला स्वतंत्र घोषित करण्याचा 'टेक्निकल' अधिकार मिळाला होता. तो त्यांनी खरोखरच अमलात आणला असता अथवा पाकिस्तानात सामील होण्याची इच्छा दर्शवली असती, तर त्यामुळे केवढा मोठा उपद्रव झाला

असता, केवढ्या मोठ्या अडचणी उभ्या ठाकल्या असत्या, त्याची आत्ता कल्पनाही करणं कठीण आहे. तसं करण्याची शक्ती त्यांच्यापाशी होती. शेकडो वर्षांपासून राजे लोकांचं समाजात एक विशिष्ट स्थान निश्चित होतं. त्यांच्या जागी आपण स्वत:ला ठेवून बघू आणि मग त्यांच्या योगदानाची किंमत ठरवू. भारत संघात सामील होऊन त्यांनी त्यांचं कर्तव्य पार पाडलं आहे. आता आपल्याला आपलं कर्तव्य बजावायचं आहे. त्यात जर आपण अयशस्वी झालो, तर तो विश्वासघात ठरेल. एवढंच नव्हे; तर अवघ्या देशाचं स्थैर्यच त्यामुळे धोक्यात येईल.

''तुमच्यापैकी बऱ्याच जणांना माहीत नसेल; पण या राजांना तनख्यापोटी द्यावी लागणारी रक्कम वर्षाला साडेपाच कोटी रुपये इतकीच आहे. त्यांच्या राज्यांकडून आपल्या केंद्रसरकारला जी संपत्ती मिळाली आहे, तिचं व्याजच सगळ्यांचे वार्षिक तनखे देऊन टाकायला पुरेल इतकं आहे. त्यामुळे तनख्यासंबंधीची व्यवस्था आपण भावी पिढ्यांच्या दयेवर सोडून देऊ शकत नाही. संविधानातच तिचा अंतर्भाव करणं हे आपलं पवित्र कर्तव्य आहे.''

सरदार राजेमहाराजांच्या बाजूचे आहेत, भांडवलशाहीवादी आहेत, समाजावादाच्या विरुद्ध आहेत अशी हाकाटी ऐकत आल्यामुळे 'कुंपणावर' असलेले काँग्रेसचे – आणि काँग्रेसचे नसलेलेसुद्धा – सगळेच सभासद सरदारांचं ते भावपूर्ण भाषण ऐकून त्यांच्या प्रस्तावाशी सहमत झाले. पाच कोटी रुपयांच्या बदल्यात देशानं केवढं प्रचंड मोठं राज्य कमावलं आहे, त्याचं चित्र उभं करत सरदार म्हणाले, ''हिंदुस्थानच्या आजवरच्या इतिहासात एवढा मोठा भूप्रदेश एका ध्वजाखाली आणि एकाच शासनाखाली कधीच आला नव्हता. चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोकापासून ते मोगलांच्या किंवा अगदी ब्रिटिशांच्या हुकमतीखालीसुद्धा एवढा मोठा विस्तार एकसंध देशाच्या रूपात निर्माण झाला नव्हता. आज ते शक्य झालं आहे. त्याचं श्रेय जेवढं देशातल्या कोट्यवधी जनतेचं आहे, तेवढंच ते या राजांचंही आहे. या सर्व राजांशी जो काही करार झाला आहे, तो 'तुम्ही' आणि 'आम्ही' अशा पद्धतीनं नव्हे; तर 'आपण' या विचारसरणीच्या आधारानं झाला आहे.''

संस्थानिकांच्या तनख्यासंबंधीचं सरदारांचं पवित्र वचन टाळ्यांच्या कडकडाटात काँग्रेस कार्यकारिणीनं आणि नंतर घटनासमितीनंही मान्य केलं.


❖

नवंकोरं

# द डान्स ऑफ अँगार

लेखक
**हॅरिएट लर्नर**

अनुवाद
**पूर्णिमा कुंडेटकर**




**किंमत : २४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

पुस्तकाचं सार त्याच्या नावातंच सामावलेलं. रागाचं नृत्य? पण खरोखरच रागातून निर्माण होणाऱ्या पुढच्या घटना या नृत्याच्या पदन्यासासारख्याच असतात. एकाने कोणता पदन्यास केला त्यानुसार समोरच्या एका किंवा अनेक व्यक्तींच्या प्रतिसादात्मक हालचाली घडत असतात. हे प्रत्येकच नात्यात आणि व्यवहारात घडत असतं. हॅरिएट यांनी अशाच विविध प्रकारच्या नात्यांमध्ये घडणाऱ्या घटनांवर आणि त्याला कारणीभूत असलेल्या अनेक सचेतन व अचेतन जाणिवांवर प्रकाश टाकला आहे. राग हा तुमच्या मनाचा एक आविष्कार आहे की त्याच्या कोणत्यातरी गरजा अपूर्ण राहत आहेत; मग त्या गरजा शारीरिक, मानसिक, भावनिक कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. कधीकधी व्यक्ती ज्या प्रसंगाबाबत राग व्यक्त करत असते, ते हिमनगाचे टोक असू शकते – तिच्या दबलेल्या, नाकारलेल्या, मारल्या गेलेल्या नात्याचे, भावनांचे किंवा शारीरिक गरजांचे. त्याकडे वेळेत लक्ष दिल्यास पुढील बरीच गुंतागुंत टाळता येऊ शकते. हॅरिएट यांनी अनेक प्रकारच्या रागाच्या अभिव्यक्तींवर आणि नात्यांच्या गुंतागुंतीवर उदाहरणांसह प्रकाश टाकला आहे आणि अनेक चांगले उपायही सुचवले आहेत.

प्रासंगिक

# देवदास

*(१२ जानेवारी या मृणालिनी गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त 'देवदास' या कादंबरीतून...)*

*'देवदास' ही शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांची बहुचर्चित कादंबरी. या कादंबरीचा अनुवाद केला आहे मृणालिनी गडकरी यांनी. या कादंबरीवर वेगवेगळ्या दशकांत चित्रपट निर्माण केले गेले. ही केवळ एक प्रेमकहाणी नाही, तर तत्कालीन सामाजिक चालीरीतींच्या, उच्च-नीचतेच्या पार्श्वभूमीवर घडणारं ते एक संवेदनानाट्य आहे. देवदास, पार्वती आणि चंद्रमुखी यांच्या परस्परांविषयीच्या भावनांचं हे संयत नाट्य...*

दुसऱ्या दिवशी देवदास खाली उतरत असताना जिन्याखाली त्याला पार्वती दिसली. तिला पाहताच तो थबकलाच. पार्वती त्याच्याकडेच पाहत होती. त्याच्यात झालेला बदल तिच्या लक्षात आल्यावाचून राह्यला नव्हता. देवदास तिच्या जवळ आला आणि गंभीरपणे त्यानं विचारलं, 'कधी आलीस पार्वती?'

तोच आवाज! तीन वर्षांनंतर आज भेट होत होती. मान खाली घालून पार्वतीनं उत्तर दिलं, 'आज सकाळीच आले.'

'पुष्कळ दिवसांत भेट नाही. तुझं ठीक चाललंय ना?'

पार्वतीनं मानेनंच होकार दिला.

'चौधरीमोशाई बरे आहेत? आणि मुलं?'

'सगळे बरे आहेत.' पार्वतीनं पुन्हा मान वर करून त्याच्याकडे पाह्यलं.

पण 'तू कसा आहेस? काय करतोस?' असं एकदाही विचारलं नाही. असं विचारणं तिला रास्त वाटलं नाही.

मग देवदासनं विचारलं, 'आता काही दिवस राहणार आहेस ना?'

'हो.'

'बाकी काय?' असं म्हणून देवदासच बाहेर निघून गेला.

दिवस झाले. त्याबद्दल सांगायचं तर एक मोठी कथाच होईल. पण इथं त्याची आवश्यकताच नाही. सर्व कार्य उरकल्यानंतर पार्वतीनं धर्मदासला एका बाजूला घेतलं आणि त्याला एक सोन्याची साखळी देऊन म्हणाली, 'धर्म, तुझ्या मुलीसाठी.'

धर्मदासच्या डोळ्यात पाणी उभं राह्यलं. 'किती दिवसांनी पाहतोय तुम्हाला! सगळं ठीक आहे ना, दीदी?'

'हो. अगदी ठीक आहे. तुझी मुलंबाळं बरी आहेत?'

'हो.'

'तू बरा आहेस ना?'

'कसलं काय, पारू! निघून जावंसं वाटतं. धनी तर गेले.' धर्मदास सुस्कारा सोडत म्हणाला. आणखी बरंच काहीबाही तो बोलला असता पण पार्वतीनं त्याला अडवलं. हे सगळं ऐकण्यासाठी तिनं त्याला साखळी दिली नव्हती.

'असं कसं म्हणतोस, धर्म? तू गेल्यावर देवदादाकडे बघणार कोण?'

धर्मदास कपाळावर हात मारून घेत म्हणाला, 'जेव्हा लहान होते तेव्हा बघितलं. आता न बघितलेलं बरं, पारू!'

पार्वतीनं त्याच्या अगदी जवळ जाऊन हळू आवाजात विचारलं, 'धर्म, एक गोष्ट अगदी खरी खरी सांगशील?'

'का नाही सांगणार, दीदी?'

'मग खरं सांग, देवदा सध्या करतो काय?'

'काय करणार कप्पाळ!'

'धर्मदास, स्पष्ट सांग ना!'

धर्मदासनं पुन्हा एकदा कपाळावर हात मारून घेतला. 'आणखी उघड करून काय सांगू दीदी? ह्या का सांगायच्या गोष्टी आहेत? आता तर धनी नाहीत. देवदाच्या हातात प्रचंड पैसा! आता अडवणार कोण?'

पार्वतीचं तोंड उतरलं. तिच्या कानावर काही गोष्टी आल्या होत्या. पण

तिचा त्यावर विश्वास बसला नव्हता. तिच्या तोंडाला कोरड पडली. ‘सांगतोस काय धर्मदास!’

मनोरमेनंही पत्रातून काही गोष्टी कळवल्या होत्या. पण पार्वतीला त्या खऱ्या वाटल्या नव्हत्या.

धर्मदास निराशेनं मान हलवत सांगायला लागला, ‘जेवण नाही, झोप नाही, फक्त बाटली. पिणं आणि पिणं. तीन-तीन चार-चार दिवस कुठे पडलेले असतात त्याचा पत्ताच नसतो. किती पैसा उडवलाय! कित्येक हजारांचे दागिने करून दिलेत म्हणे तिला!’

पार्वतीच्या अंगावर काटा उभा राहिला. ‘धर्मदास, खरं आहे हे?’

धर्मदास जणू स्वत:शीच बडबडायला लागला. ‘पारू, पोरी तुझं ऐकेल कदाचित्! जरा सांगून बघ! तब्येत कशी झालेय बघ! असंच सुरू राह्यलं तर आणखी किती दिवस काढून काढून काढतील, सांग बरं? कुणाला सांगू गं? आई, बाप, भाऊ– ह्यांना ह्या गोष्टी सांगता येतात का? डोकं आपटून जीव द्यावासा वाटतो. पारू! आता जगण्याची इच्छाच राहिली नाही.’ धर्मदास पुन्हा पुन्हा कपाळावर हात मारून घेत होता.

पार्वती निराश झाली. नारायणबाबू गेल्याचे कळताच ती धावत आली होती. अशा दु:खाच्या वेळी आपण देवदासजवळ असायला पाहिजे, असं तिला वाटलं होतं. पण तिचा लाडका देवदादा! काय झालं होतं त्याचं! तिला कितीतरी आठवणी यायला लागल्या. जेवढा दोष तिनं देवदाला दिला त्याच्या शतपट स्वत:ला दिला. ती असती तर असं झालं असतं का? पूर्वी तिनं स्वत:च्या पायावर कुदळ मारून घेतली होती; पण आताचा तडाखा तिच्या मस्तकावरच बसला होता. तिच्या देवदाचं आयुष्य वाया जात होतं आणि ती दुसऱ्याच्या संसाराची घडी बसवण्यासाठी झटत होती. दुसऱ्यांना आपलं मानून ती जेवायला वाढत होती आणि तिचं सर्वस्व उपाशी होतं. ‘आज देवदासच्या पायावर डोकं आपटून जीव द्यायचा,’ अशी तिनं प्रतिज्ञा केली.

दुपार सरली होती. पार्वती देवदासच्या खोलीत आली. देवदास बिछान्यावर हिशेब पाहत बसला होता. त्यानं पार्वतीला आत आलेलं पाह्यलं. पार्वतीनं हळूच दार लावून घेतलं आणि ती जमिनीवरच बसली. देवदास तिच्याकडे पाहून हसला. तो उदास पण शांत दिसत होता. त्याला अचानक चेष्टा करायची लहर आली. ‘मी तुझी बदनामी केली तर?’

पार्वतीनं एकदा लाजून त्याच्याकडे पाह्यलं आणि मान खाली घातली.

ही गोष्ट त्याच्या मनाला कायमची लागून राहिली होती हेच त्याच्या वागण्यावरून स्पष्ट दिसत होतं. त्यामुळे तिला जे बोलायचं होतं तेही ती विसरून गेली. देवदासशी बोलणं तिला अवघड वाटत होतं.

देवदास हसला, 'समजलं. लाजतेस ना?'

तरीही पार्वतीला काय बोलावं ते सुचेना. देवदासच बोलायला लागला, 'त्यात लाजण्यासारखं काय आहे? दोघांनी मिळून जरा बालिशपणा केला... हेच बघ ना! बघितलंस ना मध्येच काहीतरी गडबड झाली. तू तुला वाटलं ते बोललीस. मीही तुझ्या कपाळावर जखम केली. कसं झालं ना हे सगळं!'

देवदासच्या ह्या बोलण्यात उपरोध नव्हता, खोच नव्हती. प्रसन्न हसून तो भूतकाळातील दुःखदायक घटनेचा उल्लेख करत होता. पण पार्वतीचं काळीज तुटत होतं. तोंडावर पदर धरत एका दमात ती म्हणाली, 'देवदा, हा जखमेचा वणच माझं समाधान आहे, माझी संपत्ती आहे. तुझं माझ्यावर प्रेम होतं म्हणूनच बालपणीचा इतिहास माझ्या कपाळावर लिहिलास. त्याची मला लाज कशी वाटेल? तो कलंक नाही. गौरवाचं चिन्ह आहे ते!'

'पारू!'

'काय?' पार्वतीचा पदर तसाच तोंडावर होता.

'मला तुझा राग येतो बघ!' आता मात्र त्याचा आवाज घोगरा झाला होता. 'बाबा नाहीत. केवढे वाईट दिवस आलेत नशिबात! पण तू असतीस तर काळजी नव्हती. वहिनींचं तर तुला माहीत आहेच. दादाचा स्वभावही तू ओळखतेस. आईचं काय करावं सांग बघू आणि माझं तरी काय होणार आहे कोण जाणे! तू असतीस तर मी निश्चिंत झालो असतो सगळं तुझ्यावर सोपवून... हे ग काय, पारू?'

पार्वती हुंदके देऊन रडायला लागली.

देवदास म्हणाला, 'रडतेस? मग आता बोलत नाही.'

पार्वती डोळे पुसून म्हणाली, 'बोल.'

देवदासनं क्षणात आवाज बदलला. 'पारू, तू अगदी पक्की गृहिणी झाली आहेस हं!'

पार्वतीनं ओठ दाताखाली दाबून धरला. मनातल्या मनात म्हणाली, 'कर्माची गृहिणी! सावरीचं फूल देवाला वाहतात का कधी!'

देवदास मोठ्यानं हसला. 'मला हसू येतं बघ! होतीस एवढीशी... आणि केवढी मोठी झालीस! भलं मोठं घर, मोठी जमीनदारी, मोठी मुलं आणि

चौधरीमोशाई... सगळंच बडं, मोठं. होय ना पारू?'

चौधरीमोशाई म्हणजे पार्वतीचं करमणुकीचं साधन होतं म्हणून एवढ्या दु:खातही तिला हसू आलं. त्यांच्या नुसत्या आठवणीनं तिला हसू यायचं. तसंच आताही आलं.

देवदास खोट्या गांभीर्यानं म्हणाला, 'माझ्यावर एक उपकार करशील?'

'काय?'

'तुझ्या गावात चांगली मुलगी आहे का एखादी?'

पार्वतीनं आवंढा गिळून विचारलं, 'चांगली मुलगी? ती कशासाठी?'

'मिळाली तर लग्न करेन म्हणतो! संसारी व्हावंसं वाटतंय!'

पार्वतीनं भोळसटपणे विचारलं, 'खूप सुंदर हवी ना?'

'हो. तुझ्यासारखी.'

'आणि खूप चांगलीही.'

'नाही. खूप चांगली नसली तरी चालेल. उलट थोडीशी खट्याळ, नाठाळ हवी. तुझ्यासारखं माझ्याशी भांडता आलं पाहिजे.'

पार्वती मनाशी म्हणाली, 'देवदा, ते शक्य नाही. त्यासाठी माझ्यासारखं प्रेम करता आलं पाहिजे.' मोठ्यानं म्हणाली, 'जळलं माझं तोंड! माझ्यासारख्या हजार मुली पाय धरत येतील तुझे!'

देवदासला पुन्हा थट्टा करायची लहर आली. 'हजार नको. सध्या एक मिळाली तरी पुरे!'

'देवदा, खरंच लग्न करणार आहेस?'

'आत्ताच नाही का सांगितलं तुला?'पण 'तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाही माझ्या हृदयात स्थान नाही.' हे त्यानं तिला स्पष्ट सांगितलं नाही.

'देवदा, एक विचारू?'

'काय?'

स्वत:ला काबूत ठेवत तिनं विचारलं, 'तू दारू प्यायला का शिकलास?'

देवदासला हसू आलं, 'एखादं पेय पिण्यास शिकावं लागतं?'

'तसं नाही. सवय का लावून घेतलीस?'

'कोणी सांगितलं? धर्मदासनं?'

'कोणी का सांगेना! खरं आहे हे?'

देवदास खोटं बोलला नाही. म्हणाला, 'बरंचसं.'

पार्वती थोडा वेळ निमूट बसून राहिली. मग तिनं विचारलं, 'आणि काही

हजारांचे दागिनेही करून दिलेस ना?'

देवदास हसला. 'दिले नाहीत. करून ठेवलेत. तुला हवेत?'

पार्वती हात पुढे करत म्हणाली, 'दे. हे बघ, माझ्या अंगावर एकही डाग नाही.'

'चौधरीमोशाईंनी तुला नाही केले?'

'केले होते. मी सगळे माझ्या मोठ्या मुलीला देऊन टाकले.'

'तुला जरुर नाही वाटली त्यांची?'

पार्वतीनं नुसती मान हलवली. आता मात्र देवदासचे डोळे खरंच भरून आले. अतिशय दु:ख-कष्टाशिवाय कोणी दुसऱ्याला दागिने काढून देत नाही, हे त्यानं मनातून ओळखलं. डोळ्यातलं पाणी आवरत तो शांतपणे म्हणाला, 'सगळं खोटं, पारू. मी कोणावरही प्रेम करत नाही. कोणालाही दागिने दिले नाहीत.'

पार्वतीनं एक उसासा सोडला. मनाशी ती म्हणाली, 'माझी खात्री आहे त्याबद्दल.'

बऱ्याच वेळ कोणीच काही बोललं नाही. मग पार्वतीनंच सुरवात केली,

'शपथ घे– दारू पिणार नाही म्हणून.'

'ते होणार नाही. तू वचन देशील का की तू एकदाही माझी आठवण काढणार नाहीस?'

पार्वती गप्प बसली. संध्याकाळ झाली होती. बाहेर शंखध्वनी झाला. देवदासनं चमकून खिडकीकडे पाह्यलं. 'संध्याकाळ झाली. आता घरी जा, पारू!'

'मी जाणार नाही. तू आधी वचन दे.'

'मला ते शक्य नाही.'

'का शक्य नाही?'

'सगळ्यांना सगळं जमतंच असं नाही.'

'इच्छा असली की सगळं होतं.'

'मग तू आज रात्री माझ्याबरोबर येशील? पळून जाऊ या आपण.'

पार्वतीला वाटलं की आता आपल्या हृदयाची धडधड बंद पडणार. नकळत तिच्या तोंडातून शब्द निसटले, 'ते कसं शक्य आहे?'

देवदास बिछान्यावर सावरून बसत म्हणाला, 'पार्वती, दार उघड.'

पार्वती दाराला पाठ देऊन म्हणाली, 'वचन दे.'

देवदास उठून उभा राह्यला आणि शांतपणे म्हणाला, ‘पारू, बळजबरीनं वचन घेणं चांगलं नाही. त्यात फायदा काय? आज घेतलेलं वचन उद्या मोडेल. मला खोटं बोलायला कशाला लावतेस?’

पुन्हा दोघंही बराच वेळ गप्प राह्यले. कुठंतरी नऊचे ठोके पडले. देवदास घायकुतीला येऊन म्हणाला, ‘पारू, अगं, दार उघड.’

पार्वती गप्प.

‘ए पारूऽ’

‘मी इथून मुळीच जाणार नाही,’ असं म्हणून पार्वतीनं जमिनीवर लोळण घेतली आणि हुंदके देऊन रडायला लागली. खोलीत काळोख दाटून आला होता. काहीही दिसत नव्हतं. पार्वती जमिनीवर पडून रडतेय, हे देवदासनं अंदाजानं ओळखलं. त्यानं हळूच हाक मारली, ‘पारूऽ’

पार्वती रडत रडत म्हणाली, ‘देवदा, मी फार दु:खी आहे रे!’

देवदास तिच्या जवळ आला. त्याचेही डोळे भरून आले होते. पण त्यानं आवाज घोगरा होऊ दिला नाही. ‘मला ते माहीत नाही का, पारू?’

‘देवदा, मला सहन होत नाही रे! तुझी सेवा करायची फार फार इच्छा होती. कधी जमलं नाही रे!’

अंधारातच डोळे पुसत देवदास तिची समजूत घालत म्हणाला, ‘अजून वेळ गेली नाही.’

‘तर माझ्याकडे चल. इथं तुझ्याकडे बघायला कोणी नाही.’

‘तुझ्याकडे आलो तर खूप काळजी घेशील?’

‘माझी लहानपणापासूनची इच्छा आहे ती! देवा, माझी इच्छा पुरी कर! नंतर मेले तरी वाईट नाही वाटणार.’

आता मात्र देवदासला डोळ्यातली आसवं आवरणं कठीण झालं.

पार्वती पुन्हा म्हणाली, ‘देवदा, चल माझ्या घरी.’

देवदास डोळे पुसत म्हणाला, ‘ठीक आहे. येईन.’

‘माझी शपथ घेऊन सांग.’

काळोखात अंदाजानं पार्वतीच्या पायाला हात लावत तो म्हणाला, ‘मी ही गोष्ट कधीही विसरणार नाही. माझी सेवा केल्यानं तुझं दु:ख कमी होणार असेल तर मी येईन. मरायला टेकलो तरी ही गोष्ट विसरणार नाही.’

❖

**नवंकोरं**


# द केस ऑफ द लकी लूझर

लेखक

**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद

**बाळ भागवत**




**किंमत : १८०/-रु**

**पोस्टेज : ५०/-रु.**

"आता मी सांगतो ते ऐक," पॉल ड्रेक म्हणतो. "आत्ताच मिळालेल्या या तारेप्रमाणे हा माणूस दोनदा मेला आहे. आता काय म्हणशील तू?"
पेरी मेसन डेला स्ट्रीटकडे वळतो. "मला तर वाटायला लागलं आहे की, या प्रकरणामधलं पूर्ण सत्य बाहेर न येण्यासाठी काहीतरी कायदेशीर युक्त्याप्रयुक्त्या लढवणं आवश्यक आहे. आशा आहे की, त्या कामाला येतील. माझी खात्री आहे, सत्य परिस्थिती इतकी स्फोटक असेल की, भलत्याच घटनांची मालिकाच पुढे येईल."
आणि मग बाल्फोर अलाईड असोसिएट्सच्या कोणत्याही भानगडी निस्तरणारा माणूस, ट्रबल शूटर बॅनर बोल्स मेसनने केस कशी चालवली पाहिजे त्याबद्दल धमक्या देतो. अप्रतिम खोटी साक्षही देतो. त्याने फारच मोठी चूक केलेली असते.
सत्य उघडकीला आणल्याशिवाय केस जिंकताच येणार नाही, अशी मेसनची खात्री पटते आणि प्रेतालाच कुणी ठार केले कळल्यावर होणारी प्रतिक्रिया नुसती स्फोटकच नव्हे, तर अत्यंत अनपेक्षित ठरते.

# धुंद येथ मी स्वैर झोकितो...

ग. दि. माडगूळकरांच्या चित्रपटेतर बालगीतांचा आस्वाद मागच्या भागात आपण घेतला. गदिमांच्या संवेदनाक्षम मनाने रेखलेली ती चित्रे होती. अशी विविधरंगी भावचित्रे त्यांच्या लेखणीतून भावगीतांच्या रूपात उतरली आणि अजरामर झाली. त्या त्या वेळी त्यांच्या मनात उमटलेले भाव व्यक्त करणारी ही गीतं आहेत.

त्यांच्या मुलीच्या विवाह प्रसंगी त्यांनी मुलीची पाठवणी करणारं एक गीत लिहिलं; पण ते पित्याच्या भूमिकेतून न लिहिता आईच्या काळजाने लिहिलं. मुलीला सासरी पाठवतानाच्या एका आईच्या भावना या गीतातून व्यक्त झाल्या आहेत. ती आई विहीणबाईंना सांगते आहे :

*ओटीत घातली मुलगी विहीणबाई*
*सांभाळ करावा हीच विनवणी पायी*
*लाडकी लेक ही माझी पहिलीवहिली*
*भाग्येच तियेच्या सून आपुली झाली*
*तुम्हीच यापुढे तिजसी माझ्याठायी*

एका आईचं हे संस्कारी मन आहे. माझी ही पहिलीवहिली लाडाची लेक तिच्या भाग्यामुळे तुमची सून झाली आहे, असं ही आई म्हणते. विहीणबाईंच्या पदरात ती मोठेपणाचं माप घालते. तुम्हीच आता तिच्या आई व्हा, असंही सांगते. या संपूर्ण गीतातून या आईची कातरता जशी जाणवते तसा तिचा संस्कारीपणाही जाणवत

राहतो. खरं तर पित्याच्या भूमिकेतूनही हे गीत गदिमा लिहू शकले असते; पण गदिमांच्या काळात मुलीला घडवण्यात आईचा सहभाग जास्त असायचा आणि तो सहभाग मनोमन मान्य करून गदिमांनी हे गीत लिहिलं असावं.

गदिमांसारख्या कवी/गीतकाराचं मन सतत निर्मितीचा विचार करत असतं आणि मग एखाद्या क्षणी गुरूविषयी चिंतन करत असताना कुंभाराची प्रतिमा त्यांच्या मनाला भावते आणि त्यांच्या लेखणीतून शब्द उमटतात :

*कुंभारासारखा गुरू नाही रे जगात*
*वरी घालितो धपाटे आत आधाराचा हात*
*कुणी पुजेचा कलश कुणी गोरसाचा माठ*
*देता आकार गुरूने ज्याची त्याला लाभे वाट*
*घट पावती प्रतिष्ठा गुरू राहतो अज्ञात*

गुरूची महती आणि शिष्याचं भाग्य या दोन्हीचा यथार्थ विचार गदिमांनी या गीतातून केलेला दिसतो.

तर त्यांच्या अंतर्यामी जी भावना जागेल, त्या भावनेला त्यांनी मूर्त रूप दिलं. भक्तिभावातून असंच एक गीत गदिमांच्या लेखणीतून उतरलं 'लावियले नंदादीपा तुवा मंदिरात...' गदिमा लिहितात :

*तिमिरगूढगाभाऱ्यात पाजळता दीपज्योत*
*हसे तिथे मांगल्याचे तेज मूर्तिमंत*

गदिमांच्या शब्दलावण्याचा प्रत्यय देणाऱ्या या ओळी आहेत. अंधाऱ्या गाभाऱ्यात दीपज्योत पेटवताच गाभाऱ्यातील मंगलमय मूर्तीचं तेज डोळ्यांना सुख देतं; मात्र या गीताला भक्तिभावाबरोबरच कुठेतरी एक नकारात्मकतेची किनार असावी. म्हणून 'तिमिरगूढ' असा शब्द ते योजतात.

भावभावनांचं हे विश्व असं प्रतिभावंतांच्या हृदयात हिंदोळत असतं आणि मग एखाद्या भावविभोर क्षणी 'धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले' यासारखं गीत कागदावर उतरतं. एका मद्यपी आणि बाहेरख्याली पतीचं हे मनोगत व्यक्त करताना गदिमा लिहितात :

*धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले*
*याच वेळी तू असशील तेथे बाळा पाजविले*
*येथ विजेचे दिवे फेकती उघड्यावर पाप*
*ज्योत पणतीची असेल उजळीत तव मुख निष्पाप*
*माझ्या कानी घुमती गाणी मादक मायावी*
*ओठावरती असेल तुझिया अमृतमय ओवी*
*माझ्यावरती खिळली येथे विषयाची दृष्टी*
*मत्पूजेस्तव असशील शोधित सखे स्वप्नसृष्टी*
*कनकांगीच्या मत्त चुंबने जाग मला आली*
*विरहाश्रू तव असेल झरला सुकलेल्या गाली*
*तुझे नि माझे अंतर व्हावे कसे एकरूप*
*शीलवती तू, पतिव्रते मी मूर्तिमंत पाप*

एखाद्या मद्यपी, बाहेरख्याली माणसाचा पश्चात्ताप हा भावगीताचा विषय होऊ शकतो आणि पत्नीच्या सोज्वळपणाची, सोशिकपणाची तीव्र जाणीव त्याच्या मनात दाटून येते, ही एक वेगळ्याच प्रकारची संवेद्यता या गीतातून दिसून येते. गदिमांच्या शब्दकळेची अर्थपूर्णता, सुंदरता, उत्कटता आणि भावगर्भता ही या गीताची वैशिष्ट्यं या गीताला विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवतात. भोगलालसा आणि सात्त्विकता अशा विरोधाभासी चित्रामुळे या गीताचं भावसौंदर्य वाढलं आहे आणि भावनांची एक लय त्या गीताला प्राप्त झाली आहे. ती लय बाबूजींच्या संगीतातून आणि भावपूर्ण स्वरातून रसिकांच्या अंत:करणापर्यंत पोचते.

तर गदिमांच्या भावगीतांतून प्रत्ययाला येणारं हे विविधरंगी भावविश्व रसिक वर्षानुवर्षं अनुभवत आहेत. गदिमांच्या या भावगीतरूपी भावविश्वाची सफर पुढच्याही भागात आपण करणार आहोत.

**– अंजली पटवर्धन**

**नवंकोरं**

# द केस ऑफ द क्रुकेड कँडल




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**बाळ भागवत**

**किंमत : २२०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

रस्त्यावर एक अपघात घडतो. हा अपघात दाबून टाकण्याच्या प्रयत्नांत एक खून उघडकीस येतो.
स्किनर हिल्स काराकुल या मेंढ्यांपासून फर बनविणाऱ्या कंपनीचा मालक फ्रेड मिलफिल्ड याचा खून होतो.
संशयाची सुई त्याची पत्नी डाफनेबरोबरच
त्याचा पार्टनर रॉजर बरबॅन्क यांच्याभोवती फिरू लागते.
कारण रॉजर बरबॅन्कच्या बोटीवरच फ्रेड मिलफिल्डचे प्रेत सापडते. रॉजर बरबॅन्कची मुलगी कॅरोड आपल्या वडिलांना निर्दोष सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करते.
चतुर पेरी मेसन आणि त्याची धाडसी सेक्रेटरी डेला स्ट्रीट केसच्या मुळाशी पोहोचतात.

# स्मरण



## विजय तेंडुलकर

गतजन्मांमध्ये भेटलेली आणि आपल्यावर विलक्षण प्रेम करणारी काही विभूतीसदृश माणसं ह्या जन्मीही अलगद येऊन भेटतात आणि आपल्यावर प्रेमाचा अक्षरश: वर्षाव करतात, हा माझा सत्य अनुभव आहे. नदीनं सागराला मिळावं, तशी ही अत्यंत प्रेमळ माणसं आपल्या आयुष्याचा एक भाग होऊन जातात.  कुठल्या रंगीत सुंदर पाखरांनी ह्या ऋणानुबंधाच्या स्वरांना ओवलं, हेच कळेनासं होतं. आपल्या नाटकांनी विश्वकीर्ती मिळवलेले विजय तेंडुलकर, माझ्या इवल्याशा साहित्यभारल्या विश्वात माझ्या ऐन तारुण्यात डोकावले आणि शेवटपर्यंत त्यांनी हे आमच्या दोघांमधलं मैत्र अत्यंत हळुवारपणे जोपासलं.

मी त्यांच्या एकूणच साहित्याचा चाहता आहे, हे तेंडुलकरांना ज्ञात होतं. त्याहून अधिक माझं एकूणच शाश्वत मराठी साहित्यावर जिवापाड प्रेम आहे हेच तेंडुलकरांना अधिक भावलं होतं. माझी ज्ञानदेवांवरील अपार भक्ती. माझं 'ज्ञानेश्वरी'वरील निस्सीम प्रेम त्यांना लोभसवाणं वाटायचं. मराठी भाषेतला एक श्रेष्ठ नाटककार ही त्यांची ओळख. ही खरी तेंडुलकरांची प्रसिद्धिवलये, त्यांच्याभोवती गरागरा वेगाने फिरत असतानाच, मला ते प्रथम भेटले ते गिरगावातल्या साहित्य संघ मंदिरात, त्यांच्याच 'शांतता कोर्ट चालू आहे' ह्या नाटकाच्या प्रयोगाच्यावेळी. ते नाटक मी जेव्हा पाहिलं तेव्हा मी तर अक्षरश: भारावून गेलो होतो. नाटकातल्या 'बेणारे' बाई, या व्यक्तिचित्रणाने मी थक्क झालो होतो. सुलभा देशपांडे यांनी आपल्या अप्रतिम अभिनयातून

बेणारे बाई जी जिवंत केली होती, तो अनुभव तर माझ्यालेखी अपूर्वच होता. तेंडुलकरांची भाषा आणि सुलभा देशपांडे ह्यांचा अभिनय हा एक श्रेष्ठ संगम होता. त्या दिवशी मी तेंडुलकरांबरोबर भरभरून बोललो. मला अजूनही स्पष्ट आठवतं की, ते माझ्याकडे अत्यंत प्रेमाने बघत, माझं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होते. ज्या नाटकाने नाट्यसृष्टीला एका प्रयोगशील वळणावर नेऊन ठेवलं, ते नाटक म्हणजे 'शांतता कोर्ट चालू आहे.' या नाटकाच्या लेखनामुळे त्यांना १९७०साली नाट्यलेखनाचा त्या वर्षातील भारतीय नाट्यकृती म्हणून अत्यंत मानाचा म्हणून गौरवला गेलेला 'कमलाबाई चट्टोपाध्याय' पुरस्कार मिळाला आणि हे श्रेष्ठ नाटक विविध भारतीय भाषांमध्ये अनुवादित झालं. ह्या नाटकामुळेच तर मला ह्या श्रेष्ठ नाटककाराची कृपादृष्टी लाभली, हेच माझं परमभाग्य होतं.

ते माझं सळसळतं तारुण्य जसं ज्ञानदेवांनी, विशेषत: ज्ञानेश्वरीने पछाडलेलं होतं, शाश्वत मराठी कथा-कादंबऱ्या आणि कवितांनी भारावलेलं होतं, तसंच ते मराठी रंगभूमी आणि उत्तमोत्तम मराठी-हिंदी तसेच इंग्रजी सिनेमांनीसुद्धा भारलेलं होतं. मी अजून पंचविशीसुद्धा गाठली नव्हती, त्या भारलेल्या कालखंडात तेंडुलकर मला भेटले.

१९७० हे भाग्यशाली वर्ष तेंडुलकर ह्यांच्या लेखन कारकिर्दीत अक्षरश: सोन्याच्या पावलांनी उमटलं आणि वाङ्मयीन तसंच सर्व प्रकारच्या प्रसिद्धी माध्यमांनी तेंडुलकरांना उच्चासन बहाल केलं. विजय तेंडुलकर ह्या नावाला अतिशय तेजभारली झळाळी प्राप्त झाली. आश्चर्यमुग्ध करणारी वलयांकित चक्रं तेंडुलकरांच्या एकूणच अस्तित्वाभोवती जी वेगाने फिरू लागली, ती अजूनही फिरतच आहेत. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे, त्याच वर्षी तेंडुलकरांच्या चित्रशैली प्राप्त झालेल्या लेखनाने हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला होता. त्यांची पटकथा आणि संवाद ह्यांनी समृद्ध झालेला 'प्रार्थना' हा पहिला हिंदी चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यापाठोपाठ 'शांतता कोर्ट चालू आहे' ह्या त्यांच्याच गाजलेल्या नाटकावर आधारित मराठी आणि हिंदी ह्या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या यशस्वी चित्रपटांचं लेखन तेंडुलकरांनी केलं होतं. ही अभिमानास्पद घटना १९७२ साली घडली होती.

१९७७ साली प्रदर्शित झालेल्या 'निशांत' ह्या हिंदी चित्रपटाचं लेखन तेंडुलकर यांनी केलं आणि हिंदी चित्रपटसृष्टीतही आपलं वेगळेपण त्यांनी सिद्ध केलं. १९७५ साली प्रसिद्ध झालेल्या 'सामना' ह्या मराठी चित्रपटाने तर एकूणच चित्रपटसृष्टीत एक नवा इतिहास निर्माण केला. त्यापाठोपाठ आलेल्या 'सिंहासन' ह्या चित्रपटाने सर्वसामान्य प्रेक्षकांची राजकीय समीकरणं

काय असतात, याचं वास्तव दर्शन घडवलं. हे सारं यश तेंडुलकरांच्या प्रभावी लेखनशैलीमुळेच त्यांना प्राप्त झालं होतं. त्याची सर्वोत्तम प्रचिती म्हणजे 'अर्धसत्य' ह्या हिंदी चित्रपटाच्या लेखनाने तेंडुलकरांना विश्वातील रसिकांनी दाद दिली. या चित्रपटासाठी १९८३मध्ये, सर्वोत्तम पटकथा लेखक म्हणून त्यांना फिल्मफेअर' पुरस्काराने गौरविण्यात आलं.

१९७३च्या सुमारास पुण्याच्या 'थिएटर ॲकॅडमी'ने तेंडुलकरांचं 'घाशीराम कोतवाल' हे आकृतिबंधाच्या दृष्टीने अभिनव नृत्य-संगीत नाटक सादर केलं आणि त्या नाटकाने जरी इतिहास निर्माण केला, तरी तेंडुलकर वादाच्या भोवऱ्यात सापडले; परंतु नृत्य-नाट्याच्या या अभिनव कल्पनेने रसिक प्रेक्षकांची मनं जिंकली. असं इतिहासाला धक्का देणारं सांगीतिक नाटक मराठी अभिजात रंगभूमीवर प्रथमच सादर केलं गेलं होतं. 'घाशीराम कोतवाल'चा बाजच निराळा होता. ह्या नाटकापाठोपाठ 'अशी पाखरे येती' हे सर्वांगसुंदर, काव्याच्या तरल पातळीवर रंगलेलं नवं नाटक, हासुद्धा त्यांच्या प्रतिभेचा एक नवा आविष्कार होता. मराठी नाट्यसृष्टीतील प्रायोगिकतेचं नवं शिखर तेंडुलकरांनी सर केलं होतें. एक आगळा अनुभव ह्या नाटकाने मराठी रंगभूमीला दिला. ह्या तरल अनुभव देणाऱ्या नाटकापाठोपाठ तेंडुलकरांचं मानवी मनातल्या गिधाड प्रवृत्तींचं अतिशय दाहक अनुभव देणारं नाटक, म्हणजे 'गिधाडे' प्रदर्शित झालं, तसंच 'सखाराम बाईंडर' नाटक रंगभूमीवर आलं आणि मराठी रंगभूमी काहीशी हादरूनच गेली. ह्या नाटकांमुळे तेंडुलकर आणि ह्या नाटकांचे निर्माते ह्यांना लोकक्षोभाला सामोरं जावं लागलं. खूप मानसिक त्रास सहन करावा लागला.

तसं पाहिलं तर तेंडुलकर ह्या नाटककाराने आपल्या आयुष्यातल्या पूर्वार्धात जेवढी लोकक्षोभाची वादळं अनुभवली नसतील तेवढी त्यांनी आपल्या उत्तरार्धात सोसली होती. विशेषत: 'सखाराम बाईंडर' ह्या नाटकातल्या काही 'बोल्ड' प्रसंगांच्या रंगभूमीवरील सादरीकरणामुळे त्यांना प्रचंड लोकक्षोभ सहन करावा लागला होता. 'गिधाडे'मधल्या गर्भपाताच्या दृश्य प्रसंगामुळे आणि काही भडक चित्रणामुळे खूप चर्चा रंगल्या होत्या; परंतु शांतचित्त तेंडुलकर ह्या असह्य त्रासामुळे मानसिक पातळीवर किंचितसुद्धा खचले नव्हते. अनुभवाची झोळी खांद्यावर अडकवून, झंझावाती मानवी वादळांनासुद्धा सहजपणे तोंड देत आपल्या निर्मितिप्रक्रियेस जरासुद्धा धक्का लागणार नाही ह्याची काळजी घेत ते सतत लिहितच होते आणि नवी नवी वादळे झेलीतच होते. कलावंताने निर्भयपणे कसं जगावं ह्याचं भान तेंडुलकरांनी आपल्या प्रत्यक्ष जगण्यातून दिलं.

तेंडुलकर यांचा जन्म ६ जानेवारी १९२८ ह्या दिवशी मुंबईत झाला. १९ मे २००८ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांना ऐंशी वर्षांचं आयुष्य लाभलं.१९५५पासून ऐन तारुण्यात तेंडुलकरांनी आपल्या हातात जी लेखणी घेतली, ती त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही. तेंडुलकरांनी १९५५मध्ये 'गृहस्थ' हे आपले पहिलं नाटक लिहिलं आणि नव्या दमाचा प्रयोगशील नाटककार मराठी रंगभूमीला लाभला. त्यानंतर त्यांनी तीस-पस्तीस नाटकं लिहिली, पंचवीस एकांकिका लिहिल्या आणि त्यांच्या नावावर तीन ललित लेखसंग्रह आहेत. पाच लघुकथासंग्रह आहेत. एक कादंबरीसुद्धा आहे.

१९५०च्या पूर्वीपासून तेंडुलकरांनी मराठी वृत्तपत्रांमधून अर्थार्जनासाठी नोकरी केली; पण 'देशातील वाढते हिंसाचार' ह्या विषयावर अभ्यास करण्यासाठी त्यांना १९७३-७४ मध्ये नेहरू शिष्यवृत्ती मिळाली आणि या क्षेत्राशी असलेला त्यांचा संबंध संपला. वृत्तपत्रांत काम केल्यामुळे खऱ्या अर्थाने सामाजिक भान त्यांना प्राप्त झालेलंच होतं; परंतु नेहरू शिष्यवृत्तीमुळे त्यांनी संपूर्ण देश पिंजून काढल्यामुळे त्यांचं अनुभवविश्व अधिक समृद्ध झालं असावं.

'तुम्ही कशासाठी लिहिता?' ह्या प्रश्नाला एकदा तेंडुलकर यांनी उत्तर दिलं होतं की, दुसरं काही करता येत नाही; म्हणून मी लिहितो.' दुसरं काही नाही म्हणजे काय तर, मला धुंद होऊन एखादं वाद्य वाजवता येत नाही की, हर्षभराने उचंबळून मनसोक्त गाता येत नाही. मला रंगांच्या सपकाऱ्यांनी चित्रफलकावर काळजातली वादळं भिरकावता येत नाहीत. मला शरीराच्या अणूरेणूत न सामावणारा राग, कृतीत उतरवणारी राकट, बलदंड मनगटं लाभलेली नाहीत... मी मनमोकळा हसू किंवा रडूसुद्धा शकत नाही... यादी वाढत चालली. मी स्वतःला रोखलं. विचारलं, हे सारं किंवा यातलं काही एक जरी करता आलं असतं, तर तू लिहिलं नसतंस का? उत्तर मिळालं, नसतं लिहिलं. मनातल्या वादळांना, हर्ष-खेदांना, रडायला नि शोकाला, धुंदीला आणि बेचैनीला दुसरी वाट नाही, म्हणून हे सारं फार काळ आत न सामावणारं बाहेर टाकण्यासाठी मी सतत लिहित आलो. हेच सारं माझं लेखन बनलं. याच लेखनाने वेगवेगळे आकार घेतले आणि ते लेखनच मग एकांकिका झाल्या, नाटक झालं किंवा वर्तमानपत्रातील ललित स्फुटलेखन झालं; पण सारं अखेर हेच होतं माझं जगणं आणि जगण्यातलं बरं-वाईट भोगणं...

तेंडुलकरांनी स्त्रीप्रधान नाटकं लिहिली हे जरी सत्य असलं तरी त्यांच्या नाटकांचा विषय हा प्रामुख्याने मानसिक घालमेल आणि मानवी जीवनातली

असह्य अगतिकता, मग ती स्त्रीची असेल वा पुरुषाची असेल, हाच प्रामुख्याने होता. स्त्रीची मानसिक कोंडी ही प्राय: अधिक होते, म्हणून त्यांच्या नाटकांतून स्त्रीचं चित्रण प्राधान्याने येत गेलं. 'शांतता...' मधली बेणारे काय, 'कमला' मधली कमला काय, 'अशी पाखरे येती' मधली सरू काय, 'श्रीमंत' मधली मथुरा काय, 'एक हट्टी मुलगी' मधली मंगल काय, 'कन्यादान' मधली ज्योती काय', 'गिधाडे' मधली रमा काय, अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. मानवी नातेसंबंधांत होणाऱ्या स्त्रीच्या मानसिक आणि प्रसंगी शारीरिक तडफडीच्या चित्रणातला उच्चांकच तेंडुलकरांनी आपल्या नाटकांमधून गाठला होता. स्त्रीला स्वत:चं म्हणून एक स्वतंत्र अस्तित्व आहे, याची जाणीव तेंडुलकरांनी नाटकातल्या प्रभावी स्त्रीचित्रणातून दिली आणि हेच त्यांचं श्रेष्ठ वाङ्मयीन योगदान आहे. 'गिधाडे'मधली 'रमा'म्हणजे मानवी नातेसंबंधांत होणारी स्त्रीची तडफड आणि तिच्या वेदनांचं मूर्तिमंत रूप... मानवी मनाची गुंतागुंत आपल्या सर्वच नाटकांमधून अगदी समर्थपणे अधोरेखित करणारे तेंडुलकर हे एक अजब रसायन होतं. त्यांच्या नाटकांमधून सामोरं येणारं वास्तव हलवून टाकणारं होतं. वास्तवदर्शी, प्रयोगशील नाटकांचा अभ्यास करणाऱ्यांसाठी तेंडुलकरांची नाटकं हे एक आव्हान आहे. संहिता आणि प्रयोगमूल्य या दोन्ही दृष्टींनी त्यांची नाटकं अभ्यसनीय आहेत.

माझ्या मनातल्या विजय तेंडुलकर यांच्या विषयीच्या असंख्य आठवणी मुसळधार कोसळणाऱ्या पावसासारख्या आहेत. ते कितीदा भेटले, त्यांच्याशी किती विषयांवर बोलायला मिळालं, हे क्षण मी वेचायला बसलो तर मी थकून जाईन. ज्ञानदेवांपाशी जी शांतचित्त वृत्ती होती, तिच तेंडुलकरांपाशी होती, हा माझा अनुभव आहे. विसाव्या शतकातील श्रेष्ठ साहित्यिकांमध्ये तेंडुलकर अग्रभागी होते.

साहित्यातून सत्याकडे झेपावणारा हा लेखक सर्वार्थाने श्रेष्ठ होता. 'संगीत नाटक अकादमी' आणि १९८३मध्ये प्राप्त झालेला पद्मश्री पुरस्कार यांसह त्यांना अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले; मात्र साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद आणि भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार यापासून ते वंचित राहिले, याची खंत वाटते.


**– वामन देशपांडे**

**९३२४६१५०७७**

नवंकोरं

द केस ऑफ

# द हाऊलिंग डॉग




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**


अनुवाद
**बाळ भागवत**

**किंमत : २२०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

अत्यंत अस्वस्थ असणाऱ्या ऑर्थर कार्टराईटला, समोर राहणाऱ्या क्लिन्टन फोलीच्या घरातल्या विव्हळणाऱ्या कुत्र्याबद्दल आणि स्वत:च्या मृत्युपत्राबद्दल पेरी मेसनशी बोलायचे होते. त्या कुत्र्याचा बंदोबस्त प्रथम करायला हवा होता, कारण त्याच्या ओरडण्याने त्याला वेड लागायची पाळी आली होती आणि मृत्युपत्रान्वये त्याला त्याची इस्टेट क्लिन्टन फोलीबरोबर त्याची पत्नी म्हणून राहत असलेल्या स्त्रीला द्यायची होती. ती त्याची खरी पत्नी नसली तरी. दुसऱ्या दिवशी टपालाने आलेल्या पत्राबरोबर मृत्युपत्र आणि दहा हजार डॉलर्स रोख पेरी मेसनच्या हातात पडले. पण मृत्युपत्राप्रमाणे त्याने त्याची इस्टेट क्लिन्टन फोलीच्या खऱ्या पत्नीच्या नावाने केलेली असते. साध्या पत्राबरोबर इतकी रक्कम पाठविणाऱ्या आपल्या अशिलाचे डोके खरेच फिरले असावे, असा पेरी मेसनला संशय येतो. क्लिन्टन फोलीशी भेटीची वेळ ठरवून पेरी मेसन त्याच्या घरी पोहोचतो, तर क्लिन्टन फोली आणि त्याचा कुत्रा या दोघांना कुणी तरी गोळ्या झाडून ठार मारलेले असते. त्याचा अशील, क्लिन्टन फोलीबरोबर त्याची पत्नी म्हणून राहणाऱ्या स्त्रीबरोबर, आधीच गायब झालेला असतो.पण पेरी मेसनची खात्री असते की विव्हळणाऱ्या कुत्र्याची माहिती मिळवली तर खुनाचा शोध लागेल. आता विव्हळणाऱ्या कुत्र्याची केस पेरी मेसनने हातात घ्यायची म्हणजे...पण पेरी मेसन शोध घेतो तेव्हा लक्षात येते की सत्य नेहमीप्रमाणेच विलक्षण असते.

# अभिप्राय

## निमर्नुष्य बेटावरचा युवतीचा थक्क करणारा जीवनसंघर्ष...




### गोष्ट एका करानाची

**लेखक :** स्कॉट ओ'डेल
**अनुवाद :** मैत्रेयी जोशी
**पृष्ठसंख्या :** १७२
**किंमत :** १९५/-
**प्रकाशन :** मेहता पब्लिशिंग हाऊस

प्रशांत महासागराच्या अफाट विस्तारात चिरशांती अनुभवणारं बेट म्हणजे 'आयलन्ड ऑफ ब्ल्यू डॉल्फिन्स.' ख्रिस्तपूर्व २००० वर्षांपासून इंडियन्सची वस्ती असलेलं हे बेट. इ.स. १६०२पासून इला डा सॅन निकोल म्हणून ओळखलं जाऊ लागलं. कॅलिफोर्नियाच्या इतिहासात कित्येक शतकं नव्या छटा उमटत आणि मिटत राहिल्या, तरी हे बेट आपल्याच तंद्रीत जगत राहिलं. जगापासून अलिप्त असलेल्या या बेटावर इंडो-अमेरिकन वंशाच्या करानाच्या बाबतीत एक

अशी घटना घडली, जी पुढील कित्येक वर्षं जगभरातील वाचकांना संमोहित करीत राहिली.

कादंबरीची नायिका कराना. तिचा भाऊ रॅमो. रॅमोची चिकित्सक वृत्ती कायम नव्या आव्हानांना तोंड देत असते. अशा या कुटुंबाच्या आयुष्यात एक वादळ येतं. आणि त्यातून जणू ब्ल्यू डॉल्फिन्स बेटाचा नवा इतिहासच रचला जातो. सहा मैल लांब आणि तीन मैल रुंद पसरलेलं हे बेट. त्याच्या मधोमध उगवलेल्या टेकड्यांपैकी एखाद्या टेकडीवर उभं राहून पाहिलं, तर ते बेट एका कुशीवर पहुडलेल्या डॉल्फिनसारखं दिसायचं. त्याची शेपटी पूर्वेला, नाक पश्चिमेला आणि कल्ले म्हणजे समुद्राच्या पाण्याखाली जेमतेम बुडालेले खडक. वर्षातले ३६५ दिवस कधी ईशान्येकडून, कधी पूर्वेकडून तर कधी दक्षिणेकडून इथे वारे वाहत असतात. गालाज ॲट हे या बेटावर वसलेलं एक खेडं. एकदा या बेटावरच्या लोकांमध्ये लढाई झाली. या लढाईत बेटावरचे अनेक पुरुष कामी आले. आणि तेव्हापासूनच बेटाच्या स्खलनाला सुरुवात झाली. या लढाईनंतर कालांतराने, १९व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात कॅप्टन हबर्ड याचं पुढे-मागे शीड असलेलं जहाज सॅन निकोलस बेटावरच्या 'गालाज ॲट' या वस्तीतल्या इंडियन्सना घेऊन जाण्यासाठी बेटावरच्या कॉरल कोवळ बंदरात आलं. ॲल्यूट्सशी झालेल्या लढाईनंतर गालाज ॲटमध्ये आता केवळ पंधरा पुरुष शिल्लक राहिले होते. त्यातही सात जण वृद्ध होते. पुन्हा कुणी बलवान शत्रू चाल करून आला तर त्याच्याशी दोन हात करण्याचं सामर्थ्य त्या वस्तीत राहिलं नव्हतं. त्यामुळे ते जहाज जिथे घेऊन जाईल तिथे जाण्याची सगळ्यांचीच तयारी होती. आपला भाऊ बेटावर राहिल्याची जाणीव होताच, करानाने जहाजातून समुद्रात उडी मारली आणि बेटावर परतली. त्यानंतर काही काळातच तिचा भाऊ मृत्युमुखी पडला आणि पुढची १८ वर्षं (१८३५-१८५३) कराना त्या बेटावर एकटीच होती. पुन्हा शत्रू आला तर त्याला तोंड देण्यासाठी पुरेसं बळ नाही म्हणून बेट सोडून गेलेले गालाज ॲटचे रहिवासी आणि अठरा वर्षं स्वतःचं सामर्थ्य जोखत तिथे टिकून राहिलेली कराना हा विरोधाभास सतत जाणवत

राहतो. करानाच्या जीवनसंघर्षाची थरारक जाणीव या पुस्तकातून अनुभवाला येते.


मूळ लेखक स्कॉट ओ'डेल यांची उत्कंठावर्धक मांडणी वाचकाला अखेरपर्यंत खिळवून ठेवते. पानागणिक येणारे नवेनवे प्रश्न आणि त्यातून करानाच्या मनाची होणारी घालमेल वाचकालाही आपलीशी वाटायला लागते. आणि वाचक केव्हा या साहित्यकृतीशी एकरूप होतो, तेच लक्षात येत नाही. मग ती एकट्या करानाची गोष्ट रहात नाही, तर वाचकांचीही गोष्ट होऊन जाते.

बेटावर एकटी रहात असतानाही काराना धैर्य सोडत नाही. उलट आत्मविश्वास आणि धैर्याच्या जोरावर ती एकटी उभी रहाते. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी अखंड प्रयत्न करत रहाते. कादंबरीतील करानाचा हा संघर्ष सकारात्मकतेचा संदेश देतो. बेटावर आयुष्याचे नवे अर्थ शोधताना काराना निसर्गाच्या नजीक जाते. तिचं जगणं निसर्गातल्या मूलभूत गोष्टींवर अवलंबून होतं. करानाचं हे निरामय निसर्गजीवन आधुनिकतावादापुढेही प्रश्नचिन्ह निर्माण करतं.

या उत्कंठावर्धक कादंबरीचा अनुवादही तितकाच संवादी आहे. निर्मनुष्य बेट, तिथला निसर्ग , तिथली जीवनशैली याविषयी वाचताना वाचक अलगद त्या भोवतालात पोचतो. 'आयलंड ऑफ द ब्ल्यू डॉल्फिन' ही १९६०ची बालसाहित्यातली प्रथितयश कादंबरी. जॅना मारिया या अठरावर्षीय मुलीच्या अचाट धाडसाची ही सत्यकथा. कादंबरीत ती काराना या नावाने आपल्याला भेटते. म्हणूनच मेहता पब्लिशिंग हाऊसने केलेला अनुवाद 'गोष्ट एका करानाची' नावाने प्रसिद्ध झाला आहे. मैत्रेयी जोशी यांनी केलेला हा बोलका अनुवाद वाचताना वाचक स्तंभित झाल्याशिवाय रहात नाही.

**नवंकोरं**

# द केस ऑफ द काउंटरफिट आय




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**आनंद केतकर**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज :५०/-रु.**

धनाढ्य उद्योजक हार्टली बॅसेट यांचा मृतदेह... टाइपरायटवर आत्महत्या केल्याची चिठ्ठी... मृतदेहाजवळ पडलेल्या तीन रिव्हॉल्व्हर.... आणि त्यांच्या हातात असलेला एक काचेचा डोळा! हे दृश्य पाहिल्यावर, सगळं उघड असूनही पेरी मेसनला या सगळ्यात काहीतरी संशयास्पद असल्याचा वास येतो. कारण त्याला ठाऊक असतं की, बॅसेट यांच्या आयुष्यात अनेक गोष्टींची गुंतागुंत असते. त्यांच्या पत्नीला त्यांना सोडून जायचं असतं, त्यांचा सावत्र मुलगा त्यांचा तिरस्कार करत असतो, तर त्यांच्याकडेच काम करणाऱ्या एकाने त्यांच्या पैशांची अफरातफर केलेली असते, आणि आता तो पैसे चुकते करण्यास असमर्थ असतो. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे काचेचा डोळा लावणाऱ्या एका माणसाने त्याचा हरवलेला डोळा वापरून त्याला कोणी एखाद्या प्रकरणात गुंतवले तर, या भीतीने आधीच मेसनला वकील म्हणून नेमलेले असते. वेगवेगळ्या घटना, अनेक संशयित, अनेक शक्यता.... मग मेसन त्याची सेक्रेटरी डेला आणि गुप्तहेर पॉल यांच्या मदतीने या गुंतागुंतीच्या कोड्याची अशीकाही उकल करतो की, श्वास रोखला जातो, मती गुंग होते आणि शेवटी थक्क व्हायला होतं!

बालनगरी

# स्वामी विवेकानंद

## रा. वा. शेवडे गुरुजी

सर्वधर्म परिषदेमध्ये प्राध्यापक राईट यांच्याबद्दल आदर म्हणून चार प्रतिनिधी बोलल्याबरोबर स्वामी विवेकानंदांना बोलण्याची विनंती अध्यक्षांनी केली. तथापि, स्वामीजींनी आपण अधिकृत प्रतिनिधी नसल्यामुळे शेवटी बोलण्याची परवानगी मागितली. स्वामीजी शेवटी बोलले.टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात त्यांनी आपले भाषण संपवले. श्रोत्यांना आनंद झाला होता तर व्यासपीठावरील सर्व धर्मांचे विद्वान प्रतिनिधी आश्चर्याने थक्क झाले होते.

गर्दीतून वाट काढत प्राध्यापक राईट स्वामीजींना मुक्कामी घेऊन आले. बाईजी बरोबर होत्याच. जे विचार स्वामीजींना मांडावयाचे होते ते व्यवस्थित मांडता आले म्हणून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

बाईजींनी त्वरित कॉफी तयार केली. कॉफीबरोबर केक खाता खाता त्यांनी बोलणे सुरू केले. प्राध्यापक राईट म्हणाले, ''स्वामीजी, मी अनेक भाषणं ऐकली; पण तुमचं आजचं भाषण हे माझ्या आयुष्यातलं पहिलंच अद्वितीय असं भाषण.'' ''मलासुद्धा आजचं भाषण फार आवडलं.'' बाईजी सांगू लागल्या, ''विशेषत:...'' ''विशेषत: काय बाईजी?'' ''प्रत्येक धर्माचा प्रतिनिधी– 'सभ्य स्त्री-पुरुष हो' या संबोधनानं आपल्या भाषणाचा प्रारंभ करीत होता.''

''आणि स्वामींनी,'' बाईजींचा शेरा प्राध्यापक राईटनी पुरा केला. ''माझ्या अमेरिकन बंधू-भगिनींनो,'' असं म्हणताच केवढ्या प्रचंड टाळ्या पडल्या! पुढे हिंदू धर्माची विशालता आणि पवित्र प्राचीनता आपण विशद केलीत, त्यानं तर श्रोत्यांच्या मनाचा ठावच घेतला.''

''पण त्यात तुम्हाला विशेष काय आवडलं?'' स्वामीजींनी प्राध्यापक राईटना प्रश्न केला. क्षणाचाही विलंब न लावता प्राध्यापक राईट उत्तरले, ''ख्रिश्चनांनी यहुदींवर हल्ला करून त्यांना परागंदा केलं; पण त्यांना भारतानं आश्रय दिला. अरबांनी इराण्यांना, पारश्यांना धर्मयुद्धाच्या नावाखाली जुलूम-जबरदस्ती करून हुसकून लावलं, आश्रय मात्र दिला भारतीयांनी. भारतात आजही यहुदी आणि पारशी गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भारताला आपला देश मानून आपली व भारताची उन्नती साधत आहेत. भारताने कधी आपला धर्मप्रचार केला नाही किंवा हिंदू धर्मानं त्यांना हिंदू होण्याचा आग्रह धरला नाही; मात्र अन्य देशांत ख्रिस्ती आणि अरब अन्य धर्मियांना बाटवून आपल्या धर्मात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.''

''मिस्टर राईट, तुमच्याप्रमाणे माझं भाषण जर सर्व श्रोत्यांना आवडलं असेल, तर माझ्या गुरूंना जास्त आनंद झाला असेल. त्यांच्या आत्म्याला शांती मिळाली असेल.'' ''तुमचे गुरू? कोण तुमचे गुरू?''

''माझे गुरू रामकृष्ण परमहंस. त्यांनी मला हुकूम केला होता, की हिंदू धर्माचा केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेर प्रचार कर; पण एवढ्यानं भागणार नाही.'' कॉफीचा कप संपवून ट्रेमध्ये ठेवत बाईजी म्हणाल्या, ''स्वामीजी, आम्हा अमेरिकन लोकांचा स्वभाव तुम्हाला ठाऊक नाही.''

''म्हणजे तो कसा?'' ''आता आमंत्रणामागून आमंत्रणं येतील तुम्हाला व्याख्यानांची.'' आणि तसेच झाले. सर्वधर्म परिषदेमध्ये सात दिवसांत सात भाषणं विवेकानंदांनी दिली. ती एकाहून एक सरस ठरली. हिंदू धर्माची सर्वसमावेशकता आणि धर्म हा परमेश्वरापर्यंत जाण्याचा मार्ग आहे. म्हणूनच कोणत्याही दोन धर्मांत संघर्ष असण्याचं कारण नाही. उलट आदरभावच असायला हवा, हा त्यांचा दृष्टिकोन श्रोत्यांसाठी परिणामकारक ठरला. आमंत्रणानुसार मग विवेकानंद अमेरिकेतल्या प्रमुख शहरांमध्ये गेले आणि त्यांनी ती शहरेही जिंकली. काही धर्मप्रेमींनी तर त्यांचे शिष्यत्व पत्करून तिथे काम करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे त्यांनी शिष्यही करून घेतले. त्यांच्यापैकी कुणी ज्ञानानंद, कृपानंद अशी नावे धारण केली.

◆

स्वामी विवेकानंदांच्या अमेरिकेतील वास्तव्यामध्ये त्यांनी जी भाषणे दिली, त्यामुळे सर्वसाधारण अमेरिकन नागरिक हेलावून गेले. त्यांच्या प्रत्येक व्याख्यानाचा सारांश त्यांच्या आकर्षक फोटोसह वर्तमानपत्रांत येत होता.

काहींनी आपल्या अग्रलेखातून, 'आपल्या धर्माचा अभ्यास कसा झाला पाहिजे' यासाठी ख्रिस्ती धर्मगुरूंनी विवेकानंदांचा आदर्श ठेवावा असे सुचवले. या तुलनेने काही धर्मगुरू आणि कडवे धर्माभिमानी दुखावले गेले. त्यांनी आपापल्या परीने विवेकानंदांना विरोध करण्याचा प्रयत्न केला.

एकदा एक ख्रिस्ती धर्मगुरू विवेकानंदांना भेटला. त्याने वितंडवाद घालून हिंदू धर्माची निंदा करण्यास सुरुवात केली. विवेकानंद शांतपणे त्याला म्हणाले, ''बंधो, हे बरं नव्हे.'' ''काय बरं नव्हे?''

''पूर्ण विचार केल्याशिवाय एखाद्या धर्मावर टीका करणं बरं नव्हे.''

''मग तुमच्या धर्मात अस्पृश्यता नाही का?''

''मी त्याचा खुलासा केलेलाच आहे.''

''काय खुलासा केलेला आहे?''

''मूळ हिंदू धर्मात अस्पृश्यता नाही. ती पोटभरूंनी नंतर घुसडली आहे. त्यांचा मी धिक्कार केला आहे. मी चांभाराच्या हातचं पाणी प्यालो आहे. भंग्याच्या घरचं जेवण जेवलो आहे. हे मी सांगितलं ते तुमच्या लक्षात यायला हवं होतं.'' परंतु विवेकानंदांना समजून न घेताच हातवारे करीत तो त्यांना आणि हिंदू धर्माला अपशब्द बोलू लागला. काहीशा रागाने विवेकानंद म्हणाले, ''बस्स झालं. मी माझ्यावरची टीका ऐकून घेईन; पण मला माझ्या धर्माची निंदा सहन होणार नाही.'' ''मग काय करणार?'' असे म्हणून त्याने आपल्या अपशब्दांची उधळण करायला सुरुवात केली.

विवेकानंदांना राग अनावर झाला. त्यांनी त्या धर्मगुरूच्या उजव्या हाताचे मनगट घट्ट पकडले. विवेकानंदांच्या मानाने तो धर्मगुरू विशालकाय आणि सुदृढप्रकृतीचा होता; परंतु त्याने आपल्या दोन्ही हातांची शक्ती एकवटून विवेकानंदांची मूठ सोडवून घेण्याचा व्यर्थ प्रयत्न केला.

तशातही त्या धर्मगुरूला या घटनेचे आश्चर्य वाटले. स्मितहास्य करीत विवेकानंद उद्गारले. ''हे योगसामर्थ्य आहे. हिंदू धर्मातील योगाभ्यासाने ते प्राप्त होते. तू पुन्हा हिंदू धर्माच्या वाटेला न गेलेलं बरं.'' तो धर्मगुरू या घटनेने वरमला. वरकरणी त्याने विवेकानंदांची क्षमा मागितली; पण पराभूतांच्या मनाला सहजासहजी शांती मिळाली असती, तर जगातली निम्मी धर्मयुद्धं झालीच नसती.या प्रसंगापासून विवेकानंद बरेच सावध राहू लागले. बाईजी आणि प्रा. राईट त्यांची विशेष काळजी घेत; परंतु प्रत्येक ठिकाणी विवेकानंदांनी स्वत:च्या सामर्थ्यावरच संकटांशी मुकाबला केला.

अशाच एका कडव्या ख्रिस्तप्रेमी कुटुंबामध्ये एकदा विवेकानंदांना काही धर्मगुरूंच्या समवेत कॉफी-पानाचे आमंत्रण होते. त्याप्रमाणे बाईजींना बरोबर घेऊन विवेकानंद गेले. सर्वांच्या हातात कॉफीचे पेले देण्यात आले. सर्वांनी कॉफी पिण्यास सुरुवात केली. विवेका-नंदांनी कॉफीचा पेला तोंडाजवळ नेला आणि आपल्या तीक्ष्ण नजरेने त्यांनी कपातल्या कॉफीकडे पाहिले.

एकजण म्हणाले, ''स्वामीजी, घ्या ना. कॉफी कशी छान झाली आहे!''

''मी ही कॉफी घेणार नाही,'' निर्विकारपणे विवेकानंद म्हणाले, ''या कॉफीत विष आहे.'' सर्वजण आश्चर्याने थक्क झाले. त्यात विष घातले होते हे नंतर सिद्ध झाले. घरी आल्यावर बाईजींनी स्वामीजींना विचारले, ''स्वामीजी, मोठं प्राणावरचं निभावलं.'' ''होय. गुरूची कृपा.''

''पण कॉफीत विष होतं हे तुम्हाला कसं समजलं?''

''ते माझ्या दिव्य दृष्टीला दिसलं.'' ''दिव्य दृष्टीला?''

''होय, माझे गुरू स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या कृपेनं ती दृष्टी मला लाभली आहे. त्या क्षणी मला असं वाटलं, की त्या विषाकडे बोट करून गुरुजी जणू मला इशाराच देत आहेत!'' ''कसला इशारा देत आहेत?''

''बेटा, कॉफी पिऊ नकोस. त्यात विष आहे.''

''अस्सं? बरं झालं तुमच्या जिवावरचं संकट दूर झालं, नाही तर मला असह्यच झालं असतं.'' ''तुम्हाला? छे, छे, तसं होणार नाही. ज्याच्यावर गुरुकृपेची सावली आहे, ज्याच्यावर गुरुमाऊली प्रसन्न आहे, त्याला भीती कसली? माणसानं केव्हा जन्मायचं आणि केव्हा मरायचं, हे त्या नियतीनं ठरविलेलं असतं; पण जर गुरुकृपा असेल, तर नियतीनं ठरवलेल्या वेळेच्या आधी माणसाला मरण येणार नाही.''

या प्रसंगाच्या वेळी बाईजींच्या बरोबर दुसरी एक तरुण मुलगी आली होती. विवेकानंदांचे हे भाषण ऐकून ती खूपच प्रभावित झाली. स्वत:शी म्हणाली, 'गुरू असावा, तर या स्वामी विवेकानंदांसारखा!' तिचे भारावून गेलेले मन विवेकानंदांनी ओळखले. पुढे अमेरिकेत स्थापन केलेल्या एका केंद्रावर त्यांनी तिची नियुक्ती केली.

❖

**नवंकोरं**

# द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड

लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**बाळ भागवत**




**किंमत : १९०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

सेल्मा अल्सन ही विधवा मेसनकडे 'आपला पाठलाग केला जात आहे,' अशी तक्रार घेऊन येते. पॉलड्रेक या डिटेक्टिव्हद्वारा तो इसम फिन्डले असल्याचे तिला समजते. डीलेन अर्लिंग्टनच्या घरी झालेल्या बार्बेक्यू पार्टीला त्याचा मित्र व त्याची पत्नी सेल्मा यांना आमंत्रण असते. खेकड्याचे सॅलड या दोन्ही मित्रांचे अतिशय आवडते असते, जे खास त्याचा पुतण्या मिल्ड्रेडने बनविलेले असते. पण ते चुकून फ्रिजबाहेरच राहिल्याने ते खाणाऱ्यांना विषबाधा होते; मात्र सेल्माच्या नवऱ्याला जास्त त्रास होतो व त्याचा मृत्यू होतो. कालांतराने डीलेन व सेल्मा लग्न करू इच्छितात. पण डीलेनचे पुतणे- मिल्ड्रेड, डाफ्ने यांच्यासाठी हे अडचणीचे असते. कारण हे लग्न झाले तर या श्रीमंत विनापत्य विधुराकडून त्याच्या या पुतण्यांना काहीच लाभ मिळणार नसतो, त्यामुळे त्यांच्या मनात सेल्माविषयी द्वेष उत्पन्न होतो. सेल्माला नवऱ्याच्या निधनानंतर विमा कंपनीकडून १ लाख डॉलर मिळतात. त्याच्या गुंतवणुकीतून तिला बरेच पैसे मिळतात. विमा कंपनी त्यामुळे सेल्मालाच आपल्या पतीचा खुनी ठरवते. या सर्वामुळे घाबरून सेल्मा बँकेतून पैसे काढून फरार होण्याचा बेत रचते. त्यामुळे तीच गुन्हेगार असल्याचा संशय बळावतो. इकडे पार्टीच्या ठिकाणी आर्सेनिक पावडरीचा डबा सापडतो. सेल्माच्या पतीचा मृत्यू आर्सेनिक विषानेच झाल्याचा निष्कर्ष तपासातून निघतो.

## प्रकाशन समारंभ...






हॅरिएट लर्नर लिखित व डॉ. जयश्री गोडसे अनुवादित 'द मदर डान्स' या पुस्तकाचं प्रकाशन औरंगाबाद येथे सुप्रसिद्ध लेखिका डॉ. छाया महाजन यांच्या हस्ते करण्यात आलं. या प्रसंगी (डावीकडून) सौख्यदा देशपांडे, डॉ. छाया महाजन आणि डॉ. जयश्री गोडसे.

## प्रकाशन समारंभ...






स्वाती चांदोरकर यांच्या 'हिज डे' या कादंबरीचं प्रकाशन तृतीय पंथीयांच्या हस्ते मुंबई येथे करण्यात आलं. या कार्यक्रमाला प्रवीण दवणे, प्रदीप वेलणकर, प्रमोद पवार, चंद्रकांत मेहेंदळे, माधवी बांदेकर, हेमांगी, ट्रान्स जेंडर संजीवनी, माधुरी शर्मा, विकी शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते.

Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/2739
Posting at Marketyard, PSO, Pune 411037
Publication Date : 09/01/2018 Posting Date : 11/01/2018

## आवर्जून वाचावे














**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,